
# डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा ३

## आलू.. हीरो.. अभांड..इ..



# व्यक्ती आणि कथा ३

## आलू.. हीरो.. अभांड..इ.

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# व्यक्ती आणि कथा ३

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १६ मे २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# व्यक्ती आणि कथा ३

## आलू.. हीरो.. अभांड..इ.

**डॉ. नितीन मोरे**

**प्रत्येक व्यक्तीस**

**वेगळे व्यक्तिमत्व बहाल करणाऱ्या**

**त्या महान निर्मिकाला**

**आदरपूर्वक समर्पित**

# व्यक्ती आणि कथा ३

## आलू.. हीरो.. अभांड..इ.

डॉ.नितीन मोरे

# अनुक्रम

## व्यक्ती आणि कथा ३


१. नामा निराळा

२. एक नंबरी

३. बृहन्नडा

४. चार्वाक(?)

५. अभांड

६. नवरे

७. आलू

८. टॉपर!

९. अविश्वासराव!

१०. हीरो

११. ड्रीम बॉय

१२. गांधार

१३. दिग्दर्शक

१४. मल्लिनाथ

# नामा निराळा

नामाची गोष्टच निराळी. गावचा न्हावी अन लागे कानोकानी! एकेकाच्या कानी लागत स्वत: नामा नामा निराळा! नामदेव गोविंद पवार. हयात गेली हजामती अन दाढ्या करण्यात. हल्लीच गावात एकुलतं दुकान आलंय. सलून म्हणतात त्याला. नामा त्याआधी होता एकटा शिलेदार. सगळ्या गिऱ्हाईकांची मान याच्या हाती. समोर गिऱ्हाईक नि त्याचे केस पाह्यले की नामाचे हात चालायला लागतात नि त्याची जीभ बोलायला वळवळते फार. आजकालची तरूण पोरं त्या केशकर्तनालयात जातात. पण जुनी डोकी अजूनही नामाच्याच हातात. कोणाची काडी कोठे लावावी, कळ कशी लावावी अन कलागत कशी करावी याची कला नामा नाभिकास केशकर्तन कलेहून जास्त अवगत. तरीही त्या नव्या दुकानात जुनी गिऱ्हाइकं त्या सिंहासनासारख्या खुर्चीवर बसायला चुकून माकून जात. पण नामाच्या तोंडच्या आजच्या ताज्या बातम्या ऐकायला नाही मिळाल्या म्हणून 'ती मज्जा नाही' म्हणत हळहळत पुढच्या वेळी नामाच्याच कात्रीत परतत.

गावात बिनपैशाचे हुकुमी मनोरंजन अजून कोठे मिळणार होते त्यांना?

तरूणपणी गावात तो एक छोटी नि एक मोठी पेटी घेऊन शिंगणवाडीत शिरलेला. मोठ्या पेटीत बाडबिस्तरा नि छोट्या पेटीत कंगवा वस्तरा. तो कोणत्या गावाहून आला हे लोकांना कधी माहिती झाले नाही. नंतर तो गावचाच

झाला, मग कोणत्या गावचा तू म्हणून कोण कशाला विचारतोय त्याला. गावात एक देऊळ. बाजूला नदी. अजूनही बारमाही वाहणाऱ्या नद्या शाबूत आहेत त्यातली ही एक. गावात पाऊस पडतो बरा. नि गाव तसं हराभरा. संपत्ती बऱ्यापैकी. हळूहळू सुबत्ता आलेली. तरीही माणूस तसा बदलतो होय? माणसाचे सारे गुण अन अवगुण तसेच. नि इकडची काडी तिकडे लावण्याची नि शिळोप्याच्या गप्पा पारावर बसून तासनतास् मारण्याची सवय ही तशीच. ती जाते कुठे? त्या गप्पांचा मसाला पुरवण्याची सोय नामाने केली नि गावकरी त्याच्यावर खूश झाले. शिंगणवाडी गावात तशी नामायोग्य डोकी फार नव्हती. जुनी डोकी म्हणावीत तर पन्नास टक्के बाया बाद. राहिलेल्या पुरूषांपैकी काही तरूण फटफटीवर टांग मारून जवळच्या शहरी दुकानात जात. जुने जाणते मात्र त्याचे हक्काचे गिऱ्हाईक. त्यामुळे कमवण्यासाठी नामा आठवड्यात तीन दिवस आजूबाजूच्या गावात डोई भादरायला जाई. त्यामुळे त्याच्या कानोकानी गप्पांना आंतरगावीय संदर्भ मिळे. त्यामुळे तर नामाला अजून मागणी असे. नामाच्या हातची कातर नि तोंडची जीभ मग कचाकचा चालू लागत. रिकामा न्हावी भलेही भिंतीला सजवत बसेल पण नामा रिकामा नसतानाही आपल्या जिव्हास्त्राचा वापर करत लोकांचा रिकामा वेळ सजवत बसे. डोकी भादरत भादरत नवनवीन गोष्टी इकडच्या तिकडे केल्या की सांगणाऱ्याचे तोंड नि ऐकणाऱ्याचे कान तृप्त होत. त्यात मग राजकारणापासून ते माजघरकारण यापर्यंत सारे विषय येत. तरूण पोरापोरींची एखाद भानगड नि सरपंचासारख्या प्रतिष्ठितांच्या बारा भानगडी.. नामाची बातच निराळी. तो सर्व गावची खबर ठेवून असायचा. गावचे चालतेबोलते वर्तमान पत्र म्हणावे असा नामा. म्हणजे बातम्या ऐकवायचा. 'सोत्ताच्या डोल्याने पाह्यलय' म्हणत पेपरवाल्यांनी 'खात्रीलायक सूत्रांकडून' बातमी द्यावी तशी माहिती द्यायचा.

त्यावर स्वत:च्या मताची पिंक हे जणू संपादकीय संस्कार करायचा. कधी एकेकाचे मत ऐकण्यासाठी लोकांना बोलते करत 'लोकमानस' जाणून घ्यायचा. थोडक्यात तो शिंगणवाडीच्या दृकश्राव्य वर्तमानपत्रासारखा होता. एवढं करून नामा निराळा राहण्याची त्याची हातोटीच वेगळी होती.

नामदार अप्पासाहेब वाघचौरे म्हणजे मोठं प्रस्थ. गावातल्या त्यांच्या गढीवर दर गुरूवारी नामाची सकाळची व्हिजिट ठरलेली. साडेसातच्या ठोक्याला अप्पासाहेब आपली मान त्याच्या हवाली करत.

'काय नामा? काय खबरबात?' हा पहिला प्रश्न नि शिंगणवाडी धिस वीकचे नामा प्रस्तुत प्रसारण सुरू होई. मग राजकारणी काड्या इकडून तिकडे लावल्या जात. आजूबाजूच्या गावातील बातमी दिली जाई. गुलाबराव चौधरी आणि अप्पासाहेबांचे विळया भोपळयाचे सख्य. त्यांच्याकडच्या बातम्या विशेष मसाला लावत नामा पेश करी.

"तुम्हाला सांगतो साह्येब, औंदा गुलाबरावाच्या कारखान्यात संप अटळ. तुमची ट्रिक काम करनार. करनार म्हंजे करनार. लई मिजास करायचा मिशीला तूप लावून.."

"आरं पन नामा त्याची पन हजामत तूच करतो न्हवं?"

"त्ये तर आपलं काम साह्येब. भग्वान श्री क्रिस्ना सांगून गेलता, आपले कर्म करित ऱ्हा. मंग समोर कोन हाये हे पाहू नको. तर माझं काम दिसलं डोकं की भादर. मग डोई कुनाची बी आसंना? पन माझं साह्येब ते तुमीच एक. गुलाबराव निस्तं एक गिऱ्हाईक.."

त्याच दिवशी दुपारी गुलाबराव चौधरींकडे नामाची स्वारी ती ॲल्युमिनियमची पेटी घेऊन पोहोचली की हाच संवाद तसाच होई. फक्त गुलाबरावांच्या जागी अप्पासाहेबाचे नाव घेत!

नामाच्या सुपीक डोक्यात मग नामी कल्पना येत. गावात घडले एक की चार आण्याच्या कोंबडीला बारा आण्याचा मसाला लावून सोळा आणे चविष्ट पाककृती नामा सादर करे. बोलण्याची हातोटी अशी की एकपात्री प्रयोग सादर केले तर नामा 'रामनगरी' च्या राम नगरकरांहून हिट व्हावा. कात्रीची धार नि त्याच्या जिभेची धार स्पर्धा करीत. केस कापता कापता शब्द नि वाक्ये कुठे कापावीत.. म्हणजे डायलाॅग डिलिव्हरी कशी करावी ते नामाला जणू उपजत अवगत असावे.

"अप्पासाह्येब, तुम्हाला म्हणून एक सांगतो, दिस खराब यायचेत."

"काय म्हनतोस?"

"खरंच साह्येब. म्हंजी तुम्हाला न्हाई, त्या गुलाबरावांस्नी. म्हंजी त्यांची ती पोर.. सोळावं वरीस धोक्याचं."

"म्हंजे रे? काय भानगड बिनगड? तशी पोर चांगलीय ती.."

"हुं. कसली चांगली नि कसली काय. तरणी ताठीचं वाकडं पाय."

"तुला काय कळलं की काय?"

"न्हाई साह्येब. उगा इकडची काडी तिकडे लावायची सवै ह्या नामाला न्हाई. तुम्हाला तर ठावं हाये, नामा बातमी पक्की आसल तरच सांगतो.."

"अरं पन जे ठाऊक ते तर सांगशील?"

"नगं साह्येब.. उगा नंतर म्हणत्याल.. नामा चुकीची खबर.."

"आरं नामा, उगाच भाव खातोयस जनू.."

"सांगतो. पन कुटं बोलू नगा. आन म्या म्हनलो म्हनून तर कुनाला बोलू नगा.."

"आरं ती तसली सवै आमची न्हाई. आम्ही काय त्या पिंपळाच्या पारावर बसनारे वा ॅर्डिनरी लोकापैकी हायत का? तिकडचे गावकरी एकाची गोष्ट दुसऱ्याला नि दुसऱ्याची तिसऱ्याला सांगत बसत्यात. आपल्याला तितका टायम न्हाई.."

"खरंय साह्येब. गावातले लोक म्हनत होते.. ती कुसुमावती.."

"ही कोन?"

"गुलाबरावाची लेक.."

"कुसुमावती? तिला तर समदे हीरा म्हनत्यात."

"न्हाई. तिचं खरं नाव कुसुमावती. ह्या नामाला इचारा साहेब. पक्की खबर हाये. गावाबाहेरच्या त्या किल्लयात दिसली म्हने. कोणासंगत ते ठावं न्हाई. कुणा थोरामोठ्याचा पोर आसंन. पन लोक काय बाही बोलतात. म्या म्हनलं आपल्याला काय? तो गुलाबराव पाहून घील की. आन बातमी आजून पक्की न्हाई बरं का."

"पन तू तर बोल्ला आधी.. पक्की खबर.."

"त्ये तिचं नाव. कुसुमावती. हीरा म्हंजे कुसुमावती, ही बात पक्की. पन साह्येब कुनाला सांगू नका.."

साहेबाच्या डोक्यात वळवळणारा कीडा सोडून दुपारी नामा गुलाबरावाच्या गढीवर दाखल झाला.

"चौधरीसाह्येब, तुम्ही हायसा म्हनून गावाला शोबा हाये. नशीब त्या आप्पासाह्येबांचं बळकट म्हनून त्ये मोठ्यापदावर. पन खरा मान तो तुमचा साह्येब."

"अरं, नामा तू जाणतोस पन गावाला न्हाई आमची किंमत.."

"आसं कसं साह्येब? किंमत नसती तर आप्पासाह्येबाचा डाव नस्ता झाला येशस्वी?"

"कसला डाव?"

"चौधरीसाह्येब, तुमच्या कारखान्यात संप घडवायचा व्हता. म्या आडून आइकलं. मागच्या खेपेला म्या सावध केलं तुम्हाला त्ये म्हनूनच. पन कारखान्यातल्या कामगारास्नी पक्कं ठाऊक. कोन त्यांचं नि कोन परकं. म्हनून तर कुनी भीक घालिना. आप्पा तिकडे बडवतोय बूड. पन लोक म्हनतात गुलाबराव आपलं पोशिंदे त्यांनला कसा धोका द्यायचा.."

"असं म्हनतोस?"

"पन तुम्ही चिंता सोडा. ह्या अप्पासाहेबास्ना आता घरचं आवरनं कठीन होनार. मग बाह्येरचं कसलं काय बघतील.."

"असं कोड्यात नको बोलू नामा.."

"तसं न्हाई चौधरीसाह्येब. उगा बातमी पक्की नसली नि म्या कुटं बोललो तर म्हनाल नामा ठोकतो थापा. ती सवै मला न्हाई. माझी खबर पक्की. बीबीशी वानी."

"बीबीशी?"

"आवं त्ये शहरातले लोकं म्हने बीबीशीवरच्या बातम्या आइकतात. पक्की खबर म्हने.."

"तू कुठं शहरात गेल्ता?"

"काय साहेब? न्हाईका मागच्या महिन्यात त्ये रामशेठच्या पोराच्या लगीनात मुंबैला जाऊन आल्तो. ते जावं द्या. सांगत हुतो ते म्या उगाच चुकीची खबर न्हाई देत."

"अरं सांग रे. भाव खातोया उगा.."

"तुम्हाला म्हनून सांगतो. कुटं बोलू नगा. आन म्या बोललो म्हनून तर नगाच सांगू.."

"अरं आम्हाला कुठली फुरसत? हे राजकारन नि कारखाना ह्यातच टाईम जातो. मग इकडच्या कलागती तिकडे लावायला सवड कुठं मिळायला?"

"ते बी खरंच साह्येब. पन जे आइकलं ते सांगतो साह्येब. खबर पक्की न्हाई पन लोक बोलतात. ते अप्पासाहेब भानगडीत आडकलेत म्हने.."

"तमाशा की काय?"

"तसंच काही साह्येब. म्हंजे ठावं नक्की न्हाई पन गावाबाह्येरच्या किल्ल्यात सापडले म्हने.."

"कोन? अप्पा? या वयात?"

"ते न्हाई."

"मंग रे?"

"त्यांचा पोर. गुणवंतराव."

"गुणवंत? तमासगिरणीबरोबर गुण उधळतो की काय?"

"त्ये म्हायती न्हाई. पण गुणवंताने नाकात दम आणून ठेवलाय म्हने आप्पाच्या. पुढच्या वर्षी विलेक्शन. बदनामीला आप्पा घाबरतो इतका. चौधरी साह्येब पुडच्या वर्षी संधी नामी तुम्हाला.."

"खरंच सांगतो नामा तू? अरं, ह्या खुर्चीसाठी जंग जंग पछाडलं. पन येश काय हाती आलं न्हाई."

"थोडं थांबा साह्येब. आपले भोसले गुरूजी म्हनायचे धीर धरी.. गुणवंताचा पायगुण तुम्हाला उपेगी पडनार. हां, खबर पक्की न्हाई अजून पन

आग आसल तरच धूर येतो की न्हाई? म्या धूर पाहिला तर आग कुटंतरी असनारच.."

दोन्हीकडे अशी थोडी आग लावून नामा नामा निराळा राहात निघतो. पारावर गिऱ्हाईकं वाट पाहातात त्याची. तिकडच्या बातम्या वेगळया. अप्पासाहेब नि गुलाबरावांसारख्या तालेवारांकडे द्यायच्या वेगळया.

नामाच्या बातम्या जितक्या कच्च्या तितकेच त्याचे हिशेब पक्के आहेत. कुठे काय किती नि कसे बोलावे नि कशा फुसक्या सोडाव्या याचे आजवर न चुकलेले आडाखे पक्के आहेत. गावात टीव्ही हल्लीच आलाय. वीज असेल तेव्हा तो चालतोही काही तास. त्यावरील कार्यक्रमांहून भारी करमणूक नामा सगळयांची करतोय. हल्ली ब्रेकिंग न्यूज ऐवजी चोवीस तास मनोरंजनात्मक बातम्यांची चॅनल्स मेकिंग न्यूज देतात त्याचा आद्य निर्माता .. किंवा जनक नामा म्हणावा लागेल. अर्थात तसे श्रेय त्याला कोणी देणार नाही. नामाला ही तशी अपेक्षा नाही.

..शेवटी सारे काही करून नामा निराळा राहणे यातच त्याच्या 'यशा'ची गुरूकिल्ली आहे!

# एक नंबरी!

तो एक अवली आहे. अवलिया आहे. किंवा खरेतर अवली अवलिया आहे म्हणा ना!

आणि तो म्हणजे तो आहे. यात तो हे सर्वनाम आहे. आणि त्याच्याबद्दल बोलताना फक्त सर्वनामच वापरायला लागते. म्हणजे तो असाच आहे. निनावी!

वर्णनाच्या सोयी साठी त्याला आता नित्यानंद निवृतीनाथ निनावे म्हणूयात. पण हे त्याचे नाव नाही. त्याचे हे आपण मानलेले आडनावही खरेतर विशेषण आहे. नित्यानंद आहेच आता तसा! म्हणजे तो निनावी आहे. अर्थात मुळात तो तसा नाही. पण आहे हा तो असा आहे.

आता असा म्हणजे कसा? नित्यानंद एका उच्च कुळातील. उच्च जातीतील एक. म्हणजे तशी मुद्दाम जात बित सांगायची गरज नाही त्याची. पण जन्मत:च संस्कारी, जन्मत:च विद्वत्तेसाठी प्रसिद्ध नि जन्मत:च उच्चासनावरून दुनियेस पाहणारी अशी. त्यात जन्मलेला तो. अतिशय सुसंस्कृत. अतिशय विद्वान. कुलीन म्हणावा असा. शाळेत नि कॉलेजात नि नंतर नोकरीला लागला

तिथे ही अति आदराने नाव घेतले जाईल असा. म्हणजे आपल्याकडे तशी पद्धतच आहे म्हणा ना. तो तर स्वत: तसा आहेच पण त्याचे ते नावच.. आडनाव ही तसेच. सन्माननीय!

तो मला अलीकडेच भेटला. खूप वर्षांनंतर. त्यानंतरची ही गोष्ट.

"अरे तू? कितीतरी वर्षे होऊन गेलीत.."

"हो ना! कित्येक वर्षे!"

नित्यानंद दिसायचा स्काॅलर सारखा. त्यात चष्मा लावला की अजूनच मोठा विद्वान वाटायचा. त्याच्या डोळ्यातली चमक तशीच होती. त्याचे हसणे ही तसेच होते. वयानुसार थोडे वाढलेले वजन नि कमी झालेले केस सोडले तर तो तसाच होता. अति हुशार. दिसण्यातही ब्रिलियंट म्हणावा असा.

"काय इकडे कुणीकडे?"

"असाच. काही कामासाठी. बरे झाले आलो. तेवढाच भेटलास तू!"

"हो ना. हल्ली कुणी विशेष भेटत नाहीत रे. सगळे आपापल्या कामात."

"खरेय. काय दिवस होते ते!"

"होय रे! गेले ते दिवस."

"अर्थात तुला कसे वाटायचे ते ठाऊक नाही. पण माझ्यासाठी फारच चांगले होते ते दिवस.. माझ्यापुरते तरी.."

नित्यानंद हे बोलला तेव्हा झरकन ते दिवस डोळ्यांसमोर आले. निमशहरी अशा गावातले आमचे ते कॉलेज. कुठून कुठून येणारी मुले. वेगवेगळ्या आर्थिक सामाजिक स्तरातील. मुलंमुली तशी वेगवेगळ्या हुशारीची असली तरी किमान बुद्धिमत्ता असलेली. बहुतांशी मेहनती. आणि पुढे जाण्याचे स्वप्न पाहणारी. त्यात मी ही एक. गावाकडचा. लहानपणापासून

शेतीवर कामे करून रापलेली कातडी. अंग मेहनतीमुळे तसा अंगाने मजबूत पण काळ्या रंगाने कोणासही तसा मागास वाटावा असा. कृष्ण वर्ण हा समाजातील मोठ्यांसाठी. आम्ही काळ्या रंगाच्या कातडीवाले. आम्ही काही जण असेच. गावाकडचे. माझी भाषा उत्तम होती. इंग्रजी मेहनत करून मी सुधारलेले. पण उच्चार? गावाकडचा हेल काही सुधारायचा नाही. कॉलेजात थियरी पार पडून जायची पण तोंडी परीक्षा नि प्रॅक्टिकल्स? तोंड उघडले की गावच्या भाषेच्या टोन मुळे प्रोफेसर लोक तोंड वाकडे करायचे. त्यात परत माझे नाव नि आडनाव. माझ्यासारखे अन्य तीन चार अजून होते. पहिली दोन वर्षे अशीच गेलेली. जाता जाता एक दोन प्रोफेसरांनी जातीवरून केलेली शेरेबाजी कानावरून गेलेली. कोणी मुद्दाम तोंडावर सांगितले नसले तरी आम्ही खालच्या जातीतले इतके जाणवून देण्याइतपत आमच्याशी कित्येक प्रोफेसर वागत. बाकी मुलंमुली बहुतांशी बरी असली तरी काहींचे वागणे खटकण्यासारखे असे. अर्थात तिसऱ्या वर्षात माझे मार्क्स पाहून बहुतेकांची माझ्याकडे बघायची दृष्टी बदललेली. नित्यानंद मात्र पहिल्यापासून सर्वांत मिळून मिसळून असायचा. मला आठवते, एकदा प्रोफेसर कण्णमवारांच्या माझ्याबद्दलच्या अनुदार, खरंतर हिणकस उद्गारांनंतर माझ्या पाठीवरून हात फिरवून नि:शब्द झालेला ही तोच होता. जे होत होते त्यात त्याची काय चूक होती नि त्याच्याकडे उपाय तरी काय होता? तो गोरा घारा स्का ॅलरसारखा नि मी असा, दुसऱ्या धृवावरील असल्यासारखा. कॉलेजात पदोपदी हे सारे वाट्यास आल्यानंतर कॉलेजचे दिवस मी चांगले म्हणेन की नाही याची नित्यानंदला आलेली शंका म्हणजे तो ते अजून विसरला नसावा याचाच पुरावा होती.

"आज काही वाटत नाही रे. तुझ्यासारख्यांमुळे तगून गेलो आम्ही. नाहीतर काही खरे नव्हते.."

हे खरेच खरे होते.

"चल बसून चहा घेऊ.."

जवळच्या हाॅटेलात आम्ही बसून गप्पा मारत बसलो. जुन्या आठवणी निघाल्या. जुन्या दोस्तांची खबरबात नि त्यांच्याबद्दलची विचारपूस झाली. कित्येक आठवणींची उजळणी झाली..

"खूप छान वाटले तुला भेटून नित्यानंद.." मी म्हणालो.

"नित्यानंद नाही. नमस्कार.. मी १२०४६६१२४०१२०३.

"म्हणजे?"

"म्हणजे. मी नाव बदललेय. नव्हे. नाव टाकलंय.."

"म्हणजे रे?"

"हे बघ, आपल्याकडे आपली ओळखच फक्त नावाने होत नाही. नाव आणि आडनाव, नावाखेरीज खूप काही सांगतात. आता तुझेच नाव घे. आणि तुलनेसाठी माझे घे. माझ्या आडनावामुळे मी शर्यत सुरू करतानाच तुझ्यापुढे होतो. तुला तुझ्या आडनावाने किती अडथळे आले. थोडक्यात बहुधा आड येते ते आडनाव. आणि नाव फक्त जातच नाही सांगत तर धर्म पण. आणि आपल्याला जात नि धर्मावरून कोण लहान नि कोण मोठा हे ठरवायला आवडतं खूप. अगदी ऑब्सेशनच म्हण. म्हणजे.. तुम्ही जोशी ना.. म्हणजे अमुक ब्राह्मण.. तुम्ही भट.. म्हणजे तमुक.. ते म्हणजे आपल्यातील नाही.. तो ना.. तेलतुंबडे.. तो कांबळे.. म्हणजे कसा असेल बघा.. तुम्ही कराडे.. म्हणजे कोण? तो? अब्दुल.. नि तो फ्रान्सिस.. नुसत्या नावावरून वर्गवारी. त्यावर आपण थांबत नाही. मग आपण कोण मोठा, कोण छोटा, कोण उच्च, कोण

कनिष्ठ.. कोण आपला, कोण त्यांच्यातला याचा विचार करायला लागतो. आपला हा राष्ट्रीय छंदच आहे म्हण ना."

"खरंय.."

"मग मी विचार केला आडनाव काढून टाकायचा. पण एकाच नावाचे खूप जण निघायला लागले. मग विचार केला नावच काढून टाकायचे. तुरूगात असतात कैदी नंबर. किंवा हा◌ॅस्पिटलात बेड नंबर तसा मी. एक कोणता तरी नंबर. आयुष्यभर मी नंबराने ओळखला जाईन.. म्हणजे नावावरून माझ्याबद्दल कोणी ग्रह किंवा पूर्वग्रह करून घ्यायला नको.."

"पण.."

"मला ठाऊक आहे रे.. धिस इज नॉट प्रॅक्टिकल. पण माझ्या हातात काय आहे? मी आपली व्यवस्था नाही सुधारू शकत. कॉलेजात तुमच्या सारख्यांना मूक पाठिंबा देण्याखेरीज काय करू शकलो मी? तुला सांगतो, शतकानुशतके हे होत राहिलेय. त्याचे उत्तर कोणाकडे नाही. मोठमोठ्या लोकांनी केले प्रयत्न. थोडेफार यशस्वी. बहुतांशी पालथ्या घड्यावर पाणी. हाताची पाच बोटे सारखी नसणारच. पण प्रत्येक बोट महत्वाचे. मग एकाने दुसऱ्याला का हिणवावे? जाऊ देत. मी तर दुरून सारे पाहिले. प्रत्यक्ष झळ न लागता. तुम्ही लोकांनी काय नि कसे सहन केले ते माहिती नाही. आणि या गोष्टीला अंत आहे असे वाटत नाही. मग माझ्या मनाचे समाधान म्हणून मी नाव टाकले. मी म्हणजे आता एक नंबर. मी म्हणजे नंबर १२०४६६१२४०१२०३."

नित्यानंदचे बोलणे बिनतोड होते. अगदी तर्काला धरून. त्याची कल्पना प्रत्यक्षात येणारी नसेलही पण त्या मागच्या भावना सच्च्या होत्या. आमच्यातील कोणी आपले नाव बदलले ओळख लपवायला तर एक वेळ

समजण्या सारखे होते पण नित्यानंदसारख्याने? त्याने निव्वळ एक नंबर बनून रहावे? एक संख्या? पण त्याच्यासारखा विचार करणाऱ्यांची संख्या वाढली तर समाजाचे चित्र बदलायला कितीसा वेळ लागेल?

आज नित्यानंद, नव्हे माझा मित्र १२०४६६१२४०१२०३ भेटला. खूप छान वाटले. कोणीतरी दु:खावर फुंकर घातल्यासारखे. फुंकरीने जखम ठीक होत नसेलही. पण बरे नक्कीच वाटते. मुख्य म्हणजे फुंकर घालणारा आपल्याशी सह अनुभूती दाखवत आहे याचे समाधान देऊन जाते. वर्षानुवर्षे चिघळत राहिलेल्या किंवा तशी चिघळत ठेवलेल्या या जखमेवर इलाज मिळणे मुश्किल आहेच. पण त्यात खारीसारखा प्रयत्न करणारा माझा मित्र १२०४६६१२४०१२०३.. एक अवली अवलिया.. नंबर १२०४६६१२४०१२०३!

१२०४६६१२४०१२०३ नाही, खरेतर एक नंबरी म्हणायला हवा!

# बृहन्नडा..

त्याचं सगळंच वेगळं होतं. म्हणजे तो तसा वेगळा नव्हता. सर्वसामान्यांसारखाच होता. पण पुढे लोकांचीच दृष्टी बदलली. तो तसाच होता, पण लोकांना दिसत मात्र निराळाच होता. म्हणजे बदलली होती ती लोकांची नजर. आणि त्यामुळे त्रास झाला तो त्याला.

आपल्याकडे महाजनांना महत्व खूप. महाजन म्हणजे एकाच पंथाने जाणारे. चारचौघांसारखे असणारे. नि चारचौघांसारखे वागणारे बोलणारे. मग समाजातील सारे त्याला सामावून घेतात. पण थोडा कोणी वेगळा वागतोय म्हटले की.. समाजाची वक्र दृष्टी पडलीच समजा त्याच्यावर.

भगवंता भीमाजी तोडकर. भीमाजींच्या घरी जन्माला आला तो कोणत्या मुहुर्तावर कोणास ठाऊक. जन्माला येता येताच भीमाजीचे मोलमजुरीवर जाणे बंद पडले. कामच मिळेना झाले. घरी खाणारी तोंडे नि खिशात छदाम नाही. याचे नाव भगवंता नि या नवागताची काळजी घेणाराही जणू प्रत्यक्ष भगवंतच. एखाद्याचा पायगुण म्हणून त्याला दूषणे दिली जातात.. बिचाऱ्याचा दोष नसूनही पायगुणावरून अवगुणी ठरवला गेलेला भगवंत, जणू पुढच्या आयुष्याची नांदीच ती. पुढे काय काय वाढून ठेवलं असावं?

गावच्या शाळेत जाणे म्हणजे त्यासाठी पोराला उपजत शिक्षणाची आवड हवी. असं पोर गावात एखाद दुसरंच. भगवंत या बाबतीत महाजनात होता. शासन धोरणामुळे पुढील वर्गात ढकलत ढकलत आठवीपर्यंत शिक्षणाची नोंद शासन दरबारी झालेली. अक्षर ओळख नि आकडेमोड थोडीफार लाजेकाजेस्तव शिकून मोलमजुरीचा रस्ता धरलेला. गावच्या देवळात पिंपळाच्या पारावर बसून कसलाच विचार न करणारा भगवंता भगवंतानेच दिलेले वरदान लक्षात येईतो विशीत पोहोचलेला.

भगवंताच्या गावात.. खरेतर गावाबाहेर.. आलेला तो तमाशा गुलाबबाई इंदापूरकर आणि पार्टीचा. तंबूच्या बाहेर बसून गाणी ऐकत बसलेला भगवंता. तुणतुण्याच्या आवाजानी भुलणारा. कशीतरी ओळख काढून एकदा तंबूत घुसला काय.. काहीतरी कारण निघून हाती तुणतुणं आलं काय नि आपल्याला वेगवेगळया आवाजात बोलता येतं हे जाणवून हातवारे करत तो तमाशाच्या स्टेजवरून लोकांना हसवू लागला काय.. बाकी कुठे अशा लोकांना देवदत्त देणगी नि कला उपासक वगैरे संबोधले गेले असते. पण भगवंताच्या मागे लागली उपाधी ती नाच्याची. आजवर अंगात कसलेच कसब नसलेला भगवंता ही आपल्याच अंगची कला पाहून थोडा खूश झाला. अर्थात त्याला खूश व्हायला कारण ती कला की तिच्यामुळे हाती येणारे चार पैसे.. हे त्याचे त्याला ही सांगता आले नसते. कदाचित दोन्ही ही असेल.

पुढे तमाशातून गावोगाव फिरणे आले. स्टेजवर संध्याकाळ नि रात्रभर नाचणे गाणे नि बायकी हावभावात बोलणे आले. दिवस निघून जाऊ लागले. चार पैसे हाती येऊ लागले. आणि घरच्या गरीबीतही नि ह्याच्याच पैशांवर

जगूनही त्याच्या नाच्या कामासाठी 'बोलून चालून बायल्या तू' म्हणून हिणवले जायला एक दोन वर्षे गेली. तेव्हा कुठे भगवंताने निर्मिलेल्या या जगात या भगवंताला आपले असलेले किंवा खरेतर नसलेले स्थान उमगायला लागले. खुद्द घरूनच असा उद्धार होत असेल तर बाकीच्यांची काय कथा? तीन चार तासांच्या तमाशानंतर भगवंता सर्वसाधारण पुरुषासारखा पुरूष असे. पण बाकीचे त्याला नाच्या म्हणून चिडवायला लागले की कधी स्वत:वरच तो शंका घेऊ लागे. पण तमाशातील ही नाच्याची कला वगळली तर अंगी दुसरी कळा नव्हतीच. पोटाची खळगी भरायला हे एकच काम जमण्यासारखे होते.. बाकी कोणतेही काम हलके नसते वगैरे इतर अनेक सुभाषितांसारखे फक्त बोलण्यापुरतीचे सुभाषित. प्रत्यक्षात मात्र माणसाची किंमत समाज हुशारीने करत असतोच. तशी भगवंताची होणारच होती. ती पदोपदी झालीच.

ऐन तारूण्यात मर्दासारखा मर्द बायल्या म्हणवला जाऊ लागत असेल तर त्याच्या आत्मविश्वासाच्या काय त्या चिंधड्या उडाल्याशिवाय राहणार होत्या? लग्नाचे वय झाले की कोण पोरीचा बाप त्याच्याशी संबंध जोडायला तयार होणार होता? एरवी अगदी हुंडा नि मानपानास तयार असणारे तमाशातील नाच्या म्हटले की विजेचा शाॅक बसावा तसे मागे हटत. तशात तमाशाबरोबर गावोगावी हिंडणे होऊ लागले. त्यात आजवर नशिबाचे दान उलटे पडलेले कधी नव्हे ते सुलटे पडले की काय वाटावेसे घडले. कुणी सिनेमावाल्याने या भगवंतास हेरले नि तमाशापटाचा फड भगवंताच्या नाच्याशिवाय फडफडेनासा झाला. भगवंता सिनेमातला स्टार झाला. चार पैसे खिशात खुळखुळू लागले खरे, पण सिनमामुळे नाच्याचे नाच्यापण अधिकच सर्वदूर पोहोचले. बायकी हावभाव नि बोलणे हा त्याचा अभिनयच पण तोच सारे सत्य मानू लागले. नट

म्हणून हा विजय म्हणावा पण त्यामुळेच आयुष्याच्या शर्यतीत पराभव होतो की काय..

भगवंताचे दैव असे त्याला स्टेजवरून सिनेमाच्या चंदेरी पडद्यावर घेऊन गेले. जेमतेम साक्षर भगवंता बऱ्यापैकी पैसा गाठीला बांधू लागला. समाजात वावरताना हेटाळणीच्या कडक उन्हात हा पैशाचा थोडाफार गारवा मिळू लागला. दैवालाही दया आली की न कळे, सिनेमातीलच दुय्यम नटीचा जीव भगवंतावर जडला नि अंगच्या कलेनंतर आपल्या आयुष्यात ही दुसरी चांगली गोष्ट घडली असे भगवंतास वाटून गेले तर त्यात नवल नव्हते. दोघांचे लग्न लागले. नाच्याचा संसार मांडला गेला. अगदी सरधोपटपणे सांगावे तर संसारवेलीवर दोन फुले उमलली.. भगवंताला वाटले आनंदाच्या उच्चासनावर बसल्यासारखे.. पण तिथेच भगवंताच्या फरफटीचा द्वितोयोध्याय लिहावयास सुरूवात झाली म्हणा.. त्याची त्याला काय कल्पना असणार?

पोरं मोठी होत होती. गावच्या शाळेत कुणी शेतकऱ्याची कुणी व्यापाऱ्याची अशी कुणाकुणाची मुले. त्यात भगवंताच्या मुलांना आपला बाप काय करतो सांगताना कानकोंडे व्हायला लागले. आपले वडील सिनेमा नट आहेत म्हटले तरी सारे गाव भगवंतास ओळखत होतेच. गावच्या सिनेमागृहातून तमाशापटातला भगवंता कोणाला ओळखू येणार नव्हता? नाच्याची पोरं म्हणून पोरांना आधी वैषम्य नि मग बापाचा तिरस्कार वाटायला इथेही पंधरा वीस वर्षे लागली.. पोरीचं लगीन जुळता जुळेना.. आणि पोराच्या डोळ्यातील हेटाळणी सरेना तेव्हा नियतीच्या या करणीची भगवंतास जाणीव झाली. आजवर टक्के टोणपे खाल्ले, ठेचा लागल्या. लोकांच्या नजरा झेलल्या. हेटाळणीची सवय ही

झाली. प्रत्यक्ष आईबापांनी बायल्या म्हणून हेटाळणी केल्यावर बाकीच्यांबद्दल काही वाटेना झाले. त्यातल्या त्यात सुगंधा म्हणजे त्याची बायको.. तिने सावरून घेतलेले. पण प्रत्यक्ष पोटच्या पोरांकडून अवमान.. भगवंताच्या सहनशक्तीपलिकडचा होता. आजवर जगण्याचे उद्दिष्ट काय याचा विचार कधी केला नसेल त्याने, पण आता जगण्याची गरज काय असला विचार येऊ लागला. कदाचित नाच्या सोडून इतर भूमिका केली तर? हा विचार त्याच्या मनी आला तरी इतर सिनेमावाल्यांच्या लेखी या भूमिकेसाठी तोच उत्तम नि त्याच्यासाठी हीच भूमिका उत्तम असे होणे त्या मायावी नि अर्थकेंद्रित दुनियेत स्वाभाविक होते. भगवंता नाच्या असलेला सिनेमा तिकिटबारीवर हीट होतो इतके समीकरण जुळलेले समजून कुणी त्याला इतर भूमिका देईल तर! ज्या घरादारासाठी मेहनत करावी, त्यांनीच त्याची कमाई तर स्विकारावी पण वाल्याकोळ्याप्रमाणे त्याला झिडकारावे.. अगदी ती कमाई कष्टाची असून ही..

समाजपुरूष हा असाच असतो का? म्हणजे समाज पुरूषच किंवा पुरूषी असावा का? त्याला तथाकथित मर्दपणाचेच आकर्षण असावे का? पुरूष आणि प्रकृती ही दोन अंगे असतील तर त्याच्या मधील कोणास समाजाने इतके नाकारावे का? अगदी अर्जुनास ही कुठल्यातरी शापामुळे बृहन्नडा होऊन एक वर्ष का होईना रहावे लागलेले. इकडे हा शापित असा बृहन्नडेसारखा बनून रहावा का? भगवंताच्या उतारवयात भले ही एक कलाकार म्हणून त्याला मान्यता मिळाली असेल, पण इतर कलाकार सिनेमा नट म्हणून मिरवताना ह्याला तोंड लपवून जगावे लागावे का? समाजपुरूष कित्येक समाजघटकांकडे दुर्लक्ष करतो. त्यांच्यावर अन्याय करण्याबद्दल कोणास काही वाटले असते तर समाजाच्या संवेदना अशा बोथट झाल्या असत्या? अगदी गावचा शेतकरी ते

शहरातील पोलिस किंवा अग्निशामक दलातील कर्मचारी. शासन दरबारी यांना किंमत तशी थोडीच. तरीही त्यांच्या वाटेला अशी आणि इतकी अवहेलना येत नसावी, जी भगवंताच्या वाट्यास यावी? समाजात नामर्दपणाचे खरेखुरे जिवंत पुतळे पदोपदी दिसत असताना या पडद्यावरच्या नटाच्या ललाटावर अशी हेटाळणी आयुष्यभर लिहिलेली असावी?

कोणाला याची उत्तरे ठाऊक आहेत?

.. अर्जुनाचा शाप एक वर्षासाठी होता.. याचा शाप आयुष्यभरासाठी असा असावा की त्याने बृहन्नडा बनून आयुष्य काढावे?

# चार्वाक(?)

ते दोघेही भाऊ. भाऊ पुरूषोत्तम जोशी आणि भाऊ जनार्दन जोशी. आता दोघे भाऊच पण भाऊ भाऊ नाहीत. मात्र तसे भावाभावासारखे. मित्र एकमेकांचे. अगदी शाळकरी,वयापासून ते अगदी आता पर्यंत. दोघे शेजार शेजारच्या नव्या घरात रहायला आले. दोघांची मैत्री दाट. इंग्रजीत फास्ट फ्रेंड म्हणावेत तसे जलद मित्र. पण असे भाषांतर करायला हे काही शासकीय मराठी नाही! तर दोघेही जिगरी दोस्त. शाळा कॉलेजात एकत्र .. दोघांच्या प्रेमकहाण्या एकमेकांच्या

साक्षीने फुललेल्या. अगदी नोकरीही एकत्र एकाच ठिकाणी. जुळे भाऊ असल्यासारखे दोघे. दोघांचे नाव भाऊ असण्यापासून योगायोगाची सुरूवात व्हावी! आता 'भाऊ'ला प्रत्यय लावून त्याचा भाऊराव होतो किंवा भाऊसाहेब. कथनाच्या सोयीपुरता भाऊ पु.जोशी म्हणजे भाऊराव नि भाऊ ज.जोशी म्हणजे भाऊसाहेब म्हणू. दोघे एकमेकांना मात्र भाऊ म्हणूनच हाक मारतात, अगदी गंभीरपणे.

आता झालेली घटना ती ह्या नवीन घराच्या गृहप्रवेशाच्या नंतर. भाऊ पु. म्हणजे भाऊरावाच्या घरी वास्तुशांत झाली. सत्यनारायण घातला गेला.

भाऊ ज. म्हणजे भाऊसाहेब सुट्टी घेऊन त्याच्या घरी राबला. सगळ्याच पूजा होतात तशी ही पण पूजा यथासांगच पार पडली. नातेवाईक आले, मित्रमंडळी आली. पूजेनंतर रात्री सारे शांत झाले. एकमेकांच्या वहिन्या ही थकून झोपी गेल्या. दिवसभरात प्रथमच उसंत मिळून राव आणि साहेब विसावले..

"पूजा छान झाली नाही?" भाऊराव खुर्चीवर विसावत बोलले.

"हो ना.. सगळे जण आले बोलावलेले.."

"तू काही म्हण, सत्यनारायणाच्या पूजेला लोकं येतातच. तीर्थप्रसादाला. अगदी दुरून ही आले सारे.."

"हो ना."

"आपले गडकरी भटजी चांगलेत. अगदी व्यवस्थित पूजा सांगतात. नाहीतर मागे एका लग्नात.. लग्नाची पूजा सांगताना भटजीबुवा चक्क रामरक्षा म्हणत होते. मी टोकणार होतो पण म्हटले जाऊ देत.उगाच विरस कशाला?"

"असू देत रे. लग्नात मारूती स्तोत्र नाही म्हटले ना.. मग बास!"

"हे ही खरंच. नाहीतर सदा ब्रह्मचारी हनुमानाचे नाव घ्यावे लग्नात!"

"बँडवाल्यांचा भरवसा नसतो. लग्नात कदाचित ये क्या हुवा.. कब हुवा.. जब हुवा.. पण वाजवतील.. नाहीतर क्या से क्या हो गया तेरे प्यार में.."

"वाजवतील ही.. पण हे गडकरी भटजी चांगलेत. म्हणून तर इतके बिझी. अरे लकीली आज फ्री होते."

"ही मस्ट बी बी.पी.. बॅचलर ऑफ पूजालाॅजी. बाकी लग्नातला तुझा भटजी मस्ट बी डिप्लोमा होल्डर किंवा पोस्टल कोर्स!"

"असेलही. पण अरे, वास्तुशांत नि सत्यनारायणाच्या पूजेशिवाय नवीन घरी रहायचे कसे? आता त्यामुळे सारे कसे पवित्र वाटतंय."

"हो ना. तुझा हा पवित्रा मला आवडला.."

"वास्तुपुरूष असतो म्हणे. आणि आधी या जागेवर काय काय घडून गेलंय कोणास ठाऊक.. पवित्र करून घ्यावी वास्तू. वास्तू तथास्तु म्हणते म्हणे.."

"हुं.."

"श्रद्धा असते लोकांची. बाकी श्रद्धेशिवाय दुसरे काय आहे जगात?"

"हुं.. श्रद्धा कपूर?"

"तू काही पण बोलतोयस.. आठवून आठवायची ती आपल्या कॉलेजातली श्रद्धा सोमण तरी आठवायची.."

"आता चार दोन पोरं झाली असतील तिला."

"असतील. किंवा नसतील ही. बाकी आपल्याला ही जागा छान मिळाली. शेजारी शेजारी.."

"हो ना. आणि जागा ही छानच आहे.. पक्के नि सख्खे शेजारी.."

"असं म्हणतोयस तर हो शिफ्ट लवकरच इकडे.."

"मी? एका पायावर तयार आहे. लंगडी घालून लंगडत यायला. पण काही महिने तरी लागतील भाऊ.. तुम बुलाओ हम न आए?"

"भाऊ, तू आलास की करून टाकू तुझ्या घरीही पूजा.. मला माहितीय तू पूजाबिजा करत नाहीस. पण ही पूजा महत्वाची. गडकरी भटजींना सांगून करून टाकू.."

"पूजा? भट की बेदी?"

"बरंय आपल्या दोन्ही बायका झोपल्यात. नाहीतर असले काही ऐकून.."

"मला काही धोका नाही यार. आय डोन्ट ॲप्रूव्ह एनी ऑफ देम.."

"आणि ही पूजा?

"ती? नायदर धिस वन.. आता बोललायसच म्हणून सांगतोय. पूजा वगैरे काही नाही. मला वाटतं की श्रद्धा वेगळी नि रिच्युअल्स वेगळ्या.. दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत.. लाइक खडू आणि पांढरा दगड! किंवा चा्ॅक अँड चीज.."

"उगाच इंग्रजी फाडू नकोस.."

"ओ.के. वोण्ट टेअर इंग्रजी.."

"आणि भाऊ, ॲज इफ वहिनी ऐकणारे तुझं?"

"ते खरंच आहे तुझं भाऊ. आपल्याला नकाराधिकार नाही."

"हुं.. नकाराधिकार? जसा काही तुला दुसरा कुठला अधिकार आहे!"

"ते ही खरंच आहे. पण मला नाही पटत. मनाला पटलं पाहिजे."

"हुं.. श्रद्धेच्या ठिकाणी कसले आलेय पटणे न बिटणे?"

"अरे, श्रद्धा कसली? पटणे नव्हे, त्या श्रद्धा सोमणला माहिती होते फक्त नटणे! पण पोथ्या काय.. पूजा काय.. सारे उगाच करत बसायचे. पोथी पढकर पंडित भया न कोय.."

"मला माहितीय तुझा विश्वास नाही ते.. कबिरा.. भाऊराया.. पण आज ऐकतोच तुझी बाजू.."

"अरे वा! ऐकायला तरी तयार झालास! म्हणजे आता देख कबिरा रोया म्हणायला नको! अरे, तो देव थोडीच काही मागतोय? मला काय वाटतं ना, मूलभूत माणुसकी पाळली की त्या देवापुढे हात ही जोडायची गरज नाही. इकडे मारे देव देव करा नि पाठ वळली की कसे ही वागा.. अर्थात तुझ्याबद्दल नाही हे. नाहीतर तू मला आताच हाकलवून लावायचास.. पण देव देव करणारी माणसं ही तुझ्यासारखी चांगली असू शकतात.."

"धन्यवाद! मला चांगला म्हणतोयस.. धन्यवाद!"

"धन्यवाद? अरे उगाच कशाला वाद? पण चांगले वाईट माणूसपण या देवादिकांवर किंवा या पूजाअर्चांवर थोडीच अवलंबून आहे? माणसाने माणसासारखे वागले.. साध्या बेसिक गोष्टी पाळल्या तर कशाला हवे हे सारे."

"चांगले म्हणजे माझ्यासारखे?"

"तू? मी असताना दुसरे उदाहरण का आयात करावे? पण मला वाटते ना की हेच खरेतर जास्त कठीण आहे. सो कॉल्ड देवभक्ती त्या मानाने सोपी. आणि पूजाबिजा केली की थोड्याफार लांड्यालबाड्या देव पचवून घेत असावा का? की एका माणसाने दुसऱ्या माणसास.. त्याच देवाची लेकरे म्हणत.. हीन लेखलेले चालत असावे? देवाच्या भक्ती पाठोपाठ फसवाफसवी नि लाचखोरी? मला सांगा आपल्या देशात इतके सारे आस्तिक नि देवभक्त मग भ्रष्टाचार इतका का? व्हाय हॅव वुई डिसोसिएट गाॅड फ्रॉम डे टू डे लाईफ? आपण देवाला बजावून सांगतो.. देव्हाऱ्यात बसून रहा. पूजा नि नैवेद्याकडे लक्ष ठेव. बाकी आमच्याकडे बघायचे काम नाही! कसे ही वागा नि गंगेत डुबकी मारून पवित्र व्हा.. ही अजून एक सोय! दरवर्षी एक डुबकी की मागची पाटी कोरी.. इस धिस लाॅजिकल?"

"त्या देवासच ठाऊक!"

"पण नाही, हे कुठे बोलायची सोय नाही. लोकांच्या भावना दुखावतील.."

"हे खरंय.. फट म्हणता भावनाबाई दुखावतात.."

"आणि अस्मितताताई पण! दोघी फारच सेन्सिटिव्ह.. फट म्हणता ब्रह्महत्या! अरे, त्या न्यायालयाचा किंवा विधानसभेचाही अवमान ही इतक्या पटकन होत नसेल. विशेषाधिकार भंग!

पण मी तुला सांगू शकतो.."

"ऐक तो मी बापडा .. बापुडवाणा!"

"आणि मला गंमत वाटते ती नवस बोलणाऱ्यांची. देवालाच डायरेक्ट लाच! अरे देवाचे एवढे मानवीकरण करून अपमान कोणी केला नसेल. पण गंमत म्हणजे असे सर्व करणारे ते देवभक्त, सश्रद्ध वगैरे. नि न करणारे.. पाखंडी!"

"पा.. खंडीभर आस्तिक.. पाखंडी इन मायनॉरिटी.."

"मी तर म्हणतो सारे मानव देवाची लेकरे ऐवजी सारे देव ही माणसाचीच लेकरे.. त्यामुळेच त्या जगन्नियंत्या कृपाघन नि दयाघनाला माणसासारखे गुण चिकटवलेत. तो देव नवस फेडला नाही तर रागावतो म्हणे. प्रसाद भक्षण केला नाही तर एखाद्या राजकीय नेत्याचा व्हावा तसा कोप होतो म्हणे. अगदी उकळत्या तेलात वगैरे टाकतो तो.. कृपासागर! मी सांगतो ना इतके त्या दयाळू देवाचे अवमूल्यन माणूसच करू जाणे.. आणि असे करणारा तो आस्तिक. नि माझ्यासारखा तो नास्तिक?"

"शांत गदाधारी भीम.. शांत. पण तू सांगतोस त्यात ला◌ॅजिक आहे. पण मला स्वत:ला नाही पटत. पूजाअर्चा इतक्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या गोष्टी.. पण नवससायासाबद्दल पटतेय मला.."

"अरे, तू आहेस म्हणून मी बोलतोय. दुसऱ्या कोणासमोर असे काही बोलण्याची हिंमत नाही माझी.. आपल्याला लहानपणापासूनच शिकवलेय ते! असं असं कर नाहीतर बाप्पा रागावेल! लहानपणी ठीक आहे पण आपण वयाने मोठे होणार आहोत की नाही?"

"हे खरंय. तू 'अजूनही बालपणात मी' म्हण की.."

"अजून यौवनात मी तरी म्हणायचेस.."

"आणि गंमत म्हणजे ज्या देवाच्या नि धर्माच्या गप्पा मारायच्या त्याच्याच शिकवणूकीच्या विरूद्ध वागावे? अॅज इफ देव स्वत:चे रक्षण करूच शकणार नाही?"

"पटतंय ना तुला?"

"पटतंय. मग तुझ्या घरी पूजा करणार नाहीस?"

"तुला काय वाटतं?"

"अर्थात करशीलच.."

"अर्थात! तुला सांगतो, माझ्या घरी ही अशीच पूजा होणार. नि ती मीच करणार. कितीही पटत नसेल तरीही.. कारण तुझी वहिनी. ती काय मला सोडणार नाही. नि तिच्याखातर सगळे करायलाच लागेल."

"मग ठीक आहे.."

"ठीक काय? पण तुला सांगतो बदल घडवायचा असेल ना तर थोडा विक्षिप्तपणा अंगी लागतो. थोडा कसला, चांगलाच वेडेपणा लागतो. मग आपल्यापुढे कोणी असे सांगायला धजावत नाही. आपल्या पहिल्या महिला डाॅक्टर, आनंदीबाई जोशी डाॅक्टर झाल्या.. ते गोपाळराव जोशी तिरपागडे वागले नसते तर झाल्या असत्या आनंदीबाई डाॅक्टर? सुधारणा करणारे असे तडक फडक नि भडक डोक्याचे असावे लागतात. अंगी प्रसंगी वाईटपणा घ्यायला तयार असणारे. शिव्या खायला तयार असणारे. मला उगाच समोरच्याची बाजू पटते म्हण किंवा माझ्यात नाही हिंमत म्हण. मी फक्त पटत नाही म्हणणार. नि करणार तेच जे मनाला पटत नाही.. नुसता विचार!"

"हुं.."

"आणि तेवढ्यात भागणार असेल तर ठीक. पण आय फील ऑल धिस इज अॅक्च्युअली हार्मफुल अॅज अ सोसायटी. समाजाला चुकीच्या गोष्टी

शिकवल्या जाताहेत. पण मी काय करणार? मी ही त्याच गोष्टी समजून उमजून करणार? मग व्हॉट राईट हॅव आय गा ॅट टू क्रिटिसाइझ अदर्स? मला तर या पूजा वगैरे संकट वाटते. कारण मनाविरूद्ध सारे करायचे. नि आस्तिकपणा मिरवत बसायचे.."

"बाप रे! तुझ्या विदुषकी वागण्यामागे असा विचारी कोणी .. खरेतर अविचारी कोणी असेल

असे वाटले नव्हते.. मी सारे काही देवाचे करतो. पण तुझा विचार अगदीच विचारात न घेण्यासारखा वाटत नाही मला.."

"देअर यू आर! भाऊ, तू असा आहेस म्हणून तर बोललो.. आपल्याकडे फार पूर्वी चार्वाक ऋषी होऊन गेले म्हणतात."

"आय नो! कुणी लोकायत म्हणतात."

"माझा काही डिटेल अभ्यास नाही, पण त्यांचे म्हणणे असेच काही होते म्हणे. समोर जे दिसते तेच सत्य. उगाच स्वर्ग-नरक, देव-दानव असल्या भाकड गोष्टींत वेळ निरर्थक वाया घालवू नका. त्यापेक्षा आजच्या जगण्याकडे लक्ष द्या. माणूस म्हणून जगा नि दुसऱ्यास माणूस म्हणूनच वागवा. पण आपण काय करतो? सगळे संत सांगून गेले, देव देव्हाऱ्यात नाही, पण आम्ही ते फक्त ऐकून दुर्लक्ष करतो. देवळे पालथी घालतोच.. तुकाराम नि ज्ञानदेवांचे आम्ही ऐकत नाही, कबिराला आम्ही किंमत देत नाही.. म्हणजे अगदीच तसे नाही, संत म्हणून आम्ही त्यांचे कौतुक करतो. अगदी पाया पडतो. पण त्यांची शिकवणूक? अगदी देवाच्या नावे चार गोष्टी सांगणाऱ्या या संतांची ही कथा तर नास्तिकता शिकवणाऱ्या चार्वाकाचे कोण ऐकणारे?"

"खरंय तुझे बाबा. इतका हुशार असशील असा संशय कधी आला नव्हता मला. पण खरे सांगू तर इतका विचार मी कधी केला नाही. आईवडील

करायचे म्हणून मी पण तेच करत राहिलो. अजूनही करत राहीन. तुझे विचार पटले तरीही मी काही असा इतक्यात बदलणार नाहीच.. पण एक चार्वाकाचा शिष्य माझा मित्र आहे याचा मात्र अभिमान आहे मला.."

"चार्वाकाचा शिष्य! नाही रे. मी काही इतका मोठा नाही. चार्वाक? उगाच मनात विचार आला म्हणून बोलायचे.. आणि चार ठिकाणी आपला विचार सोडून वाकायचे!"

"खरंय तुझे.. चार्वाका.."

दोघा भाऊंच्या गप्पा झाल्या. भाऊराव पूजा यथासांग झाली म्हणून कृतार्थ तर भाऊसाहेब मित्राला पूर्णपणे नि यथाशक्ती मदत केली म्हणून खूश. दोघांच्या विचारात फरक असला तरी.. दोघांत कितीही मतमतांतर झाले तरी दोघांची मैत्री त्या मतांमुळे कलुषित होण्यातली नाही .. काही महिन्यांतच भाऊसाहेब शेजारी रहायला आले. त्यांच्या नव्या घरीही यथासांग पूजा व्हायची ती झालीच. अगदी 'चार्वाकाचा शिष्य' भाऊसाहेबांच्या हातून.. काहीही न बदलता..

भाऊसाहेब म्हणाले ते खरेच होते, बदल व्हायचा तर माणसाने त्यासाठी वेडेच व्हायला हवे..

- नाहीतर आहेच सारे, मागच्या पानावरून पुढे सुरू..

# अभांड!

अरविंदाचे अजून एक नवे पुस्तक आले. पुस्तक कसले, दोन अंकी नाटकाची संहिता होती ती. थोडा विनोद, थोडा गंभीर मामला. त्यात थोडी स्वगते नि थोडा विचार. म्हणजे मूळ आशय गंभीर, पण उगाच मोठा आव न आणता विनोदाचे आवरण पांघरत गंभीर विषय मांडलेला. त्याच्याच भाषेत बटाटावड्यासारखे.. बेसनाच्या आवरणात मसाला भरलेला! मागे साखरपाकात घोळलेले कारले असायचे किंवा शर्करावगुंठीत कडू गुटिका वगैरे असायची. पण काळानुरूप बदल हवाच. तेव्हा अरविंदाचा हा बेसनात बुडवून तळलेला बटाटावडा!

"बटाटावडा? तुझे हे नाटक म्हणजे बटाटावडा?"

"अर्थात! गोड सगळ्यांनाच आवडतं असे नाही. खमंग तळलेल्या बटाटेवड्याचा वास घेतलायस कधी? त्या वासाने लुब्ध होत लोक येतील आणि मग आतील झणझणीत मसाला.. म्हणजे आपला गंभीर विषय त्यांना चटका लावून जाईल!"

काय लाॅजिक! पण असेल ही. अरविंदा म्हणजे काय.. लेखक. त्याचे लाॅजिक कसे चुकेल?

तर नाटक म्हटले म्हणजे संवाद आले. चुरचुरीत आणि फटकेबाज. संवादांतून उभी केलेली पात्रे नि त्यातून उलगडणारी कथावस्तू .. सारे काही आलेच.

ह्या लेखकांची हीच गंमत असते. म्हणजे एकच लेखक वेगवेगळ्या पात्रांना काय वाटेल त्याचा एकाच वेळी विचार करेल, त्या त्या पात्राच्या तोंडी त्या त्या वेळी फिट बसेल अशी भाषा वापरेल. थोडक्यात एका पात्राचे बोलणे संपले की लगेच दुसऱ्याच्या कायेत प्रवेश करून बोलायला लागेल. अरविंदा हे लीलया कसे जमवत असेल? त्याच्या नाटकातली सगळी पात्रे त्यामुळे खरीखुरी वाटू लागतात का?

"कसं काय बुवा जमतं तुला हे सगळे?"

"कसं काय? कोणास ठाऊक!"

"परकाया प्रवेश! नटाला ठीक आहे, एकाच पात्रात शिरावे लागते, लेखक सगळ्याच पात्रांच्या शरीरात शिरतो. आणि त्याचे त्याचे लाॅजिक, त्याचे त्याचे विचार यावरून भाषा बदलत लिहीत राहतो, त्यात कथानकाची एकसंधता मेनटेन करत.."

"एवढा विचार मी नाही करत! लिहायला बसलो की आपसूक ती ती पात्रेच बोलायला लागतात.."

"ग्रेट आहेस तू.."

"कसलं काय.. पण परकाया प्रवेश करता करता आपली काया विसरायला होतेय.."

अरविंद कॉलेजात असल्यापासून लिहितोय. संवाद लेखन म्हणजे ताकद त्याची..

"तू आणि संवाद.. तुला बरं जमतं सगळं."

"संवाद? ते जमतं.. त्यात तसं मुश्किल काही नाही. परकाया प्रवेश.."

"फॉरेन बॉडी एंट्री?

"वा! गुड ट्रान्स्लेशन! परकाया प्रवेशानंतर आपोआप सुचत जातंय.. त्यामुळे संवाद जमतात.. पण सांगू, वाद नाही जमत."

अरविंदा असाच आहे. भांडण नि वादावादी म्हटले की दोन काय, तर चार पावले मागे हटणारा. आजूबाजूला 'फायर ब्रँड' लोक असताना हा प्रशीतनीतील जळाहुनि शीतल कसा राहतो? अगदी रस्त्यातील भांडण असो की आणि कुठले. अरविंदाला भांडणे जमत नाही. वाद नि विवाद फक्त त्याच्या लेखनापुरता. एखादे संघर्षमय नाटक लिहायचे असेल तर त्यात पात्रांना लढायला लावतो तो. एकमेकांच्या उरावर ही बसवतो. तत्वाचा लढा ही त्याची पात्रे लढतात अगदी जीव खाऊन. पण खरोखरच्या भांडणाची वेळ आली की अरविंदाला शब्द सुचेनासे होतात. त्याची जीभ जड होते की स्वरयंत्र निकामी होते कोणास ठाऊक. शब्दप्रभू म्हणवणारा शब्ददरिद्री एकाएकी कसा काय होतो? याला भांडायला जमत नाही? याची पात्रे 'जोर जुलुम की टक्कर में' संघर्ष करतात. याच्या नायक नायिकांत गोड भांडणे होतात. नवरा बायकोत तर होतातच तिखट आणि मसालेदार. फॅमिली ड्रामात तर याच्या लेखणीला धार चढते. पण याची धारदार लेखणी खऱ्या आयुष्यात जीभ बनली की अशी बोथट व्हावी? संवाद जमावा पण वाद जमू नये? शेवटी वाद हा देखील एक प्रकारचा संवादच की नाही?

"तुला सांगतो, मला ती पात्रे कानात येऊन सांगतात जणू.. असं लिही.. तसं लिही. मी फक्त ते कागदावर उतरवतो.. झाले संवाद.. डायला ॅग्स! आहे काय नि नाही काय!"

"आणि वाद? वादे वादे जायते.."

"ते वाद वेगळे. हे वाद म्हणजे भांडणं नि वादावादी. पण एरवी ही लोकं भांडतात कसे तेच मला कळत नाही.."

"का? अरे लेखकाचे तर आकलन अधिकच चांगले असायला हवे."

"आकलन ठीक आहे. कळतं सारंच.. थियरीत! पण प्रॅक्टिकली भांडायचं म्हटले की वळत मात्र नाही.."

"हे नाही पटत. लोक बघ कसे अद्वा तद्वा बोलतात.."

"तू मला सांगतोयस? मला भांडण्याच्या नाना तऱ्हा माहिती आहेत. म्हणजे राजकीय संघर्ष.. सामाजिक संघर्षापासून रस्त्यातली किंवा ट्रेन मध्ये धक्का लागला म्हणून होणारी भांडणे.. प्रियकर प्रेयसीतील रूसवे फुगवे ते घराघरातली नवरा बायकोची सदासर्वकाळ होणारी भांडणे, प्रा ॅपर्टी नि पैशावरून भावाभावात नि हल्ली बहीण भावांतही होणारी भांडणे.. अगदी आपल्या शेवटच्या हयात मात्या पित्याला पोहोचवून आल्या आल्या सुरू होणारीही.. तशीच क्षुल्लक गोष्टींवरून कुरापती काढत होणारी शेजाऱ्यांची भांडणे.. लायनीत कोणी पुढे घुसतो म्हणून होणारी.. आपला नंबर कसा मागे घालवला म्हणून होणारी रांगांमधली भांडणे.. मग ती रांग रेशनची असो, तिकिटाची असो, बसची असो की दवाखान्यातली.. सगळीकडे भांडाभांडी. यातील खरीखुरी भांडी फक्त नवराबायकोच्या घरात बाकी ठिकाणी प्रत्यक्ष भांडीकुंडी नसूनही भांड्याला भांडी लागतातच! अजूनही भांडणाचे प्रकार सांगता येतील.. माझा प्रा ॅब्लेम असा की यातील सर्व प्रकारच्या भांडणांचं

शब्दांकन मी करू शकतो पण प्रत्यक्षात मात्र बोलू शकत नाही.. संवाद ठीक.. वाद नको.. भांडणं कशी वचा वचा बोलत होतील.. अद्वा तद्वा बोलत.. झिंज्या उपटत नि एकमेकांच्या मातृपितृ घराण्याचा उद्धार करत.. वगैरे कित्येक भाषिक प्रकार असतील. प्रसंगानुरूप भाषा बदलत जाईल.."

"वा! थियरी मास्टर! प्रात्यक्षिकांत दांडी गुल?"

"खरंय तुझं. सांगतो. माझी याबद्दलचीही थियरी आहे."

"पुन्हा थियरीच?"

"म्हणजे माझ्यापुरते डिटेल ॲनालिसिस. हाच परकाया प्रवेश.. भांडण्यापासून परावृत्त करतो मला.."

"म्हणजे कसे काय?"

"टाळी दोन हातांनी वाजते.. मिनिमम दोन. जास्त पण असू शकतात हात. भांडायला तशी मिनिमम दोन तोंडं लागतात.. आता त्यातील दोन पात्रे जोवर माझ्याशी संबंधित नाहीत तोवर मी दोघे काय बोलणार, बोलू शकणार हे प्रेडिक्ट करू शकतो.. पण त्यात माझा रोल ॲक्टिव्हली आला तर.."

"तर काय?"

"तरी ही तेच! समज मी क्ष आहे. आणि य शी भांडतो आहे. भांडता भांडता होतं काय की मला य चीही बाजू कळायला लागते. मग होतं काय.. माझी बाजू आणि य ची बाजू दोन्ही आपापल्या ठिकाणी बरोबर वाटायला लागतात. दोघांच्याही मनातील विचार मीच एकटा करायला लागतो.."

"इंटरेस्टिंग.."

"मग होणार काय? भांडताना कसे आपली बाजूच खरी वाटायला हवे. य हॅज टू बी ऑलवेज रॉंग. नाहीतर भांडणाचा किल्ला लढवणार कसा? म्हणजे

हे असं आहे.. वकील लोक भांडू शकतात.. पण न्यायाधीश? ते कसे काय भांडणार? दोघांच्या बाजू ऐकणार ते!"

"म्हणजे तू न्यायाधीश?"

"नाही! न्यायाधीशाला माहितीय वन ऑफ देम इज राईट! माझ्यासाठी क्ष नि य दोन्हींच्या बाजू एकाच वेळी खऱ्या असू शकतात! प्रा◌ॅब्लेम तोच आहे! वकील मीच नि न्यायाधीश ही मीच! मग होणार की नाही सगळा गोंधळ?"

"बाप रे! ही थियरी मात्र खतरनाक आहे! तसा आहेसच तू थियरी मास्टर म्हणा!"

"अरे कसलं काय! म्हणून मग कुणी याला बोटचेपेपणा म्हणतील कुणी शामळूपणा.. कुणी म्हणेल अरविंदा ना.. कुणाच्या अध्यात न मध्यात.. कुणी अजून काही.. बट आय कान्ट हेल्प इट! आता ही माझ्या मनात माझ्या या बोलण्याबद्दल तुला काय वाटत असेल याचा विचार चालू आहे.. मग अशाने भांडणार कसा मी? लोक अजातशत्रू वगैरे असतात.. तसा मी, अभांड!"

वा! काय शब्द आहे! अभांड! त्याची थियरी त्याने स्वत:पु◌ृरती पटवून घेतली असणार. पण बाकी कोणाला म्हणजे मलाही याची थियरी पटो न पटो.. त्याला त्याबद्दल काय बोलणार? त्याच्याशी यावरून वाद घालणे अशक्यच. आणि भांडणे तर दूरची बात.

- शेवटी त्याच्याच भाषेत.. बोलून चालून अभांड तो!

# नवरे!

नंदन नवरे.. नावाने नवरे असला तरी बोहोल्यावर चढून प्रत्यक्षात नवरा होईतोवर तिशी गाठलेली बेट्याने. म्हणजे नंदन स्वत:ला शहाणा समजत मूर्खांच्या नंदनवनात राहायचा असे नाही. आपल्या होणाऱ्या .. जी कुणी असेल.. तिच्याबद्दल फार अपेक्षा होत्या असेही नाही. म्हणजे अस्मानीची परी नसावी, पण किमानपक्षी बरी असावी असे कुठल्याश्या कवितेत म्हटले आहे ते नंदनला समोर ठेऊनच असावे! तसा नंदन इंजिनियर. त्यामुळे कॉलेजात सगळा मुलांचा कारभार. औषधाला चार दोन मुली. मागणी आणि पुरवठ्यात गफलत झाली की जी गत होते तसा कॉलेजचा सीन. त्या चार दोन बॅचच्या पोरी, नि पाठोपाठ येणाऱ्या बॅचेसमधल्या काही.. हातोहात बुकिंग होत क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास या कवितेची आठवण करून द्यायच्या. त्यामुळे त्या चार वर्षांनतर नंदन नर्मदेतल्या गोट्यासारखा कोरडा बाहेर पडला तर आश्चर्य नव्हते. नाही म्हणायला कॉलेजातून बाहेर पडल्यावर त्याच्या पहिल्याच जॉबमध्ये पहिल्याच दिवशी त्याला आवडावी अशी कुणी त्याच्याच बरोबर जॉइन झालेली. तिच्याशी ओळख नि मैत्री होईतोवर एक दिवस तिने मोठ्या आग्रहाने 'नक्की ये हं' आमंत्रण देत तिची लग्नपत्रिका हाती दिलेली! न जुळलेल्या प्रेमाचा भंग असा समोर होताना दिसला नि नंदनने आशा सोडली. आपल्या आडनावात अनेकवचनी उल्लेख असूनही एकवचनी नवरा बनण्यासाठीही कुणी भेटू नये? मैत्रीण.. गर्लफ्रेंड .. प्रेयसी.. नि पुढे जोडीदारीण.. पत्नीपदावर आरूढ झालेली..

अशी कुणी दिसू नये.. भेटू नये? मोठे लोक सांगून गेलेत, सगळे वेळच्यावेळी होणं चांगलं.. ते आठवून आता पश्चात्ताप करून काय फायदा? म्हणजे कॉलेजातच जरा जास्त प्रयत्न केले असते तर कुणी भेटली असती. पण नाही! आता बैल गेल्यावर झोपा करून काय उपयोग?

थोडक्यात नंदन नवरे ह्या 'नवरे'कुलोत्पन्न एकुलत्या एक होतकरू तरूणाची लग्न जमेतोवर ही हालत होती. शादी का लड्डू न खाऊन पश्चात्ताप होण्यापेक्षा खाऊन पश्चात्ताप होणं बरं या निर्णयावर येऊन पोहोचला तो, तोवर त्याच्या वाढदिवसाच्या केकवर मोजून तीस मेणबत्त्या लावल्या गेल्या होत्या! आपली दुखभरी दास्तान तो कोणाला सांगणार? कारण तोवर त्याच्या मित्रांपैकी बहुतेक शादीका लाडू खाऊन नि पचवून मोकळे झालेले. त्यांच्या घरी वहिनीच्या हातचा चहा प्यायला मध्ये मध्ये जायचा तो, तरी ही किती वेळा तो जाणार होता? त्याच्यासारखे समदु:खी एक दोघे त्या आघाडीवर कामाला लागलेले. तिसरा होता त्याला घरून रसद मिळालेली नि ठरवून लग्न जमलेले.. नंदन नवरे तोवर नंदन ननवरे म्हणवत फिरत होता! मोस्ट एलिजिबल बॅचलरचा अदृश्य टॅग गळयात बांधून, कुणाच्या गळयात मंगळसूत्राचा टॅग बांधावा याचा न संपणारा शोध सुरू होता. रस्त्यात भेटलेल्या एका विवाहित अनुभवी मित्राने, असाच सुखी रहा असा आशीर्वाद वजा इशारा दिलेला तेव्हा नंदनच्या कपाळावर आठ्यांचे जाळे दाट झालेले. आहे रे वर्गातील कोणी नाही रे वर्गातल्या कोणास असे माझ्याहून तूच सुखी म्हणावे?

"अरे, आता आम्ही समदु:खी सारे, मॅरीड मेन्स असोसिएशन स्थापन केलेय.. त्याच्याच मिटींगला चाललोय! एकमेकांची दु:खे वाटून घेतली की कमी होतात म्हणतात!"

तो नंदनला म्हणाला नि नंदन जगात दु:खाच्या किती व्हरायटीस असाव्यात या विचारात पडला! आजवर उपवरपदावरील तो वामांगी कुणी नसल्याने स्वत:ला दु:खी समजत होता नि हे मॅरीड मेन.. वामांगी कुणी असल्याने!

काही असो, शोधिसी नंदना, राऊळी मंदिरी खरेतर, कॉलेजी ऑफिसी.. सारखी वधू संशोधन मोहिम आखली असती तरी त्याच्या कुंडलीत तो योगच नसावा तोवर! म्हणजे नव्हताच! असता तर तो ही नसता का बसला त्या मॅरीड मेन असोसिएशनच्या मिटींगमध्ये!

"हे कुंडलीतील ग्रह लग्न जमू देत नाहीत बरं. आता या वर्षी योग आहे! बरं का नंदना.. गुरूजी म्हणालेत मला. म्हणजे या वर्षी मांडव उभा राहणार घरासमोर!" त्याची सासुपदोत्सुक आई त्याला म्हणाली, त्यातील 'मातुल घरण्यातील शाप अडतो' हे डिटेल्स वगळून!

पाठोपाठ "म्हंजे.. सूनमुख पाहणार नि नातवाला मांडीवर खेळवणार मी.." त्याच्या आजीचा स्वप्नविहार! लोक उद्याचा भरवसा न देत नाहीत नि ही नव्वदीतील खणखणीत आजी नातवाचं शु ने भिजलेलं दुपटं बदलण्याची स्वप्न पाहात किमानपक्षी वर्षभराच्या आयुष्याची बेगमी करू पाहात होती! तो विचारात पडला, म्हणजे जांभळाच्या झाडाखाली तोंड उघडून पडावे नि तोंडात आपोआप जांभूळ टपकण्याची वाट पहावी? आपोआप ती राजकुमारी घोडीवर बसून येईल? मुलींच्या स्वप्नात राजकुमार घोड्यावर येत असेल तर मुलाच्या स्वप्नात राजकुमारी घोडीवर बसून येऊ शकतेच! समतेच्या या युगात किमान विचार तरी असा करता येऊ शकतोच!

मग युद्धपातळीवर विचार सुरू झाला. कुंडल्या मांडल्या गेलेल्याच.. त्यावर आधारित शोधाशोध सुरू झाली. कुठे कुठे सांगावे धाडले गेले. गावोगावी खबर गेली. मित्रमंडळींत बातमी पसरली.. नंदन नवरे नवरा बनण्यासाठी बाशिंग बांधून बसलाय हो.. यंदा कर्तव्य आहे!

या वर्षी बार उडवणे हेच कर्तव्य असल्यासारख्या हालचाली होऊ लागल्या. कुठून कुठून निरोपांची देवाणघेवाण होऊ लागली. खलिते गेले. पत्रोपत्री नि फोनाफोनी झाली. पाठोपाठ मग कांदेपोहे खाण्याचे कार्यक्रम! नंदन किती बदलला या विवाहातुरतेत याचे उदाहरण म्हणजे ते कांदेपोहे ग्रहण नि चहापान! आजवर कधी पोहे नामक प्रकार नंदनच्या घशाखाली उतरत नसे. तो आता आठवड्यात एकदा कांदेपोहे खाऊ लागला, अगदी लिंबाची चतकोर फोड रीतसर पिळून! कॉफी हेच जगातील सर्वोत्तम पेय मानणारा, त्या मतास मुरड घालत चहाचे कप रिचवू लागला. नंदनला मुलगी आवडली की काही न काही अडचणी मध्ये येत नि पुढे परत एकदा त्याच कार्यक्रमासाठी कुठे न कुठे भ्रमंती करावी लागे. जाताना उत्साहात जाणारे सारे परतले की दुर्मुख होऊन बसत नि आजीला तो नातवाचा दुपटी बदल सोहोळा अजून किती पुढे जातोय याची चिंता लागे! इकडे मॅरीड मेन्स असोसिएशन जोरात कार्यक्रम करतेय नि नंदन त्या असोसिएशनच्या मेंबरशिपसाठी क्वालिफाय व्हायचे जोरदार प्रयत्न करतोय!

तसे नवरे कुटुंबाचे फॅमिली ज्योतिषी बऱ्यापैकी साधे सरळ असावेत. नाहीतर आतापर्यंत कुठल्या न कुठल्या ग्रहताऱ्यांची शांती नि पूजा करण्याची सूचना आली असतीच. त्यासाठी खर्च करण्यास नवरेंची ना नव्हती, पण ती सूचनाच न आल्याने फक्त मानवी प्रयत्नच हाती असलेले नवरे कुटुंब नंदनला ब्रह्मचर्याच्या नंदनवनातून बोहोल्यावर चढवायला अजून किती झटणार होते?

शेवटी मराठी स्वयंवर, अनुरूप, मनोमीलन अशा प्रकारच्या नावाच्या वर नि वधू पाहिजे मधील जाहिरातीत नंदनची रीतसर जाहिरात दिली गेली. त्यात त्याचे वर्णन उच्चशिक्षित, मनमिळाऊ, देखणा, हँडसम वगैरे करण्यात आले. नंदन आपल्यातील ह्या सर्व गुणांचा समुच्चय नक्की कुठे असावा याचा विचार करत त्या छोट्या जाहिरातींना मोठा प्रतिसाद मिळण्याची वाट पाहात बसला! झाले इतकेच की नवरे कुटुंबाच्या पोटात अजून कांदेपोह्यांची भर पडली.. कित्येक लिटर चहा पोटात गेला. आजीची चिंता वाढली.. गुरूजींनी सांगितलेल्या भविष्यावर विश्वास ठेवत दिवस सरू लागले.. वर्ष सरायला अजून काही महिने बाकी होतेच! बाकी हे वर वधू संशोधन म्हणजे दात आणि चणे एकाचवेळी असण्यासारखे कठीण. कधी दात आहेत तर चणे नाहीत, नि कधी चणे आहेत तर दात नाहीत.. दोन्ही गोष्टी एकाच वेळी येण्याचा समसमा संयोग जुळून येणे इतके कठीण असावे? नि त्या नंतरही जगात इतकी लग्ने जमत असावीत? लग्नसराईच्या मोसमात पहा, आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे लग्न गडे असेच दिसते, मग या क्वालिफाईड इंजिनियरास एक मुलगी मिळू नये? कुंडलीतील ग्रहांनी असा मिळून कट रचावा?

पण सबुरीचे फळ गोड असते म्हणतात. असणारच. झाडावर फळ पिकण्याची वाट पाहावीच लागते. तिकडे सबुरी हवीच. तसेच ह्या वाट पाहण्यास फळ मिळाले. अगदी त्याच वर्षात नाही पण जानेवारीच्या प्रथम सप्ताहात कुठला तरी ग्रह कुठल्या तरी राशीत प्रवेशण्याआधी दोन्ही कडून होकार झाला.. नंदनच्या मातेचे सासूपणाचे स्वप्न साकार होणार होते, ती तयारीस लागली. म्हणजे ललिता पवार सारख्या पिसवांसारख्या सासवांपासून रिमा लागू सारख्या प्रेमळ सासूमां चे सिनेमे ती पहायला लागली. आजीला

आता मांडीवर नातू खेळवण्याचे स्वप्न जवळ आल्याचे दिसू लागले. तिने जुन्या लुगड्यांची दुपटी डायरेक्ट शिवायला घेतली.. नंदन आपल्या नव्या कोऱ्या प्रियेच्या स्वप्नरंजनात रमला.. नि त्याचे बाबा ह्या सगळ्या स्वप्नांना सत्यात आणण्यासाठी हाॅल नि बाकी व्यवस्थेच्या मागे लागले!

नंदन नवरे बोहोल्यावर चढला. म्हणजे नवरे नवरा झाला! मंगलाष्टकांच्या सुरांबरोबर त्याच्या प्रियेने एक निश्चय केला.. वाजवा रे वाजवा झाल्यानंतर वाकवा रे वाकवा! थोडक्यात नंदन आता वाकणार होता. आधी स्वखुशीने.. नंतर सवयीने! नव्याच्या नवलाईचे एंजॉयमेंट झाले. त्या धुंदीत नंदनला आजूबाजूचे दिसेनासे झाले. ते साहजिकच होते.. नाहीतरी हिंदीत धुक्याला धुंद हाच तर शब्द आहे! शादीचा तो गोड लाडवाचा गोडवा आधी सुखावत होता नि हळूहळू जिरत होता. त्याचे ते ऑलरेडी मॅरीड मेन्स असोसिएशन वाले कधीमधी भेटायचे.. नि ह्या असोसिएशनचे प्रयोजनच काय हा प्रश्न नंदनला पडल्यावाचून रहायचा नाही..

दिवस सरायला वेळ लागत नाही. नवलाई संपतेच. संपली नाही तर ती नवलाई कसली? थोडक्यात नेहमीप्रमाणेच सारे झाले. जगरहाटी आणि काय? रिमालागू सारखी आई थोडी ललिता पवारत्व दाखवू लागली.. आता मी मरायला मोकळी म्हणत आजी आपल्या मांडीवर नातीला खेळवायला लागली.. प्रिया आपल्या वाकवा रे वाकवा बाण्याला जागत नंदनला वाकवण्यात वाकबगार झाली.. वाकलेल्या फांदीवरून पक्व फळे तोडावीत तशी आपल्या मेहनतीची फळे उपभोगू लागली.. खुशीने वाकणारा नंदन आता ओझ्याने वाकू लागला.. रूसव्या फुगव्यांच्या रूपात घरात शिरलेला भांडणाचा

आवाज आता भांडी वाजण्यापर्यंत पोहोचला! सुसंवादिनी प्रिया करवादत करवादत करवादिनी झाली.. नंदनला मग मॅरीड मेन्स असोसिएशनची आठवण न येती तरच नवल!

नंदनच्या येण्याबरोबरच मॅरीड मेन्स असोसिएशनच्या सदस्यांत एकाची भर पडली. आजवर ह्या असोसिएशनचे प्रयोजन काय हा पडणारा प्रश्न आता नंदनच्या मनातून कधीच मागे पडलेला.. आता नंदन त्यांचा एक रेग्युलर सभासद बनणार होता!

असोसिएशन मध्ये पहिलाच दिवस! प्रथेप्रमाणे नवीन सदस्यास सर्वांना संबोधित करायचे होते.. नंदनला हा नियम माहिती असण्याचे कारण नव्हते.. तसा तो वक्तृत्वासाठी प्रसिद्ध नव्हता कधी तरीही त्याने उत्स्फूर्त भाषण ठोकले..

"लग्न म्हणजे चंद्र रूपी प्रेयसीचा सूर्यरूपी तप्त गोल होण्याकडे प्रवास! इथे कलेकलेने चंद्र बदलत जातो नि सूर्यात परिवर्तित होतो! मग कलाकलाने त्याची धग सर्वात जवळ कोण.. तर नवऱ्याला लागतेच! आपले हे असोसिएशन समदु:खींचे आहे असे मला सांगण्यात आले होते. तेव्हा ही समदु:खित्वाची भानगड मला कळली नव्हती. आता इतरांशी बोलण्यातून कळले ते हेच, घरोघरी मातीच्याच चुली.. तसे हे मॅरीड मेन्सचे समदु:खित्व! गेल्या काही वर्षांत लक्षात आले ते हेच की, आपले पारडे नेहमीच हलके. त्यात कितीही वजन ठेवले तरी. मग सर्व झगड्यात आपली हार ठरलेली. नि शत्रुपक्षाची जीत. त्यामागे तर्कशास्त्राचे काम नाही. कारण कितीही तर्क लढवण्यात गर्क झालो तरी या मागचे गमक समजायचे नाही.. मला वाटते, कुठलेही लाॅजिक नसणे हेच तर या मागचे लाॅजिक आहे नि तेच या शत्रुपक्षाच्या यशाचे मर्म आहे.. आपली बाजू कधीच जिंकणाऱ्यातली नाही हे समजून या मॅरीड मेन्स ॲनॉनिमस

मध्ये एकमेकांची समजूत काढणे ह्यास दुसरा पर्याय नाही.. नसावा. या असोसिएशन मध्ये आले ही बहु.. येतीलही बहु.. परि या सम हा.. इथे शेवटच्या भागाचा अर्थ असा.. किती ही आले नि येवोत, इथे सारे प्रवासी एक सारखेच. एकाच संसाररथाचे सारथी! खरेतर घोडेच, ज्याचा लगाम आपापल्या पत्नीहाती आपण सोपवला आहेच.. कुणी स्वखुशीने, कुणी नाइलाजाने, तर कुणी नकळत!"

टाळयांचा कडकडाट झाला..

आतून आलेल्या त्या भाषणाला वेगळ्या तयारीची गरजच काय? नवरा तितुका मेळवावा.. सहनशक्ती धर्म वाढवावा हे ब्रीद मानत मॅरीड मेन्स असोसिएशन आजही कार्यरत आहे. नंदन नवरे नंतर इतरही नवरे येत आहेत.. सदस्य संख्या वाढतच आहे.. नवऱ्यांचा प्रवाहो चालला आहे.. नि नंदन नवरेचा त्यात सक्रिय सहभाग वाढतच चालला आहे..!

# आलू

सुप्रसिद्ध रंगकर्मी श्री.आलोक आकोलकर यांचे दु:खद निधन. मृत्युसमयी त्यांचे वय ५६ वर्षे होते. अगदी तरूण वयापासून रंगभूमीची निरलसपणे सेवा करणारे आलोक आकोलकर विविधरंगी भूमिकांसाठी प्रसिद्ध होते. त्यांची काही विशेष गाजलेली नाटके.. अमुक तमुक असून अमुक अमुक अशा कित्येक मराठी चित्रपटांतही त्यांनी आपल्या अभिनयाची कमाल दाखवली होती.. त्यांच्या मागे पत्नी, मुले इ.इ...

यातील आलोक आकोलकरचा ५६ व्या वर्षी मृत्यू आणि रंगभूमीशी संबंध इतका सत्य मजकूर सोडला तर बाकी काही खरे नाही. आणि अर्थातच असे काही छापून येणे शक्य नाही. खरेतर आलोक आकोलकर काळाच्या पडद्याआड गेला काय किंवा न गेला काय.. त्याची बातमी छापून येणेही अशक्यच होते. तसे बातमी मूल्य ते त्याच्या नावास होते कुठे? पेपरात छापून यायला कुणीतरी मोठा माणूस गेला पाहिजे.. मग तो सुविख्यात असो की कुविख्यात. आलोक सारख्या निरूपद्रवी माणसाचे नाव छापून पेपरवाले काही इंच कॉलम स्पेस कशाला खर्ची घालतील? अर्थात कुणी श्रद्धांजली म्हणून जाहिरातवजा मजकूर दिला तर काय तो रेट असेल तो आकारून तसा मजकूर

पेपरात छापून आणता आला असता. पण तसे करण्यात कोणाला इंटरेस्ट तर हवा ना!

बिचारा आलोक, कामाच्या शोधात हरकाम्या म्हणून रंगमंचावर चढला कित्येक वर्षांपूर्वी .. बॅकस्टेज नंतर कधीतरी तोंडावर रंग चढला.. पडेल ते काम करणारा म्हणून प्रत्येकाचा उजवा हात बनला.. आधी दुसरे काही जमत नाही म्हणून इकडे काही रूपये रोजावर लागलेला हरकाम्या.. स्टेजची जादू पाहून त्याला थिएटरची भुरळ पडली. मग त्या नाटकाच्या तालमी काय, थिएटरातले प्रयोग काय.. सारे पाहात पाहात आलोकच्या डोक्यात शिरून घर करून राहिले ते नाटक एके नाटक. मोठमोठ्या कलावंतांच्या येण्याने होणारा टाळयांचा कडकडाट कानात साठवणारा आलोक कधी मधी छोट्या छोट्या भूमिकांत दिसायला लागला. पण ते सारे बाकी व्यवधाने सांभाळून. अगदी नटनट्यांच्या चहाची सोय, मेकपची व्यवस्था, स्टेज, प्राॅपर्टी, लायटिंग, सेट, म्युझिक.. कोणाला कुठूनतरी पिक अप.. पडेल ते काम.. पडदा पाडण्यापासून उघडण्यापर्यंत नि परत पडून उघडण्यापर्यंत.. आलोक आकोलकर सर्व संचारी. पुलंच्या नारायणासारखा.. सर्व संचारी, सर्वांच्या मदतीस धावणारा नि पडेल ते काम करणारा.. त्यामुळे लोकप्रिय. लोकप्रिय खरा, पण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत. म्हणजे त्याची लोकप्रियता त्याची पडलेली कामे करून घेण्यापर्यंत टिके. कोणी नट ऐनवेळी सापडला नाही तर फुटकळ कामासाठी गळ घातली की आलोक आपला रंग फासून नाटकात उभा रहायला तयार. पुढे मागे कुणी मोठा रोल देईल अशा आशेवर असणाऱ्या आलोकच्या तोंडास पाने पुसली जाणे इतकी वर्षे सुरू राहिले की बिचाऱ्यास हे असेच व्हायचे नि होत असते नि होत राहणार हे मनोमन पटायला लागलेले. त्याला प्राक्तन नि दैव असले मोठमोठे शब्द माहित नव्हते त्यामुळे 'नशीब माझं' म्हणत नाट्यसृष्टीचा गाडा ओढण्याचा आपल्या

कुवतीनुसार खारीचा वाटा आलोक उचलत राहिला. प्रयोग बसण्याआधी तालीम, ती लगबग, मग रंगीत तालीम, सेट, कपडेपट, प्रयोगाआधी अस्वस्थ नटवर्ग.. तिसरी घंटा झाली की नाटकातली पात्रे अंगात शिरल्यासारखा वागणारा.. सारे काही मंतरलेले.. त्या वातावरणाच्या मोहात तो गुरफटत राहिला. कधी त्याला सारं सोडून काही दुसरे काम करायचे सुचे नि नेमकी तेव्हा कुठली तरी छोटी भूमिका पदरात पडली की त्याच्या छोट्या भूमिकांची नशा त्याला कित्येक दिवस पुरत राही. नि तीच त्याला परत त्याच दुनियेत ओढून आणे. पुढे ती चाकोरी अंगवळणी अशी पडली की या वाचून दुसरी दुनिया आहे हेच त्याला पटेनासे झाले. आधीच नाटकाची मायावी नि आभासी दुनिया. कलेची उपासना म्हणावे तर त्याच्या कामाचा कलेशी संबंध कितपत याची शंका यावी. पण मोठमोठ्या अभिनेत्यांच्या भाषणातून रंगभूमीची सेवा हे शब्द त्याने कधीतरी उचलले नि तेच जणू जीवनध्येय असल्यासारखा तो रंगभूमीच्या थोडा पुढे नि बराचसा मागे अखंड खपत राहिला.

या आलोक आकोलकरला कुणी कधी आलोक म्हणून हाक मारली नाही. आकोलकर किंवा श्री.आकोलकर वगैरे दूरची बात. अगदी तरूणपणी चिकटलेलं नाव म्हणजे आलू. नि हे आलू नाव वयाची पन्नाशी आली तरी तसेच राहिलं. पुलंच्या नारायणाची सुरूवात नारायणाला विविध दिशांहून मिळणाऱ्या वेगवेगळया आदेशवजा विनंतीतून जशी होते तशीच गत आलोक ऊर्फ आलूची. मग त्या चाळीशी वा पन्नाशीला पोहोचलेल्या श्री.आकोलकरांना कुणी नवखा, देखणा तरूण तडफदार पंचविशीतला नट ही 'अरे आलू..' म्हणून एकेरी संबोधतो आणि ऑर्डरी सोडत सुटतो. कुणी दुसरा

बॅकस्टेजवाला ही काही काम सांगतो.. नि मुख्य नट नि नट्यांचे काय.. ते तर सांगायलाच नको.

आलूची मनीषा.. खरंतर आकांक्षा एकच.. आपल्या नावाचे काहीतरी रंगभूमीशी संबंधित असावे. पेपरातल्या जाहिरातीत एकदा तरी नाव छापून यावे.. नाटकाच्या समीक्षणात येणे किंवा एखादे तरी नाटक त्याच्या नावाने ओळखले जाणे ही फारच दूरची गोष्ट. बिचारा नाटकाच्या जाहिरातीतही 'आणि इतर' मध्येच राहिला. कुठेतरी त्याच्या रंगभूमीवरच्या अस्तित्वाची नोंद व्हावी ही त्याची अपेक्षा जास्तच म्हणावी का? वयाच्या पंधराव्या वर्षी रंगमंचावर चढलेला आलोक.. छपन्नाव्या वर्षी रंगभूमीच्या इतिहासात 'नाही चिरा नाही पणती' म्हणावे असा गेला.. त्याच्या जाण्याने दोन चार दिवस सगळयांचे अडणार असले तरी आधीच शो मस्ट गो ऑन ब्रीद असलेली रंगभूमी त्याच्या जाण्यानंतर थोडीच थांबणार होती? तशी ती थांबली नाहीच. फक्त थोडेफार सहृदयी जवळचे लोक इतर कोणाच्याही जाण्याने हळहळावेत तसे नि तितके हळहळले इतकेच.

अशा ह्या आलोकने आपल्या पन्नासाव्या वाढदिवशी कुठेतरी स्वत:च नोंद असावी म्हणून खास भाषण तयार करून ठेवलेले. एखाद्या नाट्यसंमेलनात करावे असे. आपल्याच कारकीर्दीची आपली आपणच नोंद करून ठेवावी असे. बाकी आपली कुणी नोंद घेत नसेल तर अशी नोंद करण्यावाचून पर्याय तरी काय होता त्याच्याकडे?

'मी आलोक आकोलकर. ऊर्फ आलू. नाटकाशी संपर्कात आलो त्याला पस्तीस वर्ष होत आली आहेत. अखंड नि अव्याहत नाट्यकर्मींशी मी

संबंधित आहे ही गेली पस्तीस वर्ष. रंगदेवतेला नमन करून आता जीवनाच्या पन्नाशीनंतरच्या अंकाला सुरूवात करत आहे. नाट्यक्षेत्रात राहून काही चांगले कानावरून गेले आहे.. त्यातील शब्द.. तशी भाषा वापरून आपलीच नोंद आपणासाठी करून ठेवावी म्हणून कुठेही कधीही न केले जाईल असे माझे हे भाषण वजा मनोगत. अर्थात कोण कधी हे वाचेल असेही नाही. तरीही नाटकात राहून इतका तरी नाटकीपणे व्यक्त झालो नाही तर गेल्या पस्तीस वर्षांत शिकलो काय मी? आजवर मोठमोठे अभिनेते पाहिले, अभिनेत्र्या पाहिल्या, लेखक दिग्दर्शक पाहिले. अगदी जवळून. म्हणजे अगदी चहाचा कप देण्याच्या निमित्ताने का होईना.. जवळून. कित्येक म्हणजे शेकडो नाटकांच्या तालमी पाहिल्या, शोज पाहिले. कधी प्रेक्षकांचा खडखडाट पाहिला तर कधी हाऊसफुल्ल गर्दी पाहिली. प्रा ॅम्प्टरच्या मदतीने पार पाडलेले काही प्रयोग पाहिले. कधी मोठ्या नटाच्या छांदिष्टपणामुळे भर रंगमंचावर झालेला गोंधळ पाहिला. काही क्लासिक शोकांतिकांच्या वेळी मुसमुसणारा प्रेक्षक वर्ग पाहिला नि गडगडाटी हास्याने भरलेले थिएटरही पाहिले. तीन अंक संपवून मनोभावे चौथा अंक रंगवणारे कलाकार नि त्यांनी केलेला कल्ला पाहिला. अगदी छोट्या भूमिकांतून वर येत मोठे झालेले नट पाहिले नि काही मोठमोठ्या नटनटांच्या मातीच्या पायांमुळे त्यांना छोटे होताना पाहिले. सांगू नये तरी सांगतो.. पडद्यामागे होणाऱ्या कित्येक भानगडी पाहिल्या. प्रयोगामागे प्रयोग करत श्रीमंत झालेले निर्माते पाहिले तसेच देशोधडीला लागलेलेही काही पाहिले. पस्तीस वर्षात दुनिया कितीतरी बदलली. नाटकं बदलली. नाटकांचे फॉर्म बदलले. प्रेक्षक बदलला. या सर्वांत बदललो नाही तो एक मी. आलू म्हणून आलो नि आजवर आलू म्हणूनच राहिलो. माझं आलोक हे नाव किती जणांना ठाऊक आहे कोणास ठाऊक. पण आलू म्हणून सारे ओळखतात मला. पण खरं सांगतो,

हे नाव अगदी यथार्थ ठरले माझ्यासाठी. माझ्या आजवरच्या आयुष्यात प्रसिद्धीचा प्रकाश कधी दिसला नाही. आलोकचा अर्थ प्रकाश असेलही पण त्याबाबतीत हा आलोक अंधारातच राहिला. पण आलूने मात्र नाव सार्थकी लावले. आजवर पस्तीस वर्षात कमी तिथे आम्ही म्हणत पडेल ते काम करत आलोय. कुठल्याही भाजीत आलू घातला जावा तसा. ती भाजी त्या आलू.. बटाट्यामुळे नाही ओळखली जात.. तशी ह्या आलूला स्वत:ची ओळख नाही. जिथे हवे तिथे फिट होणारा तो हा आलू. आजवर सेवेत रत होता. रंगदेवतेला स्मरून सांगतो, यापुढेही राहिल. हवे तिथे हवे तसे काम करत राहिल. आजवर आलू हे नाव सार्थ ठरवले.. यापुढेही तसे ठरवत राहिन.. पन्नाशीचा टप्पा नाटकात नि आयुष्यातही महत्वाचा. पन्नास प्रयोग झाले की नाटकाला वेगळी झळाळी चढते. मग ते नाटक पुढे जात राहाते. शतकी प्रयोगाकडे. तसा हा आलू, रंगभूमीच्या सेवेत राहिल..'

आज आलू नाही. त्या मनोगतानंतर पाच सहा वर्षात आलोकचा खेळ संपला. आलू आपले नाव सार्थ करत कमी तिथे मी म्हणत जगला.. आपली दिलेली भूमिका व्यवस्थित निभावली त्याने.. आपला रोल संपला नि विंगेत निघून गेला. त्याच्या जीवनात फारसे नाट्य नसेलही पण त्या नाटकावर आता पडदा पडला. एरवी पडलेला पडदा परत कधी ना कधी वर जाणार असतो. आलोकच्या जीवनावरचा हा पडदा काळाचा. कधी न उठणारा..

# टॉपर!

खूप दिवसांनी मॉडर्न कॉलेजात जाणे झाले. गेटवरचा वाॅचमन नवीन होता.

"आत जायला परवानगी नाही.."

खास वाॅचमनी आवाजात तो ऑर्डर देता झाला.

"अहो मी जुना स्टुडंट. याच कॉलेजचा."

"वरून ऑर्डर आहे .. कोणाला सोडायचे नाही.."

मी पुढे काही बोलणार तेवढ्यात आतून हाक आली.. तो सहदेव होता. सहदेव चंदनशिवे.

"अरे! टॉपर तू? इतक्या वर्षांनी? अरे चल.. आत ये.. त्यांना सोडा आत.." सहदेव शेवटचे वाक्य त्या वाॅचमनला उद्देशून म्हणाला.

"सर तुमचे मित्र आहेत?" वाॅचमन अजीजीने म्हणाला नि त्याने आत सोडले.

"चल.. मी आता मोकळाच आहे. कुठेतरी बसूयात.."

शनिवार दुपार होती. सहदेवच नाही तर कॉलेजही तसं रिकामंच होते. कट्ट्यावर कॉलेजची तीन वर्षं काढलेली.. त्याच कट्ट्यावर बसलो. जुने दिवस डोळ्यांसमोरून तरळून गेले..

सहदेव चंदनशिवे एकेकाळचा माझा कॉलेजातला मित्र होता. मित्र म्हणजे आम्ही बॅचमेट्स. मी पुढे बसणारा. बहुतेक विषयांत पहिला येणारा म्हणून टॉपर नाव पडलेलं. त्या उलट सहदेव. बॅकबेंचर. बहुधा क्लास बंक करणारा. कट्ट्यावर टिवल्याबावल्या करणारा. घरचा सामान्य परिस्थितीतला. रापलेल्या काळा वर्णाचा. उंचापुरा आणि व्यायामाच्या शरीराचा. अभ्यासात यथातथा. कॉलेजच्या शेवटच्या वर्षी नापास झालेला. त्या आधी नापास होता होता बचावणारा. तसे आम्ही जवळचे मित्र वगैरे नव्हतो पण ओळखदेख होती. परिचय होता. गॅदरिंगच्या एका नाटकात आम्ही दोघेही होतो तेव्हा सहदेवची बऱ्यापैकी ओळख झालेली. कॉलेज सुटले. मी पुढे दुसऱ्या युनिव्हर्सिटीत एम.एस्सी.साठी गेलो. सहदेवशी तसा माझा संपर्क नव्हताच, मी आणि माझे काही मित्र टॉपर्समधले. त्यामुळे बॅकबेंचर्सशी तितकासा संपर्क तेव्हाही नव्हता नि नंतर तो रहायला काही कारणही नव्हते..

"अरे, किती वर्षं झालीत. बरा भेटलास. मी निघतच होतो.."

"तू इकडे?" मी आश्चर्याने म्हणालो.

"मी इकडेच. हल्लीच असिस्टंट प्रोफेसर झालोय!"

"तू? इकडे शिकवतोस?"

"अर्थात! वाटत नाही ना माझ्याकडे बघून?"

"तसं नाही रे. पण.."

"खरंय तुझं. शेवटच्या वर्षी फेल झालेलो.. पण ते बरंच झालं एका प्रकारे. ती सुरूवात होती.. अक्कल येण्याची!"

"म्हणजे?"

"म्हणजे काय? नेहमीचीच स्टोरी! चल तुला आज माझी गोष्ट सांगतोच. वेळ आहे ना तुला?"

मला वेळच वेळ होता. शनिवार दुपार. कॉलेजचा कट्टा नि कॉलेजातला जुना मित्र. अजून काय हवे? त्यात तो आपली गोष्ट सांगायला सरसावून बसलेला..

सहदेव सदाशिव चंदनशिवे. वडील सफाई खात्यात म्युनिसिपालटीत. आई अशिक्षित. घरचा सामान्य. शाळेतून दहावी कसाबसा पास झालेला. त्यालाच नाही तर त्याच्या घरीही शिक्षणाची कोणाला गोडी नाही. गोडी नसेलही पण शिक्षणाचे महत्वही कोणाला कळलेले नाही. तरीही सायन्सला तो पोहोचला कसा याचंच आश्चर्य.

"तुला सांगतो ना, हे लहानपणीचे दिवस असतात ना.. नादान असतो आपण. शाळेत अभ्यासाची आवड नसेल तर आपण ढ. अभ्यास केला तर हुशार. पण मुळात अभ्यास केला पाहिजे याची तरी जाणीव त्या वयात होईलच असे नाही. अक्कल असणे नि अभ्यास करणे यांचा संबंध असेलच असे नाही. त्यावेळी टिवल्याबावल्या करण्यात मन रमणारे, ते अभ्यासासारख्या कठीण कामात कसे गुंतवावे? बरं आजूबाजूला सारे असेच. कोणाचा आदर्श ठेवावा? उलट अभ्यास करून कोणाचं भलं झालंय म्हणणारे सारे. एकेक आपण शाळा सोडून कसे मोठे झालो याच्या बढाया मारणारे. खरेतर ते मोठे झालेलेच नसतात. पण पुस्तकी शिक्षण खरे शिक्षण नाही याचे तुणतुणे वाजवत बसतात. पुस्तकी शिक्षणाला जीवन शिक्षणाची जोड लागतेच. ते ही महत्वाचे. पण हे स्कूल ड्रा◌ॅप आऊट्स, बँकेत नाहीतर मोठ्या ऑफिसात जातात तेव्हा बुजतात हा

भाग सांगत नाहीत. अगदी थर्ड इयर पर्यंत मी असाच होतो.. म्हणजे अभ्यासात. बाकी काय काय करायचो मी. उगाच काम म्हणून सकाळी पेपरची लाईन टाकायचो. त्या आधी पंधरा वीस मिनटं पेपर फुकटात वाचून घ्यायचो. अभ्यासात मी मागे पण वाचायची हौस भारी. नाटकात असायचो, ग्राउंडवर असायचो. माझ्या काळ्या रंगामुळे मला व्हिलन बिलनचे रोल सहज मिळायचे. जणू काही सगळे खलनायक काळ्याच रंगाचे असतात किंवा काळ्या रंगाचे सारे खलनायकच असतात! त्या वेळचं आठवतंय मला, माझ्या या काळ्याकभिन्न रंगाचंच काय, पण कशाचंच मला काही वाटायचं नाही. क्रिकेटमध्ये मला माझ्या आडदांड शरीराकडे पाहून घ्यायचे. मारेल हा सिक्सर वगैरे म्हणत. मी तसा बरा खेळायचो. थर्ड इयरपर्यंत असेच चालले. सेकंड इयरच्या नाटकात तर आपण दोघे होतोच. थर्ड इयरला भेटले ते भिडेसर."

"हे कोण? आपल्या कॉलेजला होते?"

"नाही. नाटकाचे डायरेक्टर! थर्ड इयरच्या नाटकात तू नव्हतास. अभ्यासामुळे. त्यामुळे तू ओळखत नसशील. मोठा माणूस रे.."

"ओह! श्री.चित्तरंजन भिडे. प्रथितयश नाट्य दिग्दर्शक! नावाने ठाऊक आहेत."

"त्या वर्षी नाटक झाले. मी नेहमीप्रमाणे निगेटिव्ह रोलमध्ये. बहुतेक ओरिजिनल काळ्या रंगाने मेकपला जास्त खर्च येत नसणार! नाटकाला बक्षिस मिळाले. मग भिडेसरांनी काय करावे? मला मुद्दाम घरी बोलावून घेतले.. मला वाटलं नाटकातल्या कामासाठी असेल.."

त्यानंतर एखाद्या सिनेमातील फ्लॅशबॅक सारखी गोष्ट सहदेव सांगायला लागला..

"तुला मी का बोलावलंय.. काही अंदाज?"

"नाही सर. नाटक चांगलं झालं ना?"

"ते झालं. मला तुझ्याबद्दल बोलायचंय.."

"काय सर?"

"सेकंड इयरला किती मार्क पडले?"

मी काही न बोलता खाली मान घालून बसलो.

"मला तुझे मार्क्स नकोत. पण माझे निरीक्षण सांगतो. तू काठावर पास होतोस. आता थर्ड इयर फायनल जवळ आलीय.."

"हो सर.."

"त्यात तुझ्या पास होण्याची शक्यता कमी आहे.. मी बोललोय तुझ्या कॉलेज टीचर्सशी.. मला ठाऊक आहे सगळं.."

मी तसाच गप्प बसून होतो. आयुष्यात असा एखादा क्षण येतो तेव्हा डोळ्यांपुढे लख्ख दिसायला लागतं आपले कुठे चुकतेय. मोमेंट ऑफ रियलायझेशन! तोच हा क्षण असावा.

"माझे निरीक्षण असेय. तू तुझ्या विषयात किती हुशार आहेस हे नाही सांगणार मी. ते माझे विषय नाहीत. पण तू मुळात हुशार आहेस. अभ्यास न केल्याने मागे पडतोयस फक्त. नि अभ्यास न करायला कारण.. त्याचे महत्व तुला कळत नाही म्हणून फक्त. आजूबाजूची परिस्थिती आपल्याला घडवते हे खरेय पण आपण स्वत:ला त्यानुसार घडू देतो हे ही तितकेच खरं.."

हे खरंच आहे नाही? बाकीच्यांनी शिकून कोणाचं भलं झालंय म्हणावं नि मी ते निमूटपणे मान्य करावे? बहुधा पूर्ण मान्य नसावे कारण नाहीतर मी कॉलेजात, ते ही सायन्सला आलोच नसतो. सर पुढे म्हणाले,

"माझा स्वत:चा जातपात वगैरेवर विश्वास नाही. पण मी ज्या जातीत जन्मलो तिथे हे शैक्षणिक वातावरण आपसूक लाभले. तुझे तसे नाही.. तेव्हा तुला स्वत:ला परिस्थितीचे भान येऊन तिच्याबरोबर झगडा करायला हवा. तो ही जास्त प्रयत्न करून. आम्ही फक्त शिक्षणासाठी मेहनत घेतली. तुला ते शिक्षण घ्यायला हवे हा विचार मनात रूजवण्यासाठी आधी मेहनत घ्यायला हवी. तू असाच राहशील तर पुढच्या पिढीलाही हाच विचार देशील की नाही?"

त्यादिवशी सरांनी घरी बसवून खूप काही समजावून सांगितले. खरेतर परिस्थितीची जाणीव करून दिली. नि त्यानंतर शिक्षणाला पर्याय नाही हे ज्ञान दिलं.. मी म्हटले, सर आम्ही असल्या खालच्या समाजातले.. तर सर भडकले. तू स्वत:च स्वत:ला असे समजणार असशील तर देवही तुला वाचवणार नाही म्हणाले. हे खालीवर करत बसलास तर कठीण आहे. शिक्षणास तरणोपाय नाही हे मनात पक्के केलेस तरच पुढे काही भवितव्य आहे. नाहीतर आहेच पुढे तेच रडगाणे.. मग सरांनी एक नाटकातला उतारा दिला वाचायला.

"हा वाच. तुझी संवाद फेक चांगली आहे. शब्दांचा अर्थ नि त्यामागचाही अर्थ समजण्याची क्षमता चांगली आहे. तुझं वाचन चांगले असावे नाहीतर  नाटकाची इतकी समज नसती तुला.. नवा सूर्य नावाचे नाटक आहे त्यातला हा उतारा वाच.."

मी नाटकाबाबत एकपाठी. संवाद लक्षात ठेवायला मला प्रयत्न नाही करावे लागत.. आजही आठवतो तो उतारा. जशाच्या तसा..

'गावकुसाबाहेरील वसतीने कूस बदलली नि थोडीफार ती माणसासारखी वाटायला लागली. म्हणजे वसती माणसांची नि तिच्यातील माणसं तशी माणसंच होती पण गावाच्या आतल्यांना ती गवताच्या कुसासारखी खुपायची. पण सांगतात कोणाला? सर्व पडेल कामाला या वसतीतीलच लोकं

कामाला यायची. लोकं कामं तर करून घ्यायची नि त्या घाणीची सावली नको म्हणून गावाचं पावित्र्य जपत सगळ्यांना गावाबाहेर ठेवायची. शेवटी स्वच्छता म्हणून काही असते की नाही? गावाबाहेरील ती वसती खुपली तरी त्यांची सावली पडू न देता कामं करून घेतली जायची. त्या अशिक्षित नि गचाळ, गबाळया वसतीतील काळपट रापलेल्या वर्णाच्या एकेकाला तरी जगण्यासाठी दुसरा कुठला नि कोणाचा आधार होता? रीतरिवाज पाळत पिढ्यान पिढ्या एकच काम करणारी सारी गावाबाहेरील माणसं.. गावच्या उतरंडीत सर्वात खालच्या पायरीवरची. पायाच तो समाजाच्या इमारतीचा. पाया म्हटला की तो भक्कम असायलाच हवा. शतकानुशतके यांच्या पिढ्यांच्या पिढ्या अशी समाजपुरूषाची सेवा करत होत्या. तोच समाज पुरूष त्याची किंमत करत त्याला हुडूत हुडूत करत होता. त्यांची तरी काय चूक? शेवटी बळी तो कान पिळणारच. इकडे तर दोन्ही कान पिळण्यासाठी लोकांनी तयार ठेवलेले.. स्वत्व सोडून बाकी सर्व म्हणजे, स्वत:च्या कामाची नि समाजस्थितीची जाणीव असणारा हा गावकुसाबाहेरचा समाज.. कुणी त्याला नागवले तर नागवून घेणारा, कुणी त्याला जागवले तरी जोखड बांधून घेतल्यासारखा न जागणारा.. अशा समाजातला तो. खडबडून जागा झाला. म्हणाला, मी शिकलो तर माझ्याकडे पाहून अजून चार जणं शिकतील. मी चांगले आयुष्य जगायला लागलो तर तेव्हा माझ्याकडे पाहून लोकं बोध घेतील. माझी जबाबदारी मोठी. मला मेहनत घ्यायलाच हवी. माझ्या एकट्यासाठी नाही तर इतरांसाठी देखील. शिक्षण नाही म्हणून हा वनवास नि वनवास आहे म्हणून शिक्षण नाही हे दुष्टचक्र मला भेदावेच लागेल.. हा खरेतर चक्रव्यूह नाही. नुसतेच दुष्टचक्र. एकदा मला शिकण्याची अंतर्यामी ओढ लागली की ते भेदले जाईल..'

भिडेसरांनी समजावले नि माझे डोळे खाडकन उघडले. वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत न आलेली समज एकाएकी आली. कदाचित ती मला आधीही असावी. निखाऱ्यावरची राख फुंकरून त्यातील आग वर दिसावी असे काहीतरी झाले असावे. तुला कदाचित ठाऊक नसेल, थर्ड इयरला मी फेल नव्हतो झालो. ड्रा़ॅप घेतलेला. म्हटले नीट अभ्यास करेन मगच परीक्षा. अभ्यास सोडून दुसरे काही नाही. मग पुढे पुस्तकांत बुडवून घेतले स्वत:ला. इतके की पुढच्या परिक्षेत मला फर्स्ट क्लास मिळाला. नंतर मी मागे वळून पाहिले नाही. एम.एस्सी केलं. ह्याच कॉलेजात लेक्चरर झालो.."

"फर्स्ट क्लास इन केमिस्ट्री? दॅटस ग्रेट" मी म्हणालो. आधी नापास होता बचावणारा सहदेव केमिस्ट्री फर्स्ट क्लास?

"होय! आता मी असिस्टंट प्रोफेसर आहे. आपल्याच कॉलेजात. भिडेसरांनी डोळे उघडले म्हणून आयुष्य पार लागले. दोन गोष्टी महत्वाच्या एवढे ध्यानात आले माझ्या. एक म्हणजे शिक्षकाचे महत्व. अ टीचर कॅन मेक युवर लाइफ. खरंतर एकाचवेळी कित्येकांची.. अ गुड टीचर कॅन मेनी अ लाइव्हस. म्हणून मी पण टीचर होण्याचा निश्चय करून लागलो या कॉलेजात. आणि दुसरे, सगळं काही आपल्या विचार करण्याच्या पद्धतीवर अवलंबून आहे. इट्स ऑल इन द ब्रेन. तोच मी, तोच माझा मेंदू.. विचार करण्याची पद्धत बदलली नि मी बदललो. माझं आयुष्यच बदललं."

आम्ही कट्ट्यावर बसलेलो नि चारपाच विद्यार्थी समोर आले.

"आज सेशन नाही सर?"

"सेशन? आज नाही.. नाहीतर थांबा लेक्चर हा़ॅल मध्ये. येतोय.."

"लेक्चर आहे तुझं?"

"नाही रे. हे माझे स्टुडंट्स. माझे म्हणजे माझ्या विषयाचे नाहीत. मी त्यांना शिकवत नाही. असेच अजून कित्येक आहेत. काही मागे पडलेले, काही नापास होणारे, कोणाला अजून दुसरे काही करावेसं वाटतेय, कुणाला कसल्या कसल्या अडचणी आहेत.. अडथळे आहेत. ज्यांना ज्यांना काहीही अडचणी असतील त्यांच्यासाठी मी शनिवार दुपारी सेशन घेतो. काहीही म्हणजे कोणत्याही प्रकारच्या अडचणी. अगदी घरगुती ते आर्थिक. शेवटी आयुष्यात एव्हरीथिंग इज इंटरलिंक्ड. माझं काम एकच, ऐकून घेणे. दोन चार युक्तीच्या गोष्टी सांगणे. बहुतेकदा सांगता सांगता पोरांना स्वत:च समजते प्रा◌ॅब्लेम कुठे नि काय आहे. त्याचे उत्तरही त्यांनाच आपोआप समजायला लागते. आपले काम फक्त त्यांच्या विचारांत एक सुसूत्रता आणणे. त्यांची विचार करण्याची पद्धत बदलली की स्वत:च मार्ग काढतात ते. माझ्याच उदाहरणावरून शिकलोय मी, शेवटी पाणी घोड्याला स्वत:च प्यावे लागते. आपण फक्त घोड्याला पाणवठ्यापर्यंत नेऊन सोडायचे!"

सहदेव हुशार आधीपासूनच होता. फक्त त्याच्या हुशारीची त्याला स्वत:लाच जाणीव नव्हती. त्याला फक्त एका मार्गदर्शकाची गरज होती. भिडेसरांच्या रूपाने तो मार्गदर्शक भेटला. त्याचे आयुष्य मार्गी लागले. त्यातून स्वत: सहदेव मोठा झाला.. आणि स्वत:पुरताच नाही, तर तो स्वत: मार्गदर्शक बनला आहे नव्या पिढीसाठी.

मला आठवते ती आमच्या सेकंड इयरमधली कॉलेजातली एक गोष्ट. केमिस्ट्रीचा पिरीयड. नेहमीप्रमाणे क्लास सुरू होता. पाठीमागे पोरांचा गलका सुरू होताच. सर्वांत सहदेवचा आवाज मोठा. सरांनी त्याला उभे केले.. लर्न फ्रॉम

दीज टॉपर्स म्हणत आमच्या बेंचेसकडे बोटं दाखवली.. मला तर पोरं टॉपर म्हणूनच हाक मारायची. तेव्हा आम्ही आमच्या बॅचचे टॉपर्स होतो. आज आम्ही सगळे कुठे कुठे वरच्या पदावर नोकरीला आहोत. तेव्हा असू, पण आज आम्ही आहोत का खरे टॉपर्स? सहदेवची गोष्ट ऐकली नि वाटले, आम्ही असू अभ्यासात वगैरे पुढे, पण अगदी खिजगणतीतही नसावा इतका मागे पडून मग उसळी घेत एक उंची गाठणारा नि त्या ही पुढे स्वत:सकट इतरांच्याही आयुष्याला वळण लावण्याचा प्रयत्न करणारा सहदेव.. तोच टॉपर म्हणावा खरा ..

# अविश्वासराव!

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. तेव्हा

विश्वासवर अविश्वास दाखवणे कठीण होते. कारण तो सर्वज्ञानी होता. त्याला स्वत:ला तसे वाटे नि बाकीच्यांना तसे वाटायला हरकत नव्हती. आकाशातला तो कुणी सर्वसाक्षी असेलही, तो सर्वव्यापीही आहे म्हणे.. आकाशातल्या त्याला कुणी पाहिले नाही तरी तो साकार, निराकार वगैरे आहे यावर हत्ती पाहणाऱ्या आंधळयांसारखे विद्वज्जन चर्चाबिर्चा करतात. त्यात काही प्रवचनांतून विविध वचनांचा मारा करून सामान्य देवभोळयांचे अन देवभीतांचे कान त्याच्या नावाने भारून आणि भरून टाकतात.. हे त्या गगनस्थ जगन्नियंत्याबद्दल. पण विश्वास साकार होता, सगुण होता आणि प्रत्यक्ष दिसल्याने 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' म्हणण्याची वेळ त्याला 'कोट' करणाऱ्या कुणावर येत नसायची! विश्वास सदा सुखी प्राणी होता. जगी सर्वसुखी असा कोण आहे म्हणण्याआधी समर्थ ह्या विश्वासला भेटले असते तर तेवढा एक श्लोक कदाचित कमी झाला असता. थोडक्यात त्या भगवंताबद्दल वापरावी अशी विशेषणे त्याच्यासाठी वापरता येऊ शकता यायची.

प्रचंड आत्मविश्वास हे विश्वासचे व्यवच्छेदक लक्षण. त्यामुळे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर तो पापणी न लववता देऊ शके. फक्त कॉलेजात तोंडी परीक्षेतील परीक्षक आणि त्याच्यात मतभेद होत हा भाग वेगळा. बिचारा

परीक्षार्थी. कितीही लोकशाही म्हटली तरी त्याला तिथे मतस्वातंत्र्य नाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. 'जे जे परीक्षका हवे तेचि त्यांस कथावे' हे तत्व न पाळल्याने त्याच्या मार्कशीटवर लाल रेघा उगाच उठत असल्या तरी विश्वासचा आपल्या ज्ञानावरील विश्वास ढळवणे कोणालाही शक्य झाले नव्हते. त्याला इतिहास मुखोद्गत असे नि भूगोलही. खरेतर आज इतिहासातील तपशील आपल्या सोयीनुसार आपल्याकडे वळवून घेण्याची राजकारणी रीत आहे. त्यामुळे कालचे नायक आज गरज पडल्यास खलनायकाच्या भूमिकेत प्रोजेक्ट केले तरी चालते. आणि कधी याच्या उलट केले तरी. म्हणजे सोय तसा इतिहास.. शेवटी इतिहास आपल्यासाठी, आपण इतिहासासाठी थोडेच आहोत? नि हवा तसा सोयीनुसार वापरता नाही आला तर त्या इतिहासाला काय अर्थ उरला? तरी तेव्हा निरपेक्ष बुद्धीने इतिहासाच्या घटना पुढेमागे करणाऱ्या विश्वास बद्दल उगाच परीक्षक आकस बाळगत. त्याला लाल रेघांचे धनी करत त्याच्या मार्कशीटच्या लल्लाटी त्या लाल रंगाचा मळवट भरवत. पण विश्वास अशातशाने ना हार माने ना त्याला त्याचे वैषम्यही असे.

सगळ्यांचा विश्वास होता की विश्वासला सगळ्यातले सगळे अवगत आहे. कालच्या आइनस्टाइनच्या सूत्रांपासून प्राचीन ऋषीमुनींच्या गोत्रापर्यंत नि रामायण महाभारतातील संदर्भांपासून ते अगदी अलिकडच्या हुडहुडी भरायला लावतील अशा बॉलिवुडी गाण्यापर्यंत. त्याला पुराणे अवगत होती नि शास्त्रे ही, प्राचीन मंत्रज्ञानाचे तंत्र आणि अर्वाचीन तंत्रज्ञानाचे मंत्रदेखील. इतिहास त्याला तळहातावरील रेखांसारखा ज्ञात होता. म्हणजे शिवाजी महाराजांच्या जन्माबाबत भले ही मतभेद असोत, विश्वास अत्यंत विश्वासाने शिवजन्माची तारीख सांगू शकतो. ते वर्ष सोळाशे तेहतीस.. चैत्र शुद्ध द्वादशी. त्यादिवशी गगनीचा रवि काही वेगळ्याच तेजाने तळपत होता वगैरे तपशील.. महाराजांच्या

कुंडलीतील राजयोगावर भाष्य करावे ते विश्वासनेच. पण तो त्यानंतर तेव्हाच्या नेत्यांचेही राजयोग तपासून सांगू शके. अर्थात त्यानंतर ती भविष्ये तशी खरी होतात की नाही याबद्दल न त्याला चिंता, न ऐकणाऱ्यांना. बहुतेक ज्योतिषांबद्दल हे खरे असतेच तर विश्वास क्वालिफाइड ज्योतिषी नसताना त्याला कोण विचारणार? तर विश्वासची रेंज मोठी. एका प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर नि बळावर त्याची ही नौका विहार करत होती.

विश्वासला कुठलाही विषय वर्ज्य नसे. चर्मकार महासंघात तो चपलेत चुका मारण्याबद्दल न चुकता भाषण ठोकेल, तुटलेल्या अंगठ्याला टाका कसा घालावा यावर भाष्य करेल तर शिंपी समाज अधिवेशनात कपड्यांच्या टाक्यांवर बोलेल. तोच जर एखाद्या वैद्यकीय सोहळ्यात अडकला तर तेथेही जखमेवर टाके घालण्याबद्दल बोलेल. त्याच्या जिभेला कोण टाके घालणार? शेतकरी बंधूंत तो बी बियाण्यांचे ज्ञान रूजवेल तर कोळी बांधवांत तो नांगर टाकण्याचे ज्ञान पाजळेल. सर्वांस ठाऊक होते, विश्वासच्या ज्ञानाला मर्यादा नाहीत. सीमा नाहीत. असत्या तरी त्याने विजयादशमीची वाट न पाहता कधीही सीमोल्लंघन केले असते. त्यामुळे तसा तो सर्वसंचारी होता. विषयाप्रमाणेच कोणतेही स्थान त्याला वर्ज्य नसे. आज येथे तर उद्या तेथे. वारा एका ठिकाणी थांबत नाही तसा विश्वासही थांबत नाही याबद्दल इतरेजनांस त्याचे कौतुक होते. सर्वसंचारामुळे अजून एक होई. बारा गावचे पाणी घशाखाली उतरल्याने बारा गावच्या बारा तऱ्हा त्याला ठाऊक होत्या. त्यामुळे विश्वासचा स्वभाव एक अजब रसायन बनला होता. आज विश्वास जिथे पोहोचला आहे तेथे त्याच्याबद्दलचे सारे जुने काही सांगणे कुणी प्रशस्त मानो न मानो, पण ते सांगायलाच हवे. त्याच्या सर्वसंचारामुळे कुणी त्याला 'ही ब्याद' कशी टळेल अशा नजरेने बघत. लहानपणी विश्वास कोठे काय बोलेल याबद्दल कोणालाच विश्वास नसे. त्यामुळे

त्याचे मातापिता त्याला कुठेही नेण्याचे टाळत. पण प्रसंगविशेष कसा ही असला तरी त्यातून मार्ग काढून विश्वास आपल्या मताची पिंक टाकल्यावाचून राहात नसे. थोडक्यात त्याला आपल्या क्षमतांबद्दल पूर्ण विश्वास होता. नि तो त्यांचा वापर ही पुरेपूर करत होता!

विश्वासचे अजून एक वैशिष्ट्य होते. ते म्हणजे अत्यंत निराग्रही स्वभाव. त्यामुळे मी म्हणेन ती पूर्व दिशा असा त्याचा आग्रह नसे. मग त्याने आज घोषित केलेली पूर्व उद्या दक्षिण म्हणून घोषित केली गेली तरी त्याची ना नसे. म्हणून त्याची मते त्याने दिवसागणिक काय तासागणिक बदलली तरी त्याबद्दल त्याला काही वाईट वाटत नसे. हा एक दैवी सद्गुण विश्वासमध्ये होता. विश्वासची अजून एक आवड म्हणजे टोपी घालण्याची. नुसती घालणे नव्हे तर बघता बघता तो टोपी बदलत असे. कधी पांढरी टोपी तर कधी काळी हॅट. कधी स्पोर्ट्स कॅप तर कधी चक्क पगडी. अर्थात टोप्यांबद्दलही विश्वास तितकाच अनाग्रही होता. बदलत्या मतांबरोबर बदलत्या टोपीमुळे कधी कधी विश्वासची ओळख पटणे कठीण होई. पण बदल हाच स्थायीभाव आहे, माणूस क्षणाक्षणाने मोठा होत असतो, एका क्षणापूर्वीचा मी नि आताचा मी यात कितीतरी बदल घडून येत असतात.. फिरूनी नवा जन्मतो मी.. वगैरे तात्विक विचारांची पक्की बैठक त्याला मार्गदर्शन करत असल्याने विश्वासवर इतरांचा विश्वास चटकन बसला नाही तरच नवल. आणि त्यामुळे विश्वासला विश्वात्मक अपील होते. आजूबाजूचे विश्व त्याला त्याच्या ह्या सकल गुणांच्या समुच्चयामुळे ओळखत होते. कुणी त्याला सर्वसाक्षी समजत असे, कुणी सर्वज्ञानी. त्यामुळे सर्वसंचारी असा तो सर्वसुखी होता..

- असे गुण एकाच व्यक्तीत एकवटणे तसे विरळाच. आणि अशा व्यक्तीकडे आजूबाजूच्या राजकीय नेतृत्वाचे लक्ष न जाणे हे तर त्यातूनही विरळा. त्यातून विश्वासचे नेतृत्व बहरास येऊ लागले. राजकारणात चंचुप्रवेश म्हणून राजकारण्यांच्या सभांतून भाषणे ठोकण्यात त्याचा हळूहळू हातखंडा झाला. कोठेही कोणत्याही विषयावर आपला मौलिक सल्ला देणे नि मौलिक मार्गदर्शन करणे या त्याच्या अंगच्या दैवी गुणांमुळे विश्वासवर आजूबाजूचे राजकारणी विश्वास टाकू लागले. राजकीय पक्षाचे सुरस आणि चमत्कारिक जाहीरनामे तो लिहू लागला. निवडणुकांच्या तोंडावर विश्वासची डिमांड वाढायला लागली. हळूहळू सकलगुणांकित विश्वासचे रूपांतर विश्वासरावांत झाले .. मग त्याचे विश्वासराव साहेब झाले.. मग विश्वासरावजी साहेब झाले.. आता विश्वासरावजी विसपुतेजी पुढे मागे नामदार विश्वासरावजी विसपुतेजी होणे अटळ आहे.

विश्वासचे नाव तर बदललेच पण त्याबरोबर होता होता होणारे बदलही अटळ होते.. आधी विश्वासच्या बातांवर फार कुणी अविश्वास दाखवत नसे. त्याच्या बोलण्याची पद्धतच तशी होती, आत्मविश्वास ओसंडून वाहणारी. लोकांनाही फारसा फरक पडत नसे कारण तो साधा विश्वास विसपुते होता. पुढे त्याचा विश्वासरावजी विसपुते साहेब झाला. ओरिजिनल विश्वास पानिपतच्या लढाईत हरून हरवल्यासारखा नाहीसा झाला. स्वत: विश्वासने आपली स्टाइल बदलली नाही. कितीही नामकरणात बदल होवो, तीच आत्मविश्वासाने 'ठोकून देतो ऐसाजे' पद्धत सुरू राहिली. पण बदलले ते आजूबाजूचे लोक नि त्यांचा बघण्याचा दृष्टिकोन नि ऐकण्याची किंवा ऐकून घेण्याची क्षमता. आधी विश्वासवर डोळे झाकून विश्वास ठेवणारे सारे.. आता विश्वासरावजी साहेबांवर

डोळे झाकून अविश्वास दाखवू लागले.. या विशाल विश्वात तो खराखुरा विश्वास कुठेतरी हरवला. पानिपतावर हरवलेल्या विश्वासरावांनंतर हरवलेला हा अजून एक विश्वास!

मग व्हायचे काय होते? श्वास सुरू आहे तरी विश्वास हरवला आहे.. विश्वासरावच बदलले नाहीत, तर त्यांचे नावही आता बदलले आहे..

- विश्वासराव आता अविश्वासराव नावाने ओळखले जातात!

# हीरो!

आज सकाळी गुरूजी गेले शाळेत खरे, पण आज मला काही त्यांचा मूड नेहमीसारखा नाही वाटला. गुरूजी म्हणजे आमचे 'हे'. युवराज मोहिते. सगळे गाव त्यांना गुरूजी म्हणते, म्हणून मी देखील गुरूजीच म्हणते त्यांना. गुरूजी कधी असे दुर्मुखलेले नसतात. सकाळ सकाळी तर नाहीच नाही. नवा दिवस म्हणजे कालपर्यंतचे सारे विसरून नवी सुरूवात असं म्हणतात ते.

आमच्या लग्नाला आता सात वर्षे झाली. मला आठवते ते अगदी पहिल्यांदा ऐकलेले त्यांच्या तोंडून.. रात्री झोपताना..

"प्रिये,आता मी मरायला मोकळा!"

"असं काहीही का बोलावे?" मी म्हणाले तर यावर उत्तर..

"दर वेळी झोपेतून उठणे हा पुनर्जन्मच नाही का?शरीराच्या यंत्राची हीच तर गंमत आहे.."

पण मग मी त्यांना शपथ घातली. असे काही न बोलण्याची. गुरूजी आजवर ती पाळत आले आहेत. तरी सकाळी नवा गडी नवे राज्य म्हणत नवा दिवस उत्साहात सुरू करणारे गुरूजी. आज अचानक असे निरूत्साही का वाटावेत?

कालच रात्री जागून आम्ही भारताची विश्वचषक विजयाची मॅच पाहिलेली. खरंतर गावात वीज तशी जाऊन येऊन असते. पण काल वीजमंडळाने कृपा केलेली. आम्ही तिघे, म्हणजे मी, हे नि आमचा एकुलता एक मुलगा. त्याचबरोबर मॅच पहायला आलेले गुरूजींचे काही छोटे विद्यार्थी..

गावात एक दोन ठिकाणी टीव्ही. गुरूजींनी प्रेमाने पोरांना घरी बोलवलेले. पोरंही नाचत बागडत आलेली. सर्वांनी उत्साहात टीव्हीवर सामना पाहिला. सामना जिंकला नि कॅप्टनने उचललेला तो विश्वचषक नि त्यानंतर त्याची ती मिरवणूक. सारे जग त्या क्षणाला डोळयांत साठवून ठेवत असणार. त्या अख्ख्या टीमचे तर कौतुक झालेच, कॅप्टनचे तर त्याहून जास्त झाले. सगळा भवताल क्रिकेटमय झालेला. त्यात सारे क्रिकेटर्स हीरो नि तो संघनायक हीरोंचाही हीरो! हीरो नंबर वन! आमच्या अशा छोट्याश्या खेड्यासारख्या गावातही आनंदोत्सव साजरा झाला. गावातली पोरं त्यांच्या गुरूजींच्या म्हणजे आमच्या घरी हक्काने टीव्हीवर मॅच बघायला आलेली नि त्यानंतर खुशी खुशी पोरं घरी परतलेली. गुरूजींना तर मॅचहून त्या पोरांचे हसणे जास्त महत्वाचे. काल रात्री तर गाडं खुशीत होतं नि आणि आज सकाळ सकाळी त्यांचे काय बिनसले असेल?

आमचे लग्न झाले ते सात वर्षांपूर्वी. मी तशी तालुक्याच्या ठिकाणी राहिलेले. म्हणजे अगदी मोठे शहर नाही पण खेडे ही नाही. गुरूजी.. तेव्हा ते मोहिते गुरूजीच होते पण मी त्यांना गुरूजी म्हणण्याचा प्रश्न नव्हता.. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक. चांगले एम.ए. एम.एड. शाळेत शिकवायचे वेड घेतलेले. नि म्हणून शासकीय शाळेतून नोकरी करणारे. ध्येयवाद वगैरे शब्द कालबाह्य व्हावेत त्या जमान्यात असे गुरूजी.. मी त्यांच्या ह्या गुणांवरच भाळलेले. त्यासाठी मला थोडेफार साधे आयुष्य जगावे लागले तरी माझी तयारी होती. जवळच्या मोठ्या शहरवजा गावात होतो आम्ही. पुढे तीन वर्षांनी बदली होऊन आम्ही ह्या खेड्यासारख्या छोट्या गावात आलो. मग गाव नि गावची ती छोटी शाळा हेच आमचे जग. लग्नाच्या वेळीच मला म्हणालेले,"शाळा नि शिक्षण हेच माझं कार्यक्षेत्र. गावागावात पोरांना शिकवून शहाणे करून सोडावे.

शहरातही पोरांना चांगले शिक्षक मिळतातच असे नाही पण निदान ती शक्यता तिथे जास्त असते. तेव्हा मी गावच्याच शाळेत शिकवणार. नि बदली झाली की एका गावाहून दुसरीकडे विंचवाच्या पाठीवरले बिऱ्हाड हलवणार! तेव्हा जरा विचार करून पाऊल टाका. शहरी वातावरण नाही, त्यापाठोपाठ येणाऱ्या सुखसोयी नाहीत हे आधीच ध्यानी घ्या.." आणि त्यानंतरचे त्यांचे वाक्य होते,"हे समजून उमजून तुम्ही माझ्याबरोबर साथ द्यायला तयार असाल.. तर मी भाग्यवान!"

त्या वेड्या वयात असे वेडे लोक आपल्याला आवडून जातात. मला गुरूजी आवडलेले, मनापासून. म्हटले, असे सरळमार्गी सापडतील पण आजच्या जमान्यात ध्येयवादी कोणी सापडणे कठीणच नव्हे, तर अशक्य. मी बी.ए. पर्यंत शिकलेले. मला नोकरीची आवड तेव्हाही नव्हती. आता ही नाही. लेखनाचा माझा छंद. गुरूजींना सांगितला तेव्हा ते खूश झालेले. आजही माझ्या कथांचे पहिले वाचक नि समीक्षक तेच असतात. मी लिहिते. त्यातील काही प्रकाशित होते, काही पडून आहे माझ्याकडे. पण गुरूजींना त्या सर्व लिखाणाचं कौतुक खूप. मी देखील दिसामाजी काही तरी लिहित जावे हा समर्थांचा सल्ला मानत आलेले. खेडेगाव हे फारतर पिकनिकसाठी किंवा तिथला निसर्ग मधूनमधून डोळ्यात साठवत परत आपल्या सिमेंटच्या जंगलात परतण्यासाठी अशा वातावरणात वाढलेली मी, लग्नानंतर बदलले. एकदा गुरूजींना आपले मानले त्यानंतर सारेच आपोआप जमत गेले. शहरी सुखसुविधांची चव घेतली असल्याने हे थोडे कठीण गेले पण हळूहळू जमले मला. या साऱ्याचा मला कंटाळा कधी आलाच नाही असे मी नाही म्हणणार. पण गुरूजींसमोर मी ते कधीच बोलून दाखवले नाही आजवर. तसे गुरूजी जरा जास्तच संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांना कधी ना कधी ते जाणवत असावे, पण बोलायचे नाहीत

कधी. अर्थात एकूण तशी मी आनंदात होते. बऱ्यापैकी घर होतं, गावात मान होता. सगळयांची ओळख होती. बहुतेक वेळी मारून मुटकून वैद्यबुवाच्या चालीवर मारून मुटकून नि काही जमत नसल्यास शाळेत शिक्षक बनणारे सारे. त्यात हे मुद्दाम शाळेत शिकवणारे मोहिते गुरूजी लोकप्रिय न होतील तरच नवल.

त्यादिवशी संध्याकाळी गुरूजी परतले. शाळेतली मुले तशी फार काळ कोणाला उदास थोडीच राहू देतात? गुरूजी तसे आनंदात दिसत होते.. तरी रात्री मीच त्यांना म्हटले,"काय हो? आज सकाळी काय बिनसलेलं?"

"काही नाही.."

"मी ओळखते तुम्हाला. काय बिनसले ते सांगता नाही येणार, पण बिनसलेले काहीतरी हे मात्र नक्की. सांगून टाका.."

"तू पण अशी आहेस. पण नाही, तुम्हा लेखक लोकांचा हाच प्रा ॅब्लेम आहे. समोरच्याच्या मनात डोकावणे. ते ही बिना परवानगी.."

"तर.. पण अशा तशा कोणाच्या मनात थोडीच डोकावले मी. कोणी काही म्हणो.. माझ्याच तर नवऱ्याच्या मनात डोकावले ना मी?"

"हे मात्र खरेय.. डोकावून पाहाताना धापकन पडली नाहीस म्हणून बरं!"

"ती काय विहीर आहे?"

"असणार! लिही, मन म्हणजे एक विहीर, त्यात विचारांचे पाणी.. संथ शांत असेतोवर नितळ.. नि अशांत मन म्हणजे गढूळ पाणी.. त्यावर विवेकाची तुरटी फिरवा नि सारा गाळ तळाशी बसवा.. वा! जमलं की मला तुम्हा लेखकांसारखं काहीतरी.."

"बरं बरं. उगाच विषय टाळू नका. सांगून टाका.."

"तू अशी आहेस ना.."

"कशी का असेना.. पण सांगूनच टाका.."

"टाका म्हणतेस.. तर टाकतो.. पण काही झालंच नाही तर सांगावे ते काय? तुला शब्दांवाचून कळले सारे?"

"आज एकदम साहित्यिकासारखे बोलताय! पण विषय टाळण्यासाठी हे नाही चालणार.."

गुरूजींचा नाइलाज झाला म्हणा, किंवा त्यांना खरेच सांगावेसे वाटले म्हणा, ते एकाएकी अंतर्मुख झाल्यासारखे सांगायला लागले.

"राणी, काल मॅच झाली. आपण जिंकलो. लोक सगळ्यांना डोक्यावर घेऊन नाचले.. म्हणून मग.."

"म्हणजे? तुम्हाला नक्की कशाचे काही वाटतेय? आणि ते का?"

"हे बघ राणी.."

माझे नाव मधुराणी. गुरूजी कधी मधु म्हणतात तर कधी राणी..

"काल सारी पोरं कशी सगळ्या खेळाडूंना कौतुकाने पाहात होती. विश्वचषक जिंकला नि सारे खेळाडू हीरो झाले पोरांचे. आज पण पोरांत एकच चर्चा.."

"मग?"

"काल कॅप्टन तर हीरो नंबर वन."

"मग?"

"विचार कर सगळ्यांना कित्येक लाखांवर पैसे मिळतील. कुणाला गाडी मिळेल कुणाला काही.'

"मग?"

"मग? मी विचार करतोय.."

"कसला? क्रिकेट खेळायचा की काय?"

"बघ ना, देशभर हेच हीरो. कधी हे नसतील तर सिनेमातले नट म्हणजे हीरो. हीरो लोकांची कमी नाही. मी शाळेत शिकवण्याचे वेड घेतलेला. पोरं थोडी ओबडधोबड असतात त्यांना आकार देण्यामागे लागलेला. या सगळ्यात मी तुला काय दिलं? हे खेडेगाव, जिथे वीज नाही धड, पाणी नाही नीट. सोयी न सुविधा नाहीत. कशासाठी सारं? मास्तरकीत जन्म माझा जाईल. पण हाल तुझे होतील. खरे हीरो ते सारे लोक आहेत जे चमकताहेत, सगळ्या अर्थांनी. देशासाठी काहीतरी करताहेत म्हणून सगळीकडे त्यांचे नाव दुमदुमतेय.. मी काही लेखक नाही हे सगळे नीट सांगायला. पण वाटतं यातून तुला मी काय देतोय? माझ्यापुरता मी मला आवडेल तेवढे नि तसे काम करतोय पण.."

"कळलं मला तुम्हाला काय म्हणायचे ते. खरंय, लोक हीरो म्हणून त्यांना घेऊन नाचतात. नाचू देत. खरं सांगू तर मुळात शहरी सोयीसुविधा नसल्याने त्रास होतो पण म्हणून मी दु:खी कष्टी नाही. मी आनंदातच आहे. तुम्ही ज्या तळमळीने पोरांना शिकवता ते दिसते मला. हे काम खरे आयुष्य घडवण्याचे. पायाचा दगड बनवणे महत्वाचेच. तो दगड थोडा ओबडधोबड असेल, पाया म्हणून न कोणी कौतुक करेल ना कोणी अंचब्याने पाहिल. लोक कळसाकडेच माना वर करून पाहतात. पायाकडे नाही. पण तो पाया आहे म्हणून कळस आहे. अर्थात आजचे हे हीरो हे खरे हीरो नाहीतच. त्यांच्या क्षेत्रात ते असतील ही मोठे. त्यांचे कौतुक तर आहेच. तुम्हालाही असणार. पण एक सांगू?"

"सांग की."

"राहू दे नकोच.."

"का गं? आता सांगूनच टाक.."

"नको.."

"आता तू कां आढेवेढे घेतेस?"

"आढेवेढे नाहीत हो.. खरं सांगू? कोणाला कोणीही वाटो पण माझ्यासाठी तरी.. जाऊ दे.."

"काय बोल की.."

"माझ्यासाठी तरी तुम्हीच माझे खरेखुरे हीरो आहात.. हीरो नंबर वन!"

"खरंच? खरंच असणार! इतक्या वर्षात लाजताना पहिल्यांदाच पाहिलं मी एका मुलीला. आणि चक्क गाल लाल होतात गाजरासारखे तुझे लाजताना मधुराणी!"

"चला. तुमचं आपलं काहीतरीच.."

"काहीतरीच काय? आणि तू काही कमी नाहीस राणी.. खरंतर तू माझी हिराॅइन आहेस ना म्हणून मी आहे तुझा हीरो.."

"आता बास हां.. उगाच चिडवत रहाल मला.."

पण मी म्हणाले ते खोटं नव्हतंच.

गुरुजी माझे हीरो आहेत हे खरेच. तळागाळात काम करणारे कित्येक अनामिक आहेत. अज्ञात आहेत. त्यांच्या नावे कुठे चिरा नसेल ना ही पणती असेल. त्यांचे कौतुकही कोणी करणार नाहीच. नि आमचे खरेखुरे हीरो ते हेच आहेत नि असायला हवेत. तळागाळात काम करणारे.

- अज्ञात, अनामिक, अनाम वीर.

# ड्रीम बॉय!

तो म्हणजे एक नमुना आहे. त्याला तसं म्हटले तर म्हणेल, असेन ही. नमुना फ्रॉम बँक्स ऑफ जमुना!

हे जमुना वगैरे फक्त यमक जुळण्यापुरतं. यमके जुळवण्याची सवय त्याला आहे. पण ती सवय त्याचे व्यवच्छेदक लक्षण नाही! तो स्वत:ला ड्रीम बॉय म्हणवतो.

"अरे, मी आहे ड्रीम बॉय. ड्रीम गर्ल म्हणजे स्वप्नसुंदरी असेल तर मी स्वप्न सुंदर! म्हणजे कोणाकोणाच्या स्वप्नात येणारा नव्हे तर सुंदर-असुंदर स्वप्ने पाहणारा! वचने किं दरिद्रता असे काही संस्कृतभाषेत म्हणतात म्हणे तसे मी म्हणतो, स्वप्ने किं दरिद्रता? स्वप्नेच पाहायचीत तर त्यात कंजुषी कशाला नि त्यात डोळे का आखडते घ्यावेत? अर्थात प्रत्येक वेळी आपल्याला हवी तशी स्वप्ने पडतीलच असे नाही, तरीपण.."

हात आखडते घेण्याच्या ऐवजी डोळे आखडते घेणारा, खरेतर न घेणारा हा ड्रीम बॉय! असले असली ला ॅजिक कुणी आजवर चालवले असेल?

"मोठ मोठी माणसं सांगून गेलीत. स्वप्ने पहा, स्वप्ने जगा. स्वप्नेच पाहिली नाहीत तर ती पूर्ण होणार कशी? म्हणून मी स्वप्ने पाहातो. तर लोक मला आळशी समजतात! स्वप्ने पाहायला माणसाला झोपावं लागतं. नि जास्त झोपतो म्हणून मला झापतात सारे! झोपेशिवाय पाहिलेली स्वप्ने म्हणजे निव्वळ दिवास्वप्ने. मी खरीखुरी स्वप्ने पाहतो. उगाच दिवास्वप्नांमागे लागावे नि लोक

म्हणतील, मुंगेरीलाल. हसीन स्वप्ने पाहणारा. नाहीतर शेखचिल्ली. पण मी ड्रीम बॉय आहे. खरीखुरी स्वप्ने पाहणारा, स्वप्नील!" स्वप्नील त्याचे खरे नाव नाही, पण त्याच्यासाठी हे विशेषणच नाम म्हणून वापरावे! तो नमुना आहे तो यामुळे. स्वप्ने पाहतात कित्येक. पण त्यांची नोंद ठेवतो कोणी? 'स्वप्नील' ठेवतो. अगदी डायरी ठेवावी तशी स्वप्नांची नोंद. तारीख आणि वारासकट. फक्त वेळ घालत नाही! आणि स्वप्ने त्याची स्वत:ची आहेत तेव्हा त्यात खरेखोटे कुणी करणार कसे? इथे (ड्रीम)बॉय वाक्यं प्रमाणंच म्हणायला हवे. त्याच्याकडे अशा स्वप्नांच्या नोंदी केलेल्या डायऱ्या भरलेल्या आहेत. त्यात इतर दैनंदिनीतल्या नोंदी मात्र नाहीत. आहेत फक्त ड्रीम बॉयची ड्रीम्स!

त्याची ही सवय पहिल्यापासूनची. म्हणजे स्वप्ने पाहण्याची. आम्ही कॉलेजात होतो तेव्हापासून तो असे स्वप्नरंजन करत आला आहे. पण हे स्वप्नं लिहून ठेवायचं प्रकरण अलिकडचे असावे.

"कुठल्याही गोष्टीचे दस्ताऐवजीकरण महत्वाचे. नाहीतर बघ ना आमच्यासारख्यांना कसा त्रास होतो!"

'आमच्यासारखे' म्हणजे इतिहासात रमणारे लोक. तो इतिहास तज्ज्ञ नाही क्वालिफिकेशनने. पण इतिहासातील घटना म्हणजे त्याची आवडती बाब. स्वदेशी नि परदेशी इतिहास तोंडपाठ असल्यासारखा तो, पुलंच्या हरितात्यासारखा. तरीही स्वप्नांच्या नोंदींचा इतिहासाशी संबंध काय किंवा कसाकाय हे त्याचे त्याला ठाऊक. पण त्याच्याशी बोलताना त्याला कॉँट्राडिक्ट न करणे हे पथ्य पाळल्यास मनोरंजनाची हमी मिळते.

"अरे, लिहून ठेवले की नंतर कित्येक वर्षांनी तो पुरावा म्हणून वापरता येतो. म्हणजे दीड दोनशे वर्षांनी माझ्या ह्या डायऱ्या विल बी ॲन इंपा ॅर्टंट पीस

ऑफ एव्हिडन्स. हल्ली काय आहे ना, इतिहासकारांना सुतावरून स्वर्ग गाठावा लागतो. भावी इतिहासकारांना हा सुताऐवजी दोरखंड उपलब्ध करून द्यावा म्हणून खटाटोप! म्हणजे माझ्या ह्या डायऱ्या वाचून त्यांना दोन शतकांपूर्वीचे स्वप्नरंजन वगैरे विषयावर पीएचडी करता येईल. ते ही ऑथेंटिक पुरावे देऊन!"

त्याचे ला ॅजिक त्याच्यापुरते तरी बिनतोड!

"उदाहरणार्थ, हे बघ. हे एक स्वप्न माझे. एका तळयात दोन बदके पोहत आहेत. त्यातला कुरूप म्हणजे राजहंस. म्हणजे पेडिग्रीव्हाइज हायर दॅन दॅट ऑर्डिनरी डक. व्हाय? लेट्स डक दॅट प्रश्न. पण माझे म्हणणे डको डक: नि हंसो हंस: उगाच त्यांच्यात डावे उजवे कशाला? आपापल्या ठिकाणी दोघे ठीक आहेत की नाहीत? कुरूपाने राजहंसत्व मिरवावे नि सुरूपाला हुं.. बदक कुठचा म्हणून हिणवावे? माझ्या स्वप्नात तो कुरूपवाला रडायला लागतो. तर त्याची आई समजावते.. डोन्ट गो बाय ओन्ली लुक्स बाळा.."

"इंग्रजीत?"

"व्हाय नॉट? स्वप्नांना कुठल्याच भाषेचं वावडं नाही. मला वाटतं ना काही स्वप्नं आपल्याला कळत नाहीत ती अशाच कुठल्यातरी स्वाहिली नाहीतर सिंहली भाषेत असणार, आपल्याला कळत नसेल. तर त्या स्वप्नातली हंसाई इज मोअर प्रॅक्टिकल की नाही? मी लिहून ठेवलेय ते स्वप्न."

"छान! पण ती गोष्ट बोधकथा म्हणून लिहिली गेलीय."

"अर्थातच. पण खरा बोध काय घ्यावा ते माझ्या स्वप्नात जास्त क्लियर झालं की नाही? सगळ्या बोधकथांमधून घ्यायचे बोध बदलायला हवेत.."

त्याला काय म्हणायचेय त्याचा बोध होवो न होवो, मी मान हलवली.

"नीड टू रिराईट द बोधकथाज्.. जाऊ दे, तो विषय वेगळा. तर माझ्या स्वप्नांची रेंज मोठी आहे. वैयक्तिक, सामाजिक, राजकीय वगैरे वगैरे. काही

संमिश्र आहेत.. म्हणजे लाइक बोधकथाज.. दिसायला साधी पण बोध सामाजिक नाहीतर राजकीय.. काही स्वप्नात तर सगळे लोक गळयात गळे घालून नाचताहेत. समता नि बंधुता.."

"स्वातंत्र्य राहिले?"

"दॅट्स उंडरस्टुड!"

स्वप्नीलचा हा अंडरस्टँड शब्दाचा खास उच्चार! दीडशे वर्षे राज्य करून मागे सोडून गेलेल्या इंग्रजीतल्या उच्चारांची तोडफोड केली की ब्रिटिशांवर माफक सूड उगवल्याचे समाधान! हे त्याचे अजून एक तर्कट!

"अरे स्वातंत्र्य असेल तरच समता नि बंधुता. नाहीतर गळयात गळे घालण्याऐवजी दाबा एकमेकांचे गळे! मला तर सणासुदी सर्वधर्मसमभावाची पण स्वप्न पडतात.."

"तू बरा अशी सामजिक स्वप्न पाडून घेतोस. नाहीतर तरूणपणीची स्वप्न म्हणजे ड्रीम बॉयच्या स्वप्नात ड्रीम गर्ल!"

"अरे ती तर पडतातच ना. पण ती वैयक्तिक कॅटेगरीत. पण त्यात जास्त खोलात जायची

गरज नाही. तरीही माझ्या डायरीत मी तशी वर्गीकरण करून लिहून ठेवलीत. "

"म्हणजे भावी संशोधकांना सोपे पडेल!"

"यस. देअर यू आर! खरंच आहे ते. आणि वैयक्तिक स्वप्नांत काय यायला इकडे हिंदी, मराठी हिराॅइन्सची काय कमी आहे? पण त्या स्वप्नांना सामाजिक आयाम नाही!"

"काय नाही? व्यायाम?"

"व्यायाम नव्हे. आयाम!"

"आयाम म्हणजे..?"

"तू मराठीच्या वर्गात झोपायचास का?"

"छे! आपली ती कुंदकळी टीचर होती.. तिचे दात बघायचो.. हे मंद मंद पद सुंदर दंतपंक्ती, वापरे जणू ही दररोज वज्रदंती!"

"एवढं बरं आठवतेय! तर इथे आयाम म्हणजे समथिंग लाइक संदर्भ.. तर पर्सनल ड्रीम्स डोन्ट हॅव सोशल किंवा सोसायटल रेलेव्हन्स! पण सामाजिक स्वप्ने ही समष्टीच्या दृष्टीने महत्वाची. म्हणून नोंद करणे महत्वाचे!"

ही समष्टी कोण किंवा काय असावी? त्या शब्दाने माझी यष्टी उडवली तरी त्याला ते न विचारता मी निमूट तो शब्द ऑप्शनला टाकला.

"माझ्या राजकीय स्वप्नात तर एकदा खरे बोलणारा राजकारणी आलेला. एक नेता तर स्वप्नातील भाषणात म्हणाला, आजवर द्वेषाधारित राजकारण माझ्याकडून झाले. द्वेषमूलक, द्वेषवर्धक अशी सारी धोरणे यापुढे मी टाकून देऊन प्रेमाधारित राजकारण करेन. आता वेळ आलीय ती सर्वजन समानतेची. त्यामुळे यापुढे मी आणि माझा पक्ष अशा कोणत्याही गोष्टीबद्दल बोलणार नाही, मग सत्ता गेली तरी बेहत्तर!"

"हे? आणि तुझे स्वप्न?"

"होय! वेळ पाहिलेली मी उठून. मध्यरात्र होती. पहाटेचं वगैरे नाही स्वप्न. तेव्हा ते काही खरं होण्याची शक्यता नाही. अर्थात त्यासाठी तशी वेळ बघायची गरज नव्हती. इतके फारफेच्ड इमॅजिनेशन फक्त एखादा कवी करू शकतो! आणि मी काही कवी नाही. त्यामुळे जे रवीला दिसेल तेच मला दिसेल! जे अशक्यप्राय आहे ते एका नॉन कवीस कसे दिसावे?"

त्याच्या इतर बोलण्यात ला ॅजिक असो की नसो, या बोलण्यात मात्र नक्कीच ला ॅजिक होते.

"तुला देईन एकदा वाचायला सगळ्या डायऱ्या. तुझी दृष्टी व्यापक करायला उपयोगी पडतील त्या."

"नक्कीच. तुझ्या स्वप्नात कोण कोण हिराॅइन्स येऊन गेल्या ते तरी कळेल!"

"तू नहीं सुधरेगा. तुला अशाच गोष्टींत रस नुसता. इकडे मी सामाजिक परिप्रेक्ष्यातील बाबींबद्दल, सदृष्ट अदृष्ट सृष्टीतील समष्टीपर्यंत सर्वांसाठी इष्ट अनिष्ट काय याबद्दल सम्यक चिंतन करतो नि स्वप्ने पाडून घेतो नि तुला इंटरेस्ट फक्त ड्रीम गर्ल मध्येच असावा?"

स्वप्नील स्वप्नांचे वर्णन करताना असे अनाकलनीय भारी शब्द का वापरत असावा? मोठमोठ्या शब्दांचे वजन मोठे म्हणून? की भाषा जेवढी समजायला कठीण तेवढे पांडित्य जास्त या समजातून?

"अरे, मी आहे म्हणून स्वप्ने आहेत, ती आहेत म्हणून ती कधी न कधी पूर्ण होण्याची आशा आहे. जो स्वप्नेच पाहात नाही त्याची स्वप्नपूर्ती व्हावी कशी? हजार स्वप्ने पहावीत एक त्यातली काही पूर्ण होतात..

"मला सांग आजवर पुरी झालेली स्वप्ने आहेत की नाहीत तुझी काही?"

"अर्थात आहेत. पण ती व्यक्तिगत.."

"म्हणजे? कोण ती हिराॅइन?"

"तुला दुसरे काही सुचत नाही? पण दोन गोष्टींत स्वप्नपूर्ती झालीय.. एक.. स्वप्ना.. म्हणजे माझी प्रेयसी कम पत्नी. कॉलेजात तुम्ही माझ्यासाठी कोणाला सोडलं नाहीत. पण नोकरीला लागलो नि पहिल्याच महिन्यात ही स्वप्नपूर्ती.."

"आणि दुसरे काय? बंगला बिंगला बांधलायस की काय? स्वप्नपूर्ती नावाचा?"

"बराच बरोबर बोलतोयस तू. पण बंगला नाही. रिटायर झाले की बांधतात त्या नावाने बंगला. मी नवीन घर घेतलेय.. त्या सोसायटीचं नाव आहे स्वप्नकुटीर! स्वप्नं कुठून न कुठून पुरी होतात ते महत्वाचे. बाकी सामजिक की राजकीय स्वप्नांचे काय? ती पूर्ण व्हावी की नाही ही तो श्रींची इच्छा!"

अगदी ऐतिहासिक भाषेत शिरत स्वप्नील बोलत होता. मी त्याला न अडवता त्याचे ऐकत होतो, ऐकून घेत होतो, त्याच्या स्वप्नांच्या सुरस नि चमत्कारिक कथा. त्या स्वप्नांहून खरेतर त्यांच्यामागची त्याची कल्पनाच जास्त कल्पक नि रंजक होती. बाकी आपल्यासारख्या मध्यमवर्गी, मध्यममार्गी लोकांची स्वप्ने ती काय असणार? इतक्यात घड्याळ पाहात तो म्हणाला,

"चल निघतो मी.."

"बस की थोडावेळ."

"बसलो असतो रे. पण जावे लागेल.. वेळ झाली."

"कसली?"

"अरे, झोपायची. झोपलो नाही तर स्वप्ने कशी पाहणार? मी निघतो. आय नीड टू स्लीप.. अँड ड्रीम.. स्वप्ना स्वप्नकुटीरमध्ये या स्वप्नीलची वाट पाहात असेल. बाय.."

स्वप्ने पहायला तो पटकन निघून गेला. स्वत:ला स्वप्नसुंदर म्हणवून घेणारा.. ड्रीम बॉय!

# गांधार

त्या दिवशीची गोष्ट. रस्त्याने चाललो होतो. समोरचा माणूस धाडकन आपटला माझ्यावर. तसा मी चिडत नाही नेहमी. कोणाला अंधा है क्या किंवा बहिरा है क्या म्हणून डिवचणे वा चिडवणे मला पटत नाही. समोरचा तसा नसेलही, तरी उगाच खरेखुरे हॅंडिकॅप्ड कुणी असतील त्यांच्याबद्दल अनुदार उद्गार कसे काढू शकतो कोणी. मी पाहिले समोर तर तो जो आपटला त्याने चक्क डोळ्यावर पट्टी बांधलेली. दोन्ही डोळ्यांवर चक्क. तशी एका डोळ्यावर बांधली असती तर चोर किंवा खिसेकापू म्हणून रिस्पेक्ट मिळाला असता त्याला. पण ह्याने दोन्ही डोळ्यांवर पट्टी बांधून आंधळी कोशिंबीर खेळायचे ठरवलेले की काय कोण जाणे. हातात पांढरी काठी. धाडकन आपटल्यावर त्याने पट्टी सोडली.. नि मी ओरडलोच,"डोळस तू? आणि असा?"

तो म्हणजे नयन डोळस. आम्ही एकाच कॉलेजच्या, अगदी एकाच बेंचवर बसणारे, एकत्र चकाट्या पिटणारे नि कॉलेजात एकत्र कित्येक गोष्टी करणारे. आमचा ट्रेकिंगचा ग्रुप होता. नाटकात आम्ही एकत्र असायचो. एका गोष्टीत मात्र तो सर्वांत वरचढ होता. ती म्हणजे वादविवाद. कॉलेजातल्या त्या स्पर्धेत तो दुसरे कोणाला जिंकू देत नसायचा. त्याच्याबरोबर राहून त्याला मी

चांगलाच ओळखायला लागलेलो. म्हणजे नयन डोळस आमच्याबरोबर टाइमपास करत असेलही, पण आतून तो बऱ्याच गोष्टींबद्दल विचार करायचा. अगदी खोलवर. त्याचे वाचन अफाट होते. कधी चुकून त्याला कोणी चावी मारली की त्याची अभ्यासपूर्ण मते तो ऐकवीत बसायचा. मग ऐकणाऱ्याची इच्छा असो वा नसो, त्यांना ऐकावेच लागे. अर्थात त्याची ती मते म्हणजे 'अभ्यासोनी प्रकटावे' अशा प्रकारची असत. आमच्यापैकी कित्येकांना ती पटत. पण ते कॉलेजात असण्याचे वय. सर्वांना जास्त गंभीरपणे विचार करण्याची मनाई असल्यासारखे वागणे असे आमचे. नयन डोळसचे नाव नयन ठेवताना चांगलाच डोळसपणा सिनियर डोळसांनी दाखवला होता. पोरगा असा विचारी होईल, डोळे दिपवणारा नयन .. असे डोळे उघडे ठेऊन त्यांना वाटले असावे. आणि नयन तसा कॉलेजात वेगवेगळया स्पर्धात चमकत होता.

मला आठवतेय ती विज्ञानावरील विषयावर झालेली वादविवाद स्पर्धा नि त्यातील त्याची मल्लीनाथी. त्यावेळीही त्याची मते सुस्पष्ट होती.

अर्थात सगळ्यांना त्याचे म्हणणे पटेल असे नव्हते. खरंतर बहुतेकांना पटतच नाहीत अशी मते. म्हणजे विज्ञान विरूद्ध देवादिकांचा सामना खेळवला गेला तर त्यात प्रेक्षकांचा पाठिंबा अर्थातच विज्ञानाला नसणार. लोकांचे आवडते वाक्य आहे, अगदी शास्त्रज्ञांकडूनही कधी कधी ऐकायला मिळते ते, 'देअर आर समथिंग्स बियाँड सायन्स!' मग त्यासाठी ते कुठली ना कुठली उदाहरणं द्यायला लागतात. त्या वादविवादात तो म्हणालेला,"विज्ञानात अंतिम सत्य असे काही नसते. विज्ञान म्हणजे हे जग अस्तित्वात येताना कोणकोणते नियम घालून दिले, पाळले गेले, ह्या जगाचे नियमन कुठल्या गोष्टींनी होते त्याचा शोध. मग त्यात भौतिक, रसायन नि जीवशास्त्रे आली, गणित

आले, या मूलभूत शास्त्रावर आधारित अन्य शास्त्रे आली. विज्ञान म्हणजे या सर्वांचा शोध घेणे. तो शोध अखंडच चालणार. काल काही माहिती झाले त्याबद्दल आज तपास होणारच. ते पडताळून पाहिले जाणारच. त्यासाठी विविध कसोट्या लावाव्या लागणार. काही गोष्टी सिद्ध होतील, काही चुकीच्या म्हणून बाद होतील. काहींमध्ये सुधारणा कराव्या लागतील. तर काहींमधून नवनवीन शक्यता समजतील नि पुढील शोधाला त्या चालना देतील. विज्ञान हे सर्व शक्यता पडताळून पहावयास शिकवते. तिथे कोणतीही गोष्ट तशीच्या तशी स्वीकारू नका हेच शिकवले जाते. तेव्हा माझे म्हणणे असे की, लाइफ बियाँड सायन्स अस्तित्वातच नाही. फक्त देअर इज लाइफ अँड देअर आर इश्यूज जिथे आम्ही पोहोचलो नाही अजून. अजून वैज्ञानिक प्रगती होईल तेव्हा त्यांचा उलगडा होईल. या प्रचंड विश्वाचा पसारा उलगडणे हे काम सोपे नाही. निसर्गातील साध्या साध्या गोष्टींचा उलगडा करणे ही कधी कधी आपल्याला जमत नाही. ही विज्ञानाची नव्हे तर तो शोध घेणाऱ्यांची मर्यादा आहे. एकेकाळी पृथ्वी सपाट आहे म्हणणारे आज पृथ्वी गोल आहे हे मान्य करतात. प्रश्न हा आहे की ते मान्य होण्याआधीही नि खरेतर तसा शोध लागण्याआधी देखील पृथ्वी गोलच होती. ती तशीच सूर्याभोवती फिरत होती. न्यूटनने शोध लावण्याआधीही गुरूत्वाकर्षण होतेच. तशाच निसर्गातील कित्येक बाबी अजून आपल्याला ज्ञात नाहीत. तेव्हा त्या दैवी बाबी आहेत म्हणत चमत्कार तिथे नमस्कार करायचा की कुतुहल जागृत ठेऊन त्यामागील कार्यकारण भाव शोधून काढायचा? क्षणभर देवादिकांचे अस्तित्व निर्माता म्हणून मान्य करू. त्या निर्मात्यानेही विज्ञानातूनच ही सृष्टीची घडी घालून दिली आहे नाही का? थोडक्यात विज्ञानातून शोध म्हणजे त्या जगन्नियंत्याच्या करणीचा शोध. तेथे आपली अल्पमती चालवून ह्या पसाऱ्यातून सिस्टीम इन केऑस शोधणे हा

विज्ञानाचा खरा प्रयत्न असायला हवा. जगातील एक ही गोष्ट ही आपल्याला ज्ञात किंवा अज्ञात विज्ञानाबाहेर नाही. आज ती ठाऊक नसेल तर उद्या ठाऊक होणार नाहीच असे नाही. तेव्हा ही ईश्वरशरणता सोडा. हे जग ही त्याची निर्मिती समजून त्यामागील रूल्स आणि रेग्युलेशन्स शोधण्यामागे लागा. हेच खरे विज्ञान. त्यासाठी सतत डोळे उघडे ठेवा. मन उघडे ठेवा. प्रयोग करत रहा. देअर इन नथिंग बियाँड सायन्स हे मनावर बिंबवून न कळणाऱ्या गोष्टींचा उलगडा कसा करता येईल ते पहा. आजवर कदाचित आपल्याला काही टक्केच ज्ञान प्राप्ती झाली असेल. आपले प्रयत्न सुरू ठेवावयास हवेत. विज्ञान म्हणजे निर्मात्याच्या कृतीचा शोध.. कदाचित हीच खरी ईश्वरभक्ती असेही म्हणता येईल.."

नयन डोळस बोलायचा ठासून. एखाद्यास संमोहित केल्यासारखा. त्याच्या भाषणास टाळ्या पडायच्या. सारे कौतुक करायचे. त्याचे हे भाषण कोणास किती पटले कोणास ठाऊक.

"अरे, हजारातील एकास ही आपण आपला दृष्टीकोन शिकवू शकलो नि विचार करायला किंवा अधिक तर्कशुद्ध विचार करायला प्रवृत्त करू शकलो तर जिंकलो म्हणावे! कारण भौतिकशास्त्रातील इनर्शिया किंवा जडत्वाची कल्पना इथेही लागू पडते. लोक आपली चाकोरीबद्ध विचार पद्धती नि विचारसरणी सोडावयास तयार होत नाहीत. न्यूटनचा गतिविषयक नियमच आहे तो. तो सामाजिक प्रगतीविषयक ही मानायला हरकत नाही. जोवर लोकांना तसे करायला भाग पाडले जात नाही तोवर हे विचार तसेच राहणार. त्यापायी एखादा गॅलिलिओ प्राण गमावेल किंवा सेमीलेविस सारखा शास्त्रज्ञ वेडा होईल. पण कोणीतरी हे बोलायलाच हवे. शास्त्राधारित समाज बनायलाच हवा. तुला सांगू

आपल्या अगदी राज्यघटनेत हे कलम आहे. कलम ५१. विज्ञानावर आधारित समाजरचना! तुला वाटतं कोणी या घटनेचे पालन करतेय? अगदी राज्यकर्तेही छद्मविज्ञानालाच पाठिंबा देतात. तरीही समाजरूपी घड्याळाचा काटा कूर्मगतीने का होईना, हललाच पाहिजे किंवा तो हलवण्याचा प्रयत्न तरी केलाच पाहिजे."

सांगितले ना मी, त्याला चावी दिली की तो सुसाट सुटतो. या उत्तराआधी मी त्याला फक्त विचारलेले,"डोळया, इतका बोलतोयस खरा.. कोण ऐकणारा आहे का इथे?"

असा हा डोळया आज डोळयावर कातडे ओढून का फिरत असावा? दोन्ही डोळयांवर पट्टी? अगदी मिसेस गांधारी प्रमाणे?

"काय मग डोळस? असा अडोळस का होऊन फिरतोयस? एक तर भेटलास कित्येक वर्षांनी, तो ही असा. धाडकन धडक देत? इंग्रजीत म्हणतात तसा.. यू बम्पड इंटू मी! लिटरली."

"सांगेन. माझ्या कृतीमागील कार्यकारणभाव सांगेन. फक्त तुझी ऐकायची इच्छा असेल तर.."

खूप वर्षात डोळयाची थियरी कम लेक्चर्स कम प्रवचनं ऐकलेली नव्हती. आणि धडधाकट डोळयांचा नयन डोळस असा डोळे झाकून का फिरत असावा? उत्सुकता होतीच. म्हटले,"विच्छा माझी पुरी करा!"

"चल तिकडे बसूयात. सांगतो सारे.."

जवळच एक मैदान होते. त्याच्या कट्ट्यावर बसलो. म्हटले होऊन जाऊ देत. डोळया काही फारसा बदलला नसणार. त्याची आग्रही मतं अजूनही तसाच मांडत असणार. तरीही डोळयांवर पट्टी बांधून श्री.गांधारी का बनला असावा? लोकं कानाडोळा वगैरे करतात. पण कोणी असा डोळे झाकून चालत नाही. काही ना काही थियरी असणारच.. त्याने माझी विच्छा पुरी करायला सुरूवात

केली, "अरे, जगात काय विशेष बघण्यासारखं उरलेय का वगैरे वगैरे म्हणत नाही बांधलीय मी ही पट्टी. पण मला कित्येक गोष्टी बघवत नाहीत. कां बघाव्यात मी त्या ह्या उघड्या डोळयांनी? माझं नावच नयन ठेवलं लहानपणी. त्यात मी नावानेच नयन डोळस. त्यामुळे जरा गांभीर्यानेच सारे डोळसपणे पहायची सवय लागलेली. पाहात ही आलो सारे आजवर. पण कुठवर पाहू? मोरोपंत आज असते तर विसंगती सदा घडो म्हणाले असते रे. विसंगती.. सगळीकडे तीच ती. विसंगती. इतकी की कशाची संगतीच लागत नाही. जिकडे पहावे तिकडे.. बोले तैसा न चाले वगैरे तर ठीक. पण विसंगती अशा की जे करायला हवे त्याच्या उलट कृती करावी नि ती ही साळसूदपणे? साधे उदाहरण घे. आमच्या कॉलनीतील स्वत:ला निसर्गप्रेमी म्हणवणारे एक श्रीयुत क्ष. या क्षंना तोरा मिरवण्याची मोठी सवय. पक्षी प्रेम. म्हणून पिंजरे घरात बनवलेत. एक पोपट, चार लव्हबर्ड्स. त्यांना हा वेफर्स खाऊ घालतो नि रस्त्यात कबुतरांना चणे. निसर्गाविरूद्ध आहे रे सगळं. पण सांगणार कोण? सांगितले तर ऐकणार कोण? इथवर थांबले तर ठीक, वर हे स्वत:ला निसर्गप्रेमी म्हणवतात. प्राणीसंग्रहालयात कसे लोक प्राण्यांना उगाच खाऊपिऊ घालतात. निसर्गाजवळ जावे म्हणून ट्रेकिंगला जातात. रस्त्यात कचरा टाकून येतात. मागे सिंहगडावर जाऊन पोरांनी दारूच्या बाटल्या मागे सोडलेल्या सापडल्यात. काय वाटलं असेल महाराजांच्या आत्म्याला? इथेच थांबत नाही सगळे. लोक वागतात कसे? देवाची पूजाबिजा करतात नि त्याच देवाने जन्माला घातलेल्या माणसाला माणूस म्हणून वागवायला तयार होत नाहीत. देवाची पूजाअर्चा करणारा लांड्यालबाड्या करायला धजतोच कसा? नरेचि केला किती हीन नर.. यावर पाच मार्कांचा प्रश्न दहावीत लिहिला असेल. आज तो विचार करूनही कसेसेच होते. साधी भाषा घे. जिचा उपयोग संवादासाठी तिचाच उपयोग वाद

घालण्यासाठी केला जातोय. म्हणजे एक भाषिक दुसऱ्याला भाषेवरून हिणवतोय? एक धर्माचा कुणी दुसऱ्या धर्मातील कोणाला हीन समजतोय? भाषा, प्रांत, जात, पंथ धर्म वगैरे किती भिंती बांधाल? ते ही सर्व देवाची लेकरे म्हणत? बरं या सर्वांबद्दल कोणाला न खेद ना खंत. उलट असेल तर अभिमानच असणार. म्हणजे होतंय असं की जितके संकुचित असाल तेवढा जास्त अभिमान.. नव्हे गर्व. ह्या संकुचिततेलाच मिळतेय प्रतिष्ठा. जितके पुराणमतवादी तितके तुम्ही समाजभूषण. उदार विचार म्हणजे तुम्ही समाजासाठी नालायक. आणि हा समाज कोण? तर तुमचा जातभाई, भाषाबंधू किंवा धर्मबंधू वगैरे. कूपमंडूकत्वाला इतकी प्रतिष्ठा? उघड्या डोळयांनी मी पाहात राहू? अरे, राजकारण्यांचे एक ठीक आहे. त्यांचे कामच फोडा नि झोडा. नि सुखनैव राज्य करा. पण सामान्य माणूसच खरा समाजरथ ओढत असतो, तोच त्यांच्यामागे वाहवत जायला लागला तर कसे व्हायचे? जुन्या काळी राजकारणी समाजधुरीण होते. समाजरथाला दिशा दाखवणारे. ते नामशेष होऊन कित्येक वर्षे लोटली. आता लोकांनी स्वत:च स्वत:ला सावरायचे आहे. समाजरथाची दिशा स्वत:च ठरवायची आहे. पण प्रत्यक्षात दिसतेय ते काय आहे? आमचे एक काका होते, ते कधी बाहेर जाऊन काहीच काम नाही झाले की वैतागायचे. परत आले की म्हणायचे, हत्तेरीकी, जो मिळेल तो नारगुच्चे. म्हणजे सगळीकडून निराशा! तसं झालंय माझं बघ. जे मिळेल ते नारगुच्चे. स्वत:ला विचारी म्हणवणारा मी, विचार मांडतो. लोक ऐकतात. नि एका कानाने ऐकून दुसऱ्याने सोडून देतात. इकडून तिकडे गेले वारे अगदी. काय उपयोग आहे सगळ्याचा? आधी वाटे, हजारात एक जरी बदलला कोणी तरी ठीक, पण इथे तर आता वेळ आलीय, विवेकाचा आवाज दाबून टाकला जाण्याची. मग मी काय करावे? बोलावे की न बोलावे? पण मी प्रश्न सोडवला माझ्यापुरता. वाळूत डोके खुपसून उभा

राहणारा शहामृग माझा आदर्श. मी ठरवलेय. डोळ्यावर पट्टी बांधून सृष्टीच दृष्टीआड करायची. वाळून डोके खुपसून बसायचे. जास्त डोळसपणाने नि चौकसपणाने काही करायला जावे नि उगाच निराश व्हावे असल्या गोष्टी यापुढे बंद. त्यापेक्षा हे उत्तम. डोळ्यांवर पट्टी बांधा नि आनंदात जगा. आनंदी जीवनाची ही गुरूकिल्ली जरा उशिराच सापडली म्हण ना मला. पण देर आए दुरूस्त आए. वेळ गेली नाही अजून. उगाच संगती लावत विसंगती बघायची नि आपल्या विचारांशी विसंगत दिसतेय सारे म्हणून नैराश्य.. कोणी सांगितल्यात त्या उचापती? त्यापेक्षा मी आता सुखात आहे. गांधारीचा आदर्श ठेऊन सारे काही नजरेआड करायला लावणारी ही डोळ्यावरची पट्टी फारच उपयुक्त आहे. मी बनलोय आता श्री.गांधार! गांधार हे देशाचे नावच मी स्वत:ला देऊन टाकलेय. मागे कुणीतरी एका लेखकाने आपल्यातला लेखक मेलाय म्हणून जाहीर केलेले. त्यापेक्षा हे बरे नाही का? खरं सांगू, तर तूही पहा वापरून.. सर्व विचारी जनांसाठी एकच उपाय.."

त्याची सवयच ती. सुटला की सुसाट सुटतो. अस्खलित बोलत राहतो. समोरच्याला बोलण्याची संधी न देता. त्याचे बोलणे अजूनही तर्काला धरून आहे नि त्यामुळेच अजूनही बहुतेकांना पटेल असे नाहीच. मग त्याने आजूबाजूचे वास्तवच बघायचे नाही हे ठरवले तर ते ही तार्किकच मानायला हवे की नाही?

"चल. उशीर झाला खूप. जायचेय एका ठिकाणी. बरं वाटलं खूप दिवसात कोणीतरी श्रोता मिळाला. बोलून टाकले. आता मैं और मेरी आँख की पट्टी.. निघतो रे.." त्याने डोळ्यावर पट्टी चढवली. नयन डोळसकडे मी माझ्या उघड्या डोळ्यांनी पाहातच राहिलो.. त्याने ती अंधांसाठी असते ती पांढरी काठी उघडली नि चाचपडत पुढे होत तो निघून गेला..

# दिग्दर्शक

सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्री.कमलाकर राणे यांना अटक.

पेपरातली बातमी पाहून मी उडालोच. अटक? ती ही कमलाकरला? तशी शंका येण्यासारखे आजवर काही घडले नव्हते. नि कमलाकर सारखा सज्जन नाटक धंद्यात अपवाद म्हणावा असाच होता. अगदी आठवडाच उलटलेला, दिग्गज नाट्यदिग्दर्शक म्हणून त्याला मोठा मान नि प्रतिष्ठेचा 'नाट्यदिग्गज' हा पुरस्कार मिळालेला. आठवड्याआधी पेपरात फोटो आलेला. एखाद दुसऱ्या पेपरात मुलाखत वगैरेही. त्यात तो आपल्या प्रेरणा नि निष्ठा वगैरेंबद्दल बोललेला. आणि त्यानंतर त्याच्याबद्दल थेट ही अशी बातमी यावी?

नाटक हा कमलाकरचा श्वास नि ध्यास. नाटक म्हणजे नसलेल्या गोष्टीचा आभास निर्माण करणे, एखाद्या जादुगारासारखे काम. समोरच्यास ठाऊक असते ही हातचलाखी आहे किंवा अजून काही. समोरचे सारे आभासी असूनही गुंतणारे प्रेक्षक. त्यात त्याला अधिकाधिक गुंतवणे ज्याला जमले तो अधिक यशस्वी. नाटकाला धंद्यापेक्षा कला अधिक मानणारा तो. खूप पूर्वी हे वेड लागले त्याला. रंगमंच खुणावतो म्हणत तो नाटकात रममाण झाला तो परत न येण्यासाठी. मग त्यात फायदा होवो की नुकसान. बेभरवशाच्या या नाट्यक्षेत्रात व्यावसायिक बाजू न पाहिल्यास फरपट मागे लागते. माझ्या माहितीत तरी तसे काही त्याच्या नशिबी नव्हते. नाव होते, रेप्युटेशन मोठे होते. दर नाटकागणिक पैसा होताच. स्वत:साठी मिळणारा वेळ वगळता सारे काही

होते. मग त्याच्यावर ही पाळी कशामुळे यावी? आणि थेट रवानगी गजाआड व्हावी?

जामिन मिळून कमलाकर एक दोन दिवसांत सुटला ही. अशा वादग्रस्त नि कायद्याच्या कचाट्यात अडकलेल्यांस ही दिखाव्याची दुनिया लगेच बाद करून टाकते. जवळचे म्हणणारे मित्र साथ सोडतात. कुठल्यातरी नाटकातले वाक्य आहे त्याप्रमाणे आपली सावलीही अशा वेळी आपली साथ सोडून जाते. अशावेळी अत्याधिक गरज असताना जवळचे कोण नि परके कोण याची पारख होत असते. मी त्याचा कॉलेज पासूनचा दोस्त. मी अभिनयात नि तो दिग्दर्शनात शिरला त्याला वीस वर्षे लोटली. आमची नाट्ययात्रा एकत्रच सुरू झालेली. पहिल्या कित्येक नाटकात मी लीड रोल नि तो दिग्दर्शक होता.

"तुला नाही वाटत असे? तोंडाला रंग लावून रंगमंचावर एंट्री घ्यावी. टाळ्यांचा कडकडाट व्हावा. काय थ्रिल ते. कायम पडद्यामागे राहणारा तू.." मी एकदा विचारलेले त्याला.

"नाही. मी तसा एकदम शाय आहे. रंगमंचावरील प्रकाशझोत मला सहन नाही होणार. त्यापेक्षा हे चांगले नि सोपे. मुख्य म्हणजे मला हेच जमते. आणि आवडते ही. आणि द डायरेक्टर इज द कॅप्टन ऑफ द शिप. ही हॅज टू सेल द बोट राइटली. दिशा दाखवत नाटकाचं तारू पैलतीरी आणून सोडणे हे काम करायला मजा येते. इट्स अ थ्रिल. तुला फक्त एका पात्रापुरता किंवा फारतर सह कलाकारापुरता विचार करावा लागतो. मी नाटकाचा चारीबाजूंनी विचार करतो. नाटकाच्या कथानकापासून सादरीकरणापर्यंत. त्यातली गंमत तुला नाही कळायची.."

त्याचे ते तेव्हाचे उत्तर. त्यानंतर आम्ही दोघेही या व्यवसायात स्थिरावलो. मलाही बाहेरची नाटकं मिळायला लागली. काही सिनेमातून कामं

केली. टीव्हीवर आलो. कमलाकर मात्र दिग्दर्शकाच्या खुर्चीतून कधी उठला नाहीच. नाटक हेच त्याचे पहिले नि शेवटचे प्रेम. काही सिनेमे केले त्याने, पण मन रमले ते रंगमंचावरच. त्या तिसऱ्या घंटेआधी त्याचे काम संपायचे नि ती घंटा झाली की माझ्यासारख्या नटांचे काम सुरू व्हायचे.

"एकदा चांगले नाटक हाती आले ना की माझी दुनिया बदलून जाते. त्या आभासी दुनियेतली पात्रे दिसायला लागतात. प्रथम दिसतो ते नाटकाचा सेट. नेपथ्य. मग त्यापाठोपाठ सगळी पात्रे. त्यांच्या कथित अकथित बॅकग्राउंडसकट. मग मी त्यांच्या हालचाली इमॅजिन करतो. कोण कुठून कसा कुठे जाईल.. कसा हलेल कसा बोलेल.. हातवारे कसे करेल वगैरे सगळे. मग आपोआप पाठून संगीत वाजते, प्रकाशाचे खेळ होतात. रंगीत तालीम उभी राहते. मग धाकधुकीत पहिला प्रयोग. लोकांच्या टाळया मिळाल्या की धन्य.. तुम्ही लोकं मग नाटक पुढे नेता. मी दुसऱ्या नाटकाची वाट पाहात बसतो. पुढचे नाटक हाती येईतो हुरहूर."

कमलाकर त्याच्या नाटक बसवण्याबद्दल बोललेला. अर्थात हे सारे मी पाहात होतोच. आठ दिवस तो आमच्याकडून नाटक वाचून घ्यायचा नुसता. मग तालीम मास्तरासारखा अदृश्य छडी घेऊन उभा राहात एक एक प्रवेश बसवून घ्यायचा. आम्ही ही तसे सुतासारखे सरळ होऊन झोकून द्यायचो. ही नशा काही और होती आणि आहे ही. त्या साऱ्या धबडग्यात कमलाकर दिवसेंदिवस गुंतलेला असायचा. सारे लक्ष नाटकाकडे. मग कधी भररात्री घरी पोहोचायचा तर कधी थेट दुसऱ्या दिवशी. बिचारी चित्रा वहिनी, आधी ती नाटकातच होती. कमलाकरच्या त्या नाट्यप्रेमावर भाळली. पण घर चालवायला कुणी घरी असायला हवेच ना? नाटक सोडून तिने गृहस्थी पत्करली. कमलाकर हळव्या क्षणी तिला मनापासून धन्यवाद द्यायचा. त्याचा

एकुलता एक मुलगा रामानंद. कधी कधी त्याच्यावरून चिंताग्रस्त असला तरी लगेच काळजी झटकून नाटकाच्या मागे लागायचा. रामानंदबद्दल त्याला नक्की कसली काळजी होती कोणास ठाऊक. कमलाकर त्याबद्दल बोलणेच टाळायचा. काय असेल ते असो, कमलाकरचे व्यावसायिक आयुष्य असे यशाने भरलेले. रंगदेवतेने भरपूर दान ताटात टाकले म्हणून तो कृतज्ञ होताच. फक्त या वेडापायी कधी पोराचे बालपण नाही पाहिले म्हणून हळहळायचा. कधी त्याच्या शाळेत जाणे नाही की शाळेत खास प्रसंगी उपस्थित राहणे नाही. सारे काही असले तरी नाट्यक्षेत्रात कमलाकरबद्दल सगळ्यांना आदर होता. दिनरात रंगमंचाच्या विचारात गुंतलेला नि त्यातूनच नावारूपास आलेला प्रसिद्ध दिग्दर्शक. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नव्हतीच. तो तुरूंगात का जावा?

जामिन मिळवून कमलाकर घरी आला. आता त्याचा जामिन म्हणजे एखाद्या राजकीय पुढाऱ्याची जामिनावर सुटका थोडीच आहे की लोकं तो जामिनही साजरा करतील? आता तर मोठमोठे गुन्हे करून तुरूंगातून जन्मठेप भोगून बाहेर आलेल्यांचे सत्कार करण्याचे दिवस आहेत. पण ते राजकीय नेत्यांसाठी. हा नेता समाजाला कुठे नेतो यातून कोणास ठाऊक. असो. तर मुद्दा हा की, कमलाकर घरी परतला. नाट्यधंद्यातले कुणी फिरकले नाहीच. मी गेलो तर कमलाकर एकटाच होता. इतका उदास नि हताश कमलाकर मी आजवर पाहिला नव्हता. आज कित्येक महिन्यांनी मी त्याला भेटत होतो. या वेळी त्याच्याबरोबर मी नसेन तर दुसरे कोण असणार होतं?

"हे काय रे? असं कसं काय?" कमलाकरला मी विचारले. मला वाटलं होतं तो नजर चुकवेल. पण तसं काहीच झालं नाही. माझ्याकडे पाहात म्हणाला,

"हे? कधीतरी व्हायचेच होते रे. तुला नाही ठाऊक. खरेतर कोणालाच नाही ठाऊक.."

थोडावेळ तो गप्प झाला नि मग स्वत:च सांगायला लागला.

"स्वत:ला दिग्दर्शक म्हणवतो मी. नाटकाची नौका पैलतीरी लावण्याबद्दल अभिमान बाळगणारा. पण नाटक ते नाटकच. आभासी नि खोटं. असं खोटं की जे खरं वाटावे. खरं तर नाटकात राहून राहून खरं खोटं वाटायला लागलंय नि खोटं खरं. खरंतर आपले जगच मुळात नवनवीन कल्पनांचे. क्रिएटीव्ह. त्यात नाटक समोर आलं की माझं भान हरपते. मी तहानभूक विसरून त्याच्या मागे लागतो. माझ्यासाठी माझ्या नाटकाला सारं काही परफेक्ट हवं. नेपथ्य, प्रकाश, संगीत, नटवर्ग नि सगळं काही. मी झोकून देतो. दिशा दाखवणारा तो दिग्दर्शक. नुकताच सत्कार झाला माझा. दिग्गज दिग्दर्शक म्हणून. आजवर कित्येक नाटकं बसवली. अगदी ओपन एअर ते प्रेक्षक चारी बाजुंनी बसून बघतील असले फॉर्म्यॅट्स. ब्राॅडवे स्टाईल नि अजून काही. पण नाटकाला दिशा दाखवता दाखवता आयुष्याला दिशा दाखवायची राहून गेली. पोराकडे दुर्लक्ष झाले."

कमलाकर बांध फुटल्यासारखा बोलत होता. आजवर त्याला हे जाणवले असावेही पण आज बोलून दाखवत होता.

"रामानंद. बिघडला तो. माझे लक्ष नव्हते. नाटकाच्या धुंदीत मी. आभासी दुनियेत रमताना वास्तवाचा विसर पडला. रामानंदला सावरू नाही शकलो. व्हायचे काय होते? माझ्या नावावर पैसे उचललेत त्याने. चार ठिकाणहून तक्रारी आल्या. माझ्या खोट्या सह्या. मला धक्का बसला. पण पोटचा एकुलता एक पोरगा अडकणार तर मी इथे त्यानेच केलेल्या बनावट सह्यांची तक्रार करणार कुणाकडे. वाटतं नाटक बनावट तसं हे एक आयुष्यही बनावट निघावं? कधी कधी वाटतं या नाटकात राहून राहून नाटक झालं जन्माचे की काय. दिग्गज दिग्दर्शकाला आयुष्याला दिशा दाखवता न आल्याने त्याची

दशा व्हावी? पैशाचा मामला आहे. पैसे भरून सुटेन मी. बाइज्जत कदाचित. पण पोराच्या आयुष्याचे दिग्दर्शन हा दिग्गज दिग्दर्शक कसा करणार आहे कुणास ठाऊक? वाटतं सारंच चुकत गेलंय. स्क्रिप्ट पासून सगळंच. हवी ती वेळ निघून गेली नि आयुष्याचाच फार्स होण्याची वेळ आलीय.. तो ही फसलेला. दिग्गज दिग्दर्शक म्हणे.. नाटक झाले जन्माचे.."

खरेतर नाटकाची नि नाट्य क्षेत्राची काय चूक होती त्यात? मला तर नेहमी कलाक्षेत्रात राहून वाटते वारंवार, हे हीरो लोक वाहवत जातात नि स्वत:ला लार्जर दॅन लाइफ समजायला लागतात. असतात ते खरे बुटकेच पण ग्लॅमरच्या दुनियेत विसरतात की हा शो बिझिनेस नाही, शो बाजी नाही तर ही कलासाधना आहे. अर्थात हे कमलाकरला लागू होत नाही. बिचारा कमलाकर. दिशादर्शन त्याचा आवडता विषय, छंद नि व्यवसाय. दिग्दर्शक म्हणून नाव कमावता कमावता त्याच्याच मुलाच्या आयुष्याची दिशा चुकावी? त्याची कित्येक नाटके हिट झाली. कित्येकांचे हजारावर प्रयोग झाले. पण हे आयुष्याचे नाटक फसावे ना? नियतीच्या मनात काही वेगळेच असावे. त्या नियतीने योजलेल्या नाटकापुढे कोणाचे काय चालणार आहे? नियती शेवटी हा कठपुतळीचा खेळ करते नि करवून घेते.. तीच खरी दिग्दर्शक या आयुष्याच्या नाटकाची.

.. मग तिच्या पुढे कितीही नामांकित दिग्गज कमलाकरसारखा दिग्दर्शक का असेना..

# मल्लिनाथ!

त्याचे नाव विश्वनाथ! विश्वनाथ विचारे.

प्रमुख कर्तव्य म्हणजे विश्वाचा विचार करणे. हा नावापासून घेतलेला वसा असे घसा फोडून आज ही सांगतो तो.

तो तसाच आहे. पहिल्यापासूनच. अगदी लहान होता शाळेत तेव्हाही तसाच. कशाकशावर तो काय काय नि कधी कसा बोलेल सांगता यायचे नाही. त्याला स्वत:ची अशी मते आहेत. म्हणजे तसे तो आता सांगतो. त्यावाचून त्याला राहवत नाही म्हणे. मग तो पटकन काहीतरी बोलून टाकतो. आजच्या पाॅप्युलर भाषेत सांगायचे तर व्यक्त होतो!

तसा तो व्यक्त होणारा व्यक्ती पहिल्यापासूनच. व्यक्त होते ती व्यक्ती अशी त्याने व्यक्तिश: बनवलेली व्याख्या होती. आणि त्याला अनुसरून त्याची मताची पिंक इतस्तत: टाकायची सवय होती. पानाची पिंक टाकणे हा आपला राष्ट्रीय बाणा असेल तर मतांच्या पिंका टाकायला कोणी हरकत का घ्यावी असे त्याचे परखड मत होते. ते ही त्याने कित्येकदा व्यक्त करून झाले होते. हळूहळू त्याची ही व्यक्त होण्याची सवय वाढत गेली. मागच्या बाकावरून कमेंट

मारणारा तो.. मग मतांची शिंगं फुटल्यावर अजूनच उधळला तर नवल नव्हते. गल्ली ते दिल्लीपर्यंत प्रत्येक विषयावर त्याला मत होते. नि ते मनातल्या मनात दाबून ठेवू नये अशा मताचा तो असल्याने तो कुणी विचारो वा न विचारो आपले मत दिल्याशिवाय राहात नसे.

दबावाखालील पाणी आपला मार्ग शोधतेच. वाट काढून वाहू लागतेच. तेव्हा त्याच्या व्यक्त होण्यामागची आस त्याला तेव्हाही थोडीच गप्प बसू देणार होती? त्यामुळे अगदी लहानपणापासूनच तो आपल्या एक्सपर्ट कमेंटांच्या पिंका जाता येता मारत राहिला. शाळेत वेळीअवेळी बोललेले शिस्तीत बसत नाही. पण गब्रू हार मानेल तर! शिक्षा त्याने हसत स्वीकारल्या पण व्यक्त होणे काही सोडले नाही. त्याच्या घरी चिठ्ठ्या जात. त्याच्या आईवडलांना बोलावणे जाई. ते ही कर्तव्य बुद्धीने येत..

"शाळेत बोलावलेय!" त्याने घरी सांगितले की प्रश्न तयार असे," नवीन काय दिवे लावलेस?"

"दिवे? अर्थातच. दिव्याचा प्रकाशच एक दिवस जग उजळून टाकेल आई."

यावर आई काय बोलणार? शाळेत गुपचुप येई. शिक्षक तिच्यासमोर व्यक्त होत ते ऐकून बिचारी परत येई.

"शाळेतील शिस्त म्हणून ठीक आहे पण मी मन मोकळे बोललो नाही तर.. उगाच मनात काही ठेवू नये म्हणतात.. रक्तदाब वाढेल."

इयत्ता दहावीतील तो एखाद्या ढुढ्ढाचार्यासारखा बोलेल तर यावर कोण काय बोलणार?

या बाबतीत सर्वांनी हात टेकलेले नि त्याला ओवाळून टाकलेले म्हणावे अशी स्थिती होती. अर्थात त्याने निर्माण केलेली परिस्थितीच तशी होती!

आशा एकच.. शाळा सुटेल नि पोरगा कॉलेजात जाईल.. तेव्हा त्याची सवय सुटेल न सुटेल पण कमीतकमी अशा पालकांच्या नावे येणाऱ्या चिठ्ठ्या तर बंद होतील.. या आशेवर आईवडील दिवस ढकलत होते. मग त्याचा कॉलेजप्रवेश झाला. कॉलेजात पाठच्या बेंचेसवर ला र्डस ऑफ लास्ट बेंचेस बसतातच. त्यात ह्याची भर! पण याच्या कमेंटस म्हणजे निव्वळ वात्रटपणा नसायचा. तो स्वत:ला इंटलेक्च्युअल मानायचा. त्यामुळे मध्येच बोलायचा जे त्याला स्वत:ला तरी मार्मिक वाटायचे. कॉलेजातल्या प्राध्यापकांना शेवटच्या बाकांकडे लक्ष द्यायला कसला आलाय वेळ? त्याच्या ह्या शाब्दिक करामतींकडे मग दुर्लक्ष व्हायचे. बाकी वात्रट पोरे ह्या इंटलेक्च्युल मल्लिनाथीस दुर्लक्षाने मारून टाकायची. त्यामुळे त्याचे हे जग बदलण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरायचे. आपल्या धगधगत्या जाणिवांतून प्रेरित होऊन तो आपली मते व्यक्त करायचा. त्या जाणिवांतूनच तो समाज बदलावा म्हणून आपल्या मताधिकाराचा वापर करायचा.

त्याचे मत तसे 'कीमती'च होते. म्हणजे निवडणूक प्रचारावर विश्वास ठेऊन आपले मत कीमती असल्याचे ठाम मत त्याने बनवले होते! म्हणजे असे त्याचेच स्वत:च्या बोलण्याबद्दलचे मत होते! कॉलेजची वर्षे तशी अनइव्हेंटफुल

म्हणावी अशी गेली. म्हणजे तो व्यक्त झाला नाही असे नाही पण कोणी लक्ष देईल तर! पण गडी नाउमेद झाला नाही.

मग यथावकाश नोकरी.. पाठोपाठ छोकरी आली. अर्थात चांगली मुलगी पाहूनबिहून लग्न ठरवल्याचा खेद त्याला होता, पण प्रेमविवाहास लागणारी मानसिक तयारी त्याची नव्हती! हे 'मानसिक तयारी नसल्याचे' कारण त्यानेच दिलेले. म्हणजे तावातावाने मुलगी बघण्याच्या कार्यक्रमाविरुद्ध बोलणारा तो अचानक कांदेपोह्यांच्या कार्यक्रमाला जाऊ लागला.. पोह्यांवरील लिंबाबरोबर आपली मते ही बोलता बोलता पिळू लागला.. त्याच्या वाचाळतेमुळे असे प्रसंग वारंवार येऊ लागले.

तरीही एका कन्यकेस तो पसंत पडलाच! त्याला कारण हेच.. तो ज्या दिवशी या कार्यक्रमास गेला, त्यादिवशी त्याचा आवाज बसलेला होता नि डाॅक्टरी सल्ल्यानुसार मौनव्रत पाळणे जरूरी होते! थोडक्यात लग्नगाठी कशा वरच्या ऑर्डरीतून बांधून येतात याचेच हे उदाहरण होते! मग लग्न ठरल्यानंतर आपल्या गळयात मंगळसूत्रासकट हे कोण पडले हे त्याच्या अर्धांगिनीस म्हणजे विशाखास कळेपर्यंत चांगलाच उशीर झाला होता. अर्थात यावरही त्याची मताची पिंक तयार होतीच.. जिचा मतितार्थ इतकाच, होनी को कौन टाल सकता है!

लहानपणापासून घेतलेले हे व्यक्त होण्याचे असिधारा व्रताचे रोप चांगलेच मूळ धरून वृक्षात रूपांतरित होऊ लागले. चांगली बघून नि अरेंज्ड

करून वामांगी आलेली अर्धांगिनी विशाखा त्यात बावरून गेली नाही तरच नवल. एकतर पतीपत्नीच्या नात्यात व्यक्त होण्याचे अधिकार विवाह विधीतच विधिवत पत्नीहाती दिले जातात. भार्येच्या मतांचा भार वाहणे हे पती कर्तव्य पार पाडावे असे विवाह संस्कार दिले जातात. जायाची ही माया वैवाहिक आयुष्यात पसरली की वर्षे कशी सरली हे ही ध्यानात येऊ नये. पण इकडे विश्वनाथा घरची उलटी खूण! बिचारी विशाखा! ज्या वयात घरावर राज्य करण्याची स्वप्ने पाहावीत, त्यात ही उपटसुंभी मतमतांतरे ऐकावी लागावीत? जिथे भार्येचा खणखणीत आवाज यावा तिथे ह्याने प्रत्येक गोष्टीवर मत व्यक्त करत बसावे? नव्याचे नऊ महिने सरले नि पुढच्या काही महिन्यांतच त्याच्या या सवयीने फुलासारखी विशाखा कोमेजली.

तिच्या आईनेही विचारले, काय बिनसले? मुलगा व्यसनी आहे? मारतो? की अजून काही?

विशाखा बिचारी काय सांगणार?

"अगं हे सगळं काही नाही. पण त्याला सगळ्या गोष्टींत नाक खुपसायचं असते. शेपूच्या भाजीत मुगाची डाळ किती टाकावी, गवारीच्या शेंगा किती इंच लांबीच्या चिराव्यात या पासून चादरीचा रंग कोणता असावा नि उशांच्या अभ्र्यांवर कसली डिझाइन असावी.. घराच्या भिंतींच्या रंगांपासून कपड्यांच्या ढंगापर्यंत ही त्याची मतं तयार! एखाद्या नाटक सिनेमात काय घडलंय किंवा बिघडलंय पासून ते इकडचेच नाही तर थेट युरोप अमेरिकेतील राजकारण! काय काय ऐकून घ्यायचे? विटलेय मी सगळ्याला. नको नको झाला जीव. कोणाला

असावीत मतं पण इतरांनाही बोलू द्यावे की नाही? अगदी मुस्कटदाबी म्हण! वैताग आहे सगळा."

"अगं पण सांगून बघ ना एकदा.."

"सांगितलं. तर म्हणे, बघ हे तुझे मत आहे. बोललीस तर हलके वाटलं ना? आता ते मानणे न मानणे माझ्या हातात आहे म्हणे! यावर काय बोलणार? असूनी मालकीण खास घराची.. मलाच बोलायची चोरी?"

एकूण हा न परतीचा रस्ता दिसत होता. विश्वनाथची जित्याची खोड जायला तयार नव्हती नि विशाखा कधीतरी ही कुत्र्याची शेपटी सरळ होण्याची वाट पाहात होती. त्यात तिच्या हाती यश येण्याची शक्यता म्हणजे अमावस्येच्या रात्री चंद्रप्रकाशाची वाट पाहण्यासारखं होतं. थोडक्यात ह्या समस्येवर इलाज दृष्टिक्षेपात नाही नि कोणाला सांगावे नि पटतील असे दुर्गुण विश्वनाथात नाहीत, तरीही सांगता ही येत नाही नि सहन ही करता येत नाही अशी अवस्था झाली तिची.

पण जमाना समुपदेशनाचा आहे. जे उपदेशाने होत नाही ते समुपदेशनाने होतं म्हणतात. विशाखाची एक मैत्रीण इथे मदतीला धावून आली. तिच्या ओळखीतून समुपदेशक रागिणी रताळे यांची गाठ पडली. तिकडे विश्वनाथला घेऊन पोहोचणे कर्मकठीण वाटलेलं विशाखाला पण विश्वनाथाने फारसे आढेवेढे घेतलेच नाहीत.

"हुं.. समुपदेशे पांडित्य! पण उपदेशाहून समुपदेश बरा!" एवढेच मत मांडून तो यायला तयार झाला.

रताळे बाईंकडे मग एकेक करून हिस्टरी देऊन झाली. विशाखाने आपली कथा नि व्यथा सांगायला चांगलाच वेळ घेतला तर विश्वनाथने,"रताळे बाई, मी चिंता करतो विश्वाची" म्हणत पटकन आपली बाजू मांडली.

रताळे बाई हुशार खऱ्या. मराठीत हा वाक्प्रचार नाही, पण असता तर बाईंनी बर्फ तोडला म्हणता आले असते. थोडक्यात ब्रेकिंग द आइस!

मग दोघांशी बोलताना बाई म्हणाल्या,"समस्या आहे म्हटले की इलाज असायलाच हवा. विश्वनाथ विचारे विश्वाचा विचार करतात. नि विशाखा तुला हे पटत नाही. खरेतर त्यांना काय म्हणायचे याहून त्यांना काही म्हणायचे आहे ह्यामुळेच तू जास्त अस्वस्थ आहेस. नि तुझी अशी परवड होणे परवडणार नाही! थोडक्यात विश्वाची चिंता करता करता विशाखाची स्थिती चिंता करण्यासारखी झाली आहे खरी."

"रताळे मॅडम, पण यावर उपाय?"

"अर्थातच आहे. असा उपाय ज्याने साप पण मरेल नि काठीपण न तुटेल!"

"बापरे! साप! मॅडम साप कुठे आहे इथे? मला खूप भीती वाटते सापाची." तंद्रीत नि इंग्रजीत प्रीऑक्युपाईड म्हणतात तशी असलेली विशाखा

घाबरत ताडकन उडाली. नि मग एकाएकी रताळे मॅडमना काय म्हणायचे ते समजून ओशाळत खाली बसली.

"तर विश्वनाथ, तुम्हाला तुमची मतं मांडायला आवडतात.."

"खरंय."

"तुम्ही कोणासमोर ती मांडता?"

"जो असेल त्याच्यासमोर."

"म्हणजे एखाद दुसरा कोणी असेल तर त्याच्यासमोर. कदाचित दोन पाच जण असतील तर त्यांच्या समोर.. बरोबर?"

"होय."

"पण तुम्ही म्हणता तशी विश्वाची चिंता वाहायची तर हे पुरेसे नाही."

"मग?"

"आणि बोललेले शब्द म्हणजे पाण्यावरचे बुडबुडे. कधी फुटतील नि विसरले जातील सांगता येत नाही."

"म्हणजे?"

"म्हणजे हेच. यापुढे बोलणे बंद. एखाद दुसऱ्यासमोर मते मांडणं बंद.."

"पण.."

"पुढे ऐका. तंत्रज्ञानकृपेने आज लिहायला वेगवेगळी माध्यमे आहेत. फेसबुक, व्हॉट्स ॲप इन्स्टा वगैरे.. वगैरे. त्यावर लिहा. सर्वदूर पोहोचेल. नि लिखितरूपात चिरंजीव होतील तुमचे विचार. मग ते कुठल्याही विषयावर

असोत. भाजीचा शेपू ते घोड्याची शेपूट.. राजकारण ते विनाकारण कशावरही व्यक्त व्हा. तिथे इट्स फ्री फॉर ऑल आहे. लिहा, पोस्ट करा, व्यक्त व्हा. छोट्या डबक्यातून बाहेर या नि विस्तीर्ण समाजमाध्यमी तलावात मुक्त विहार करा! आपल्या मताने हवी तशी दुनिया बदलण्यासाठी व्यक्त व्हा!"

"हे फारच छान आहे रताळे मॅडम. मी आजच

जॉईन करतो."


"फक्त पथ्य एकच पाळा.. सर्वात प्रथम ह्यावर पोस्ट टाका.. घराघरात अंतिम शब्द फक्त पत्नीचाच राहणे ह्यास अतिप्राचीन भारतीय संस्कृती अन ऋषीमुनींच्या ग्रथांचा आधार.. करा पोस्ट नि होऊन जाऊ देत श्री गणेशा!"


विश्वनाथ विचारेला मग आधुनिक साधन मिळाले. विश्वनाथला मल्लिनाथ नावाने व्यक्त व्हायला समाजमाध्यम नावाचा चव्हाटा आयता मिळाला. व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उदो उदो करत तो 'बघता काय सामील व्हा' म्हणत त्या कमेंटच्या सागरात यथेच्छ डुंबू लागला.. विशाखा आता मोकळा श्वास घेत त्याच्यावर हुकूम सोडतेय. आणि हुकुमाचा बंदा विश्वनाथ?

त्याने हल्लीच "गृहस्वास्थ्यासाठी पति-मौनाचे महत्व" यावर मौलिक विचार फेसबुकावर मांडलेत.. आता तो त्यावर लाइक्सचा पाऊस पडायची वाट पाहतोय!

## डॉ. नितीन मोरे यांची ४४+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





डॉ. नितीन मोरे यांची ४४+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.



































डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0



HOSTEL-I




डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे




वाळूतील
रेषा



राजा दरबारी


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या










डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


सांगतो
ऐका





डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे सत्तेचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभिरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४६), अनील वाकणकर (९),

फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (६), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (६) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं “ई”यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)